साप्ताहिक

# माणूस

२६ एप्रिल ८६ / २ रूपये



# भारतातील पहिले ग्रामीण कॅन्सर निवारण केन्द्र बार्शी



साप्ताहिक

# माणूस

वर्ष : पंचविसावे

अंक : अठ्ठेचाळिसावा

२६ एप्रिल १९८६

किंमत : दोन रुपये

संपादक

**श्री. ग. माजगावकर**

साहाय्यक

**दिलीप माजगावकर**

**सौ. निर्मला पुरंदरे**

**मेधा राजहंस**

वार्षिक वर्गणी

**साठ रुपये**

प्रकाशित लेख, चित्रे इत्यादींबाबतचे हक्क स्वाधीन. अंकात व्यक्त झालेल्या मतांशी चालक सहमत असतीलच असे नाही

राजहंस प्रकाशन संस्थेच्या मालकीचे हे साप्ताहिक संस्थेतर्फे मुद्रक व प्रकाशक श्री. ग. माजगावकर यांनी साप्ताहिक मुद्रण, १०२५ सदाशिव, पुणे येथे छापून तेथेच संस्थेच्या कार्यालयात प्रसिद्ध केले.

: पत्ता :

**साप्ताहिक माणूस**

१०२५ सदाशिव, पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९


मुखपृष्ठ—सुरेश नावडकर

छायाचित्रात—डॉ. पद्मभूषण प्रफुल्ल देसाई

मध्यभागी—डॉ. नेने आणि

बाजूला श्री. कघले

दुसरे छायाचित्र—मोबाईल व्हॅनचे



# मुंबापुरी

## □ सावल्यांच्या जखमा !

पूर्वी कलिंगडाची बैलगाडी डुलत डुलत गिरगावात आली की हमखास समजावं की उन्हाळा येऊन ठेपला. केळेवाडीत कैऱ्यांची झाडं बख्खळ. यथेच्छ ताव मारायचा. दात अगदी किटकिटून निघेस्तवर.

आता सर्वत्र 'फ्रूटी' चा जमाना आलाय. 'फ्रूटी' म्हणजे, टू बी फ्रँक, पन्हंच. पण आता पन्हं–बिन्हं करायला फुर्सत आहे कुठे बायकांना ? त्यांनाही त्यांचं 'लाइफ' असतंच की नाही ?

पूर्वी, बर्फाच्या गोळ्याची गाडी दुपारची चक्कर टाकून जायची. बर्फाचा गोळा दहा–पाच पैशाला मिळायचा. त्यावर कसले तरी रंग आणि सब्जा. भरपूर गोळे हाणायचे आणि वर शिव्याही दामटून खायच्या.

आता सर्वत्र आईस्क्रीम पार्लर्स निघालेत. चोको बार काय अन बटर स्कॉच काय, खायला बरे पण काही म्हणा बुवा, बर्फाच्या गोळ्याची मजा काही वेगळीच.

तुम्ही म्हणाल नॉस्टॅलजिक होऊन लिहितोय झालं. उन्हाळा पुन्हा दारात येऊन ठेपलाय. सवाल तो नाही. पण हा उन्हाळा बाजार-बुणग्यांचा आहे. आमचा नाही.

परवा इब्राहिमभाईकडे वाळ्याचं अत्तर आणायला गेलो. त्यांनी कसलंसं 'परफ्यूम' दिलं. म्हणाले 'अब इसकाच डिमांड जोरमे है'

मीनाकुमारीचा एक शेर आहे : 'धूपमें सेंके छाँवकी जख्मे'. मी सांप्रत तेच करतोय. सावल्यांच्या जखमा उन्हात शेकतोय.

## □ खैरनार पद्धत

एका डबक्यातल्या बेडकीच्या पिलांनी डबक्याबाहेर पडल्यावर एकदा कुरणात चरत असलेला बैल पाहिला. परत आल्यावर त्यांनी ताबडतोब आईला आपण मोठा प्राणी पाहिल्याचे सांगितले. बेडकीने थोडे अंग फुगवून विचारले, एवढा मोठा होता का ? पिले म्हणाली–नाही. ह्याहून मोठा. बेडकीने आणखी अंग फुगवले तरी पिले म्हणाली–ह्याहून मोठा. अखेर बेडकी तिचे पोट फुटून मेली. परंतु पिलांचे काही समाधान झाले नाही.

अशा स्वरूपाची गोष्ट इसापनीतीत आहे. आम्ही ती येथे पुन्हा सांगण्याचे कारण हे की सध्या मुंबई महापालिकेचे ऑफिसर ऑन स्पेशल ड्युटी खैरनार ह्यांना त्यांच्या मूळ पदावर परत पाठविण्यात आले. त्यामुळे ह्या कथेची आम्हाला आठवण झाली.

आपल्याकडे कोणत्याही प्रश्नाचे उत्तर शोधताना प्रश्न आणि उत्तर ह्या पेक्षाही त्यांच्याशी संबंधित असलेल्या व्यक्तींचाच जास्त गवगवा होतो म्हणजे कसे तर मुंबापुरीतील अनधिकृत बांधकामाबाबत निश्चित भूमिका घेण्याऐवजी अशी सर्व बांधकामे करणाऱ्यांचे खैरनार हेच कर्दनकाळ आहेत अशी त्यांची प्रतिमा निर्माण होते. रिबेरीओ यांची नेमणूक झाल्याने आता पंजाबमधील दहशतवादाचा प्रश्न सुटणार अशा स्वरूपात बातम्या दिल्या जातात. राजीव गांधी पंतप्रधान झाल्याने देश नव्या दमाने एकविसाव्या शतकात जाणार अशी हवा निर्माण केली जाते. खरे पाहता प्रश्नांचे मूळ स्वरूप आणि त्यांची उत्तरे ही व्यक्तींमुळे कधीच बदलत नाहीत. सोडविण्याची पद्धती मात्र बदलू शकते.

खैरनार ह्यांची पद्धती अशी वेगळी होती. त्यांनी अगदी हिंदी चित्रपटात नायकाने दुर्जनांवर तुटून पडावे असे फेरीवाल्यांवर हल्ला चढवायला सुरुवात केली महापालिकेच्या अत्यावश्यक बांधकामासाठी झोपड्या हलविणे काय, किंवा अनधिकृत बांधकाम तोडणे काय, ह्यासाठी योजनापूर्वक काम करण्याची आवश्यकता असते. खैरनार ह्यांनी

ज्या ज्या ठिकाणी तोडफोड केली त्यात महापालिकेच्या गरजेपेक्षाही प्रसिद्धीचा भागच अधिक होता

माहीममध्ये दोन वर्षांनंतर त्यानी शालिनीताई पाटील याचे चिरजीव याच्या हॉटेलचे फुटपाथपर्यंत आलेले बाधकाम तोडले. त्याची सूचनाही त्यानी आदल्या दिवशी पत्रकाराना देऊन ठेवली होती. माहीम येथेच त्यानी चर्चच्या बाहेर फुटपाथवर उभारलेला क्रॉस कोणत्याही तऱ्हेची पूर्वसूचना न देता तोडून टाकला. घाटकोपरचे एशियाड नावाचे हॉटेलही त्यानी अशाच प्रकारे जमीनदोस्त करून टाकले, भेंडी बाजारात फेरीवाल्यावर पिस्तूल रोखून गोळीबार केला. ह्या साऱ्यांच घटनामुळे सर्वच वृत्तपत्रानी त्याना डोक्यावर उचलून धरले.

प्रश्न असा आहे की, ह्या सर्व प्रकारामुळे अनधिकृत बाधकामाचा आणि फेरीवाल्याचा प्रश्न कितपत सुटला ? पुढे पुढे तर खैरनार स्वत: फोन करून पत्रकाराना प्रत्येक घटनेची साग्रसंगीत हकिकत कळवित असत.

अखेर महापालिका आयुक्ताच्याही ध्यानात आले की अनधिकृत बाधकामापेक्षाही खैरनार याचा प्रश्न अधिक बिकट होत चालला आहे. ह्या महिन्याच्या सुरुवातीस हायकोर्टाने महापालिकेला माहीमचा क्रॉस आणि घाटकोपरचे हॉटेल हे दोन्ही पुन्हा उभारून देण्यास सांगितले.

खैरनार ह्याच्या बदलीची बातमी जाहीर करताना महापालिकेचे सहआयुक्त म्हणाले, 'He is busy reconstructing what he had earlier demolished.'

## एकूण एक दैवतं !

(स्थळ . सह्याद्री अतिथीगृह. चैत्रातला हळदी-कुकू समारभ थोड्याच वेळात सुरू होणार आहे. सगळ्या मिनिस्टराच्या बायका एका सुरात, एका तालात गातात )

गायकवृंद : झंडा ऊंचा रहे हमारा... झंडा ऊंचा, ला...ला...ला...ला...

(जेव्हा जेव्हा 'झंडा' हा शब्द येतो, तेव्हा तेव्हा जमलेल्या सर्वजणी कोपऱ्यात विराजमान झालेल्या मधु झेंड्याकडे वळून-वळून पाहतात. झेंडे तल्लीन होऊन मान डोलवू पाहताहेत. झेंडा-गीत सपते.)

अहिल्या रागणेकर : अध्यक्ष महोदया, माझा पॉइंट ऑफ ऑर्डर आहे...

कमल देसाई : अग, ही विधानसभा नव्हे. हा हळदी-कुकू सोहळा आहे.

अहिल्याताई : म्हणून काय झालं ? हा बायकात पुरुष लांबोडा कोण आहे ? हळदी-कुंकूसारख्या प्रोलितेरियेत समारभात ह्या मेल्या पुरुषाच काय काम आहे ?

सौ. रजनी सातव : अहो, ते इन्स्पेक्टर मधु झेंडे आहेत. मघाशी नाही का आपण झेंडा-गीत म्हटल ते याच्यासाठीच. (झेंडे मान डोलवतात.)

अहिल्याताई : म्हणजे भर हळदी-कुकू सोहळ्यात देखील आमच्यावर पोलिसाची नजर.

सौ. सातव : नाही हो. आज त्यांचा आम्हा सह्याद्री सोशल महिला सभेतर्फे सत्कार आहे.

मिसेस आलू छिब्बर : घणू सारू. भऊ मजा आवशे.

छाया दातार : मैत्रिणीनो—आता सौ. झेंडे मधुरावांच्या नावाने उखाणा घेतील.

सौ. झेंडे : समोर होता कोनाडा...

अहिल्या रांगणेकर : अध्यक्ष महोदया, हरकतीचा मुद्दा. माजी राज्यपाल कोना प्रभाकर राव याच्या नावाची टिंगल सौ. झेंडे करताहेत.

दुर्गा भागवत : अहो, कोनाडा म्हणजे काही कोना प्रभाकर नव्हे. मी जेलमध्ये असताना माझ्या कुबट, अंधाऱ्या सेलमध्ये कोनाडा होताच की.

सौ. झेंडे : समोर होता कोनाडा
त्यात बसला चार्ल्स
मधूरावाच नाव घेते
त्यात कसली लाज.

आलू छिब्बर : मढू, टू जवा चार्ल्सला ॲरेस्ट केला तवा टुला कसा वाटला ?

झेंडे : (लाजून चूर होत) मी चार्ल्सला पकडलं तेव्हा मला महाराष्ट्राची एकूणेक दैवत आठवली. शिवाजी महाराज, स्वामी रामदास, शंकरराव चव्हाण, जोगसाहेब, सोमणसाहेब, मच्छिंद्र कांबळी......

कमल देसाई : अध्यक्ष महोदया, एसेम् जोशींच नाव न घेतल्यामुळे मी सभात्याग करते.

('झेंडे मुर्दाबाद' असा नाद करत अहिल्या रांगणेकर, कमल देसाई जातात सभेत एकच गोंधळ होतो.)

रजनी सातव : अटेन्शन प्लीज. हे पहा, त्या अहिल्या रागणेकराच काही मनावर घेऊ नका. त्याना सवयच आहे रंगाचा बेरंग करण्याची. तर आता श्री. मधू झेंडे त्याच्या आगामी 'आग्रीपाडा से अग्वाडा' या हिंदी चित्रपटातल एक गाणं पेश करतील. म्हणून सर्वांनी स्वस्थ बसून घ्या. नतर ते चिकन चार्ल्स आणि शोभराज कूर्मा कस करायच त्याच प्रात्यक्षिक दाखवतील. तेव्हा सायलेन्स प्लीज.

(झेंडे कोळ्याच्या वेषात येऊन 'हाव सायेबा गोव्याक वता' या गाण्यावर नाचतात आणि सरोजिनी बाबर त्याच वेळी 'महाराष्ट्राच्या अस्मितेचा झेंडा—एक वेलाटी' हा प्रबंध वाचू लागतात आणि मंत्री चंद्रिका केनिया सगळ्याना आंबे-डाळ आणि पन्हं वाटू लागतात.)

—'महाराष्ट्रातील अर्वाचीन नाटुकल्या' या आगामी प्रकाशनावरून.

—विष्णु जयदेव

---

सांस्कृतिक नागपूर

---

## प्रभाकर चाफेकर—एक झपाटलेलं झाड !

'आमच्या शाळेत आम्ही नागपुरातल्या नव्या आणि जुन्या विद्यार्थ्यांतर्फे एक सगीत रजनीचा कार्यक्रम आयोजित केलेला आहे त्याला,तुम्ही जरूर या!' एक परिचित मला सांगत होते. 'कोणी आयोजित केला हा कार्यक्रम ?' मी विचारले. 'दुसरे कोण असणार ? प्रभाकर चाफेकर' परिचितानी सांगितले. एक साधासुधा नेहरू शर्ट आणि पैजामा ह्या पोशाखातली मूर्ती माझ्या डोळ्यासमोर आली. गेली तीस वर्षे नागपुरातल्या रसिकाना काहीतरी दर्जेदार आणि आगळ्या वेगळ्या गोष्टी द्याव्यात असा ह्या प्रभाकराचा अट्टाहास असतो. हातात सायकल आणि पायी गप्पा मारत मारत जाणारा

पृष्ठ ३१ वर

# बंगाली असोसिएशन : सभासदांशी गप्पा

( ' We ( Bengalis ) don't look to the rest of India, which is intellectually inferior. Our literature is related to French literature, not Hindi. Calcutta is like Paris. '

आनद बझारग्रुपचे सपादक–प्रोप्रायटर श्री. अवीक सरकार 'फार ईस्टर्न एकॉनॉमिक रिव्ह्यू'ला मुलाखत देताना म्हणाले. 'सडे ॲाब्झर्व्हर' दि. ५ एप्रिल १९८६ वरून साभार उद्धृत )

¤

डोंबिवली येथील बगाली बेटाचा शोध घेण्याचे ठरविले मित्रवर्य श्री. प्रभाकरपत वाळके ह्याच्या माहितीची काही बंगाली कुटुबे आहेत हे आठवले. त्याना घेऊनच बाहेर पडलो. रेल्वेत अधिकारी असणारे आणि ठाकुर्ली-डोंबिवली बंगाली असोसिएशनचे अध्यक्ष असणारे श्री. शैलेश भट्टाचार्य भेटले. त्यामुळे डोंबिवलीतील बगाली माणसाची, त्याच्या कार्याची सविस्तर माहिती मिळणे सुलभ झाले त्यानाही मनातून वाटत होते की आपल्या कामाची कोणीतरी दखल घ्यावी. त्यांच्या सस्थेने लाख–दीड लाख रुपये खर्च करून एक अद्ययावत् ब्लॉकच ग्रंथालय, सभा इ. नित्य आणि नैमित्तिक कार्यासाठी घेतला आहे. डोंबिवली पूर्व भागातील शिव मंदिर पथावरील त्या जागेत बसून त्याच्याशी बोललो. अनेक बंगाली स्त्री पुरुषाची ये जा चालू होती. ग्रथाची देवाण घेवाण, विचारपूस, चौकश्या होत होत्या. सस्थेचे चिटणीस श्री. मणीन्द्र भट्टाचार्यही मागाहून गप्पात सामील झाले. येणारे अनेक भद्रलोक गप्पात भाग घेत होते, माहिती पुरवीत होते. ज्याना पुरेसा मोकळा वेळ होता तेही ठिय्या माडून बसले. त्यातून उलगडला त्यांच्या डोंबिवलीतील कालचा, आजचा जीवनक्रम.

अनेक बंगाली कुटुबे डोंबिवलीत राहताहेत. मोठ्या धुमधडाक्याने दुर्गा पूजा साजरी होते. पण एकदरीत बंगाली माणसे डोंबिवलीच्या जीवनापासून अलग आहेत असे वाटते. त्याचे कारण काय म्हणून विचारल्यानंतर त्या दोघानी जी मीमांसा केली ती त्या ओघात इतरही जी माहिती मिळाली ती एकत्रितपणे देऊ इच्छितो. ते म्हणाले 'सुरुवातीला डोंबिवलीत, खरे म्हणजे ठाकुर्लीत अगदी मोजकीच कुटुबे होती गेल्या पंचवीस तीस वर्षांत वाढ होता होता आज ह्या दोन्ही गावातून तिनशे कुटुबे म्हणजे हजार ते बाराशे बगाली रहात आहेत. ही सारी नोकरी पेशाची माणसे. सकाळी उठून कामावर जाणार आणि सध्याकाळी थकून भागून घरी येणार. ती कसली. गावातील कार्यक्रमात भाग घेणार ? अहो खुद्द आमच्या ह्या असोसीएशनच्या कामात ती लक्ष घालीत नाहीत तर इतर गावाच्या चळवळीत ती काय पडणार ? आजचा डोंबिवलीतील बहुमल्य पांढरपेशा जे करतो आहे तेच ही बंगाली माणसे करीत आहेत गप्पांत भाग घेणाऱ्या आणि होमियोपाथीच्या डॉक्टरानी सागितले. 'हे मणीन्द्रबाबू डोंबिवलीतल्या प्रत्येक कुटुबात जाऊन आले आहेत त्यांचा जनसपर्क दांडगा आहे.' असे घरोघरी जाणारे उत्साही चिटणीस असल्यानंतर त्या संस्थेला आकार येणे अगदी साहजिक आहे.

तुम्ही वाचनालय चालविणे, दुर्गा पूजा उत्सव घडवून आणणे ह्या व्यतिरिक्त कोणते कार्यक्रम करता असे विचारल्यानतर त्यांनी आपण वर्षभर कोणते कार्यक्रम करतो हे अगदी तपशीलवार समजावून सागितले. ते म्हणाले 'प्रथम एक लक्षात घ्या की दुर्गा पूजेसाठी एक स्वतंत्र समिती आहे आणि ती समिती हा उत्सव साजरा करते आणि वर्षभराचे इतर कार्यक्रम आमच्या ह्या 'बंगाली असोसिएशन, ठाकुर्ली-डोंबिवली' तर्फे होतात. इ. स. १९५३–५४ पासून प्रथम ठाकुर्ली येथे आणि हल्ली डोंबिवलीतील कुलकर्णी मगल कार्यालयात हा उत्सव महाषष्टी ते महादशमी असा पाच दिवस करण्यात येतो ह्या उत्सवात अनेकविध कार्यक्रम होतात. नृत्य, नाट्य, सगीत इ. अर्थात धार्मिक कार्यक्रमाना सर्वाधिक महत्त्व असते. त्या निमित्ताने एक स्मरणिका प्रसिद्ध केली जाते. ही स्मरणिका इतर स्मरणिकाप्रमाणेच जाहिरातीनी खच्चन भरलेली असते. त्यातून सस्थेच्या कार्यासाठी आवश्यक तो पैसा उभा राहतो. ह्या उत्सवाला झाडून सारी बगाली लहान थोर मडळी उपस्थित राहतात. ह्या उत्सवाशिवाय आमची सस्था स्वत चे असे पुढील कार्यक्रम घडवून आणते. वैशाख प्रतिपदा ह्या बगाल्याचा नववर्ष दिन. त्या दिवशी एकत्र जमतो आणि साऱ्याना बगाली दिनदर्शिका वाटतो. बगाली माणूस आणि रविंद्रनाथ ठाकूर ( टागोर ) ह्याचे नाते ही एक नाजूक बाब आहे. बगाली सगीत म्हणजे आज रवींद्र सगीत असे समीकरण झाले आहे बगाली भाषा आणि सस्कृती धर्मभेदाच्या पलीकडे गेली आहे. त्याचे जिवत उदाहरण म्हणजे बागला देश हे आहे. 'रविंद्र सगीत ऐकायला मिळाले आणि माणसात आलो' असे उद्‌गार बागला देश झाल्यानतर नभोवाणीवरून ऐकू आलेल्या रवींद्र सगीत श्रवणानतर निघाले. अशा रवींद्रनाथाची आणि महाकवी नझरूलची जयती साजरी करतो. दिवाळीच्या दिवसात साजरी होते कालीपूजा. त्या दिवशी रात्री बारा ते पहाटे चारपर्यंत बगाली सिनेमा खासकरून दाखविला जातो. बगाली माणूस कोजागिरी पौर्णिमेला लक्ष्मीपूजा करतो वसत पचमी हा दिवस सरस्वती पूजनाने साजरा करतो. २६ जानेवारी हा गणतत्र दिवस खेळाच्या स्पर्धा आयोजित करून मोठ्या उत्साहाने पार पाडतो. त्याशिवाय अखिल भारताला ललामभूत ठरलेले छत्रपती शिवाजी महाराज, नेताजी सुभाषचद्र बोस, स्वामी विवेकानद आणि रामकृष्ण परमहंस ह्याचे जन्मदिन आम्ही पवित्र मानतो. त्याच्या जन्मदिनी त्या थोर पुरुषाची, त्याच्या कामगिरीची आठवण काढतो, त्याचे पुण्यस्मरण करतो. त्याच्या मोठेपणाला साजेसे कार्यक्रम आखतो.

### भोग आणि प्रसाद

पावसाळ्याचे तीन–चार महिने वगळले तर आम्ही दर महिन्यातून धार्मिक किंवा

राष्ट्रीय महत्त्वाचे कार्यक्रम करीतच असतो. धार्मिक कार्यक्रमांचा वाटा जास्त असतो. ते ओघात सांगू लागले. त्यांना अडवून मी विचारले, 'बंगाली माणूस हा डाव्या, मार्क्सवादी विचारांचा असतो असा एक सर्वसाधारण समज आहे. मग हे धार्मिक कार्यक्रम कसे काय होतात?' श्री. शैलेश भट्टाचार्यजी म्हणाले, 'मी स्वतः ह्या कर्मकांडांच्या, धार्मिक विधींच्या विरोधी आहे; पण मी त्यात भाग घेतो. बंगालमधील कोणत्याही विचारांचा माणूस असला तरी तो अशा धार्मिक कार्यक्रमांत सहभागी होतोच.' मला वाटते, हा जनसंपर्काचा सर्वात चांगला मार्ग ते समजत असावेत. आपल्याकडील समाजवादी (महाराष्ट्रातील) जनतेपासून अलग पडले, पडत आहे त्याचे हेही एक कारण असावे. अशा ह्या कार्यक्रमाच्या वेळी 'भोग आणि प्रसाद असतो.' त्यात नेमके काय देतात, मी विचारले. ते सांगू लागले, 'आमच्याकडे विविध फळांचा प्रसाद दिला जातो. प्रत्येक महत्त्वाच्या, कित्येक तास चालेलेल्या कार्यक्रमानंतर भोग, म्हणजे खिचडी असतेच. माणसे पोटावरही चालतात. जेवण्यासाठी घरी जावे लागू नये ही दृष्टीही त्या मागे असावी. असा विचार माझ्या मनात आला. 'तुम्ही सारी माणसे खरेच गुण्यागोविंदाने एकत्र काम करता का? तुमच्यातही काही जणांचे पटत नसावे. ते काय करतात?' मी माझा नेहमीच्या मराठी अनुभवाचा प्रश्न टाकला. ते म्हणाले, 'आमच्यातही वाद होतात, मतभेद होतात, गैरसमज होतात, कटुता येते. त्यासाठी दुर्गापूजा महोत्सवातच आमचा 'आलिंगन' देण्यादेण्याचा कार्यक्रम असतो. त्या कार्यक्रमानंतर एकमेकातील गैरसमज किंवा कटुता विसरून मित्रत्वाच्या भावनेने प्रत्येकाशी वागायचे असते.

'तुमच्या ह्या कार्यक्रमात स्त्रियांचे असे खास कार्यक्रम असतात का? महिला मंडळ आहे का?' माझी शंका त्यांच्यापुढे व्यक्त केली. ते म्हणाले 'दुर्गापूजाप्रसंगी 'सिंदूर' नावाचा (म्हणजे मराठी हळदीकुंकू समारंभ) समारंभ खास स्त्रियांसाठी वेगळा कार्यक्रम असतो. गेले काही दिवस आमच्यातील काही महिलांनी स्वतंत्र संस्था, 'भगिनी मंडळ' असावे अशी मागणी करावयास सुरुवात केली आहे. त्या मागणीला येत्या काही महिन्यात मूर्त स्वरूप येईल.' त्यांच्या सुरावरून ते ह्या कल्पनेला फारसे राजी नसावेत असे मला (उगीचच) वाटले. पण तो प्रश्न मी धसाला लावला नाही.

'ह्या कार्यक्रमांशिवाय तुम्ही इतर कोणते कार्य करता' असे विचारल्यावर त्यांनी सांगितले. 'अधूनमधून आम्ही रक्तदान शिबिरे आयोजित करतो. त्याला चांगलाच प्रतिसाद मिळतो. आमची मुले इंग्रजी माध्यमाच्या शाळेत जातात. घरी बंगालीतून व्यवहार होतो म्हणून त्या मुलांना बंगाली बोलता येते, समजते पण वाचता येत नाही. त्यासाठी गेल्यावर्षीपासून आम्ही (इतरांच्याही सोयीसाठी, इतरांनीही शिकावे म्हणून) बंगाली भाषेचे वर्ग सुरू केले आहेत. नाहीतर आमची मुले बंगाली वाचू, लिहूच शकणार नाहीत अशी भिती वाटते.'

'ह्यापुढील योजना कोणत्या आहेत आणि त्यासाठी निधी कसा उभा करणार आहात.' गप्पांचा समारोप करता करता नेहमीचा प्रश्न विचारला. हा प्रश्न ऐकताच मोठ्या उत्साहाने ते सांगू लागले 'आम्हाला गावातच, स्टेशनपासून जवळ अशी जमीन (प्लॉट) हवी आहे. त्यासाठी अनेकांच्या भेटीगाठी घेतल्या पण अजून यश आले नाही. ही जमीन मिळाली की तेथे एक कालीमातेचे मंदिर, बंगाली माध्यमाची शाळा आणि एक भव्य सभागृह (कम्युनिटी हॉल) बांधावयाचे आहे. आत्तापर्यंत सदस्यांकडून वर्गणी, देणग्या, जाहिराती इ. मार्गाने जो पैसा गोळा झाला त्यातील फार मोठा भाग ह्या जागेसाठी खर्च झाला आहे. काही निधी दीर्घ मुदतीच्या ठेवीत गुंतविला आहे. त्याच्या व्याजातून गरीब विद्यार्थ्यांना मदत देतो. आमचे सभासद सढळ हाताने निधी देतात. आम्ही काटेकोरपणे खर्च करतो, हिशोब ठेवतो. भावी योजनेसाठी लागणारा पैसा उभा करू शकू असा पूर्वानुभवावरून विश्वास वाटतो आहे.' त्यांना त्यांच्या भावी कार्यात शुभेच्छा देऊन त्यांचा निरोप घेतला.

डोंबिवलीतील बंगालची तरुण पिढी अजून उदयाला आली नाही. ती उद्याची तरुण मुले डोंबिवलीच्या जनजीवनाशी एकरूप होणार की आपला अलगपणा कायम ठेवणार हे कालांतरानेच कळेल. आज नोकरीसाठी, पोटासाठी हिंदुस्थानभर पसरलेला बंगाली माणूस अवीक सरकारच्याच वर उद्धृत केलेल्या विचारांसारखाच असेल तर? हे प्रश्नचिन्ह उद्याच्या एखाद्या उग्र प्रश्नाची सुरुवात ठरू नये ही इच्छा. एखाद्या समाजाला स्वतःबद्दल अभिमान असावा, गर्व असावा पण इतका?

—चंद्रशेखर राजे


एका बाजूने
रशियन रणगाडे
झेपावत असताना,
कोणत्या जीवनमूल्यांना
आवाहन करून वालेसाने
पोलिश जनतेचा
लढा उभा केला?

त्या लढ्याचे चित्रण –
मराठीत प्रथमच.

लेक वालेसा
डॉ. श्रीकांत मुंदरगी
बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

श्याम बेरकी आहे
तसाच मिश्किल.
तो मध्यम आकाराचा,
मध्यम विकारांचा, मध्यम
वर्गातला, मध्यम बुद्धीचा आहे.

त्याच्या संसार कथा.

काही दिवस श्यामचे काही राधाचे
फिरोझ रानडे
पंचवीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे – ३०.

# भारत जोडो : बाबा आमटेंबरोबर पंजाबात (२)

जगदीश गोडबोले

आनदपूर साहिबची रात्र कमालीची अस्वस्थ गेली. दिवसभरात जे काही ऐकले–पाहिले त्याचे प्रतिसाद कळत न कळत मनात उमटत होते दिल्लीतल्या दगलग्रस्ताची खुन्नस समजू शकत होतो. 'ब्लू स्टार ऑपरेशन' व पोलिसी 'एनकौंटर'मध्ये कामी आलेल्या लोकाच्या जिवलगाची नफरतही कळत होती. पण एका बाजूला भाईचारा आणि मानवतेचे गुणगान करणारे, जरा खरवडल्यावर ज्याप्रकारे 'रिॲक्ट' होत होते ते जास्त अस्वस्थ करणारे होते. गुरुद्वारातले जे थोडे फार शिकलेले, बाहेरचे जग बघितलेले होते ते सर्व गोंधळाला अतिरेक्यांना जबाबदार धरत होते. त्याच्यातील आणखी हुशार होते त्यानी पाकिस्तानी हेराची थेअरी शोधून काढली होती आणि 'होलामोहल्ला'गोंधळानतर जवळच्याच खेड्यात दोन पाकिस्तानी हेर पकडले गेल्याचे ते सागत होते. 'अजि वह जासूस–बिसूस कोई नही थे–' त्याच्यातीलच एका ग्यानबाने मध्येच तोड घालताच त्याला डोळे वटारून गप्प बसवले होते.

मला आमच्यातील सरदार भगवान सिहजीनी सागितलेली गोष्ट आठवली. सरदार साहेब विदेश सेवेत होते. ( Indian Foreign Service ) नोकरी सोडली आणि अमरावतीला शिवाजीराव पटवर्धनांबरोबर कुष्ठरोग सेवेला लागले. माणूस कमालीचा धार्मिक–रादर मानवतावादी. पंजाबमध्ये हिंसाचाराला सुरुवात झाली. प्रवाशाना बसमधून उतरवून मारण्यात आले वगैरे बातम्या वाचून अतिशय अस्वस्थ झाला आणि पहिली गाडी पकडून अमृतसरला आला. सुवर्णमंदिरात उपोषण करण्याच्या इराद्याने. उपोषणाअगोदर सत लोंगोवालजींची भेट घेतली. (तीन वर्षापूर्वीची गोष्ट) सांगितलं, 'सतजी, मी भारतीय विदेशी सेवेत गेली तीस वर्षं आहे. वेगवेगळ्या पदावर काम केल; पण केवळ शीख म्हणून माझ्यावर कधी अन्याय झाल्याचं–

'किसी हिंदुने पढाके भेजा है आपको–' सतजीनी मुलायम शब्दात विचारलं!

या सगळ्या सत महंताच्या गदारोळात पजाबच्या धर्मकारणाचा आणि पर्यायाने राजकारणाचा येळकोट झाला आहे. मुख्यमंत्री बर्नाला याची प्रतिमा सज्जन पण कमजोर मुख्यमंत्री अशी आहे. अर्थात दोष त्यांचा नाही. पंजाब करार करून राजीव गांधीनी एक ऐतिहासिक क्षण साधला होता. २६ जानेवारीला चदीगडचे हस्तातर हा त्या कसोटीचा परमोच्च क्षण होता. तो क्षण साधला असता तर अतिरेक्यांच्या शिडातील हवा गेली असती, पण तो ऐतिहासिक क्षण हातातून निसटला आणि अतिरेक्याना, देशद्रोही ( खलिस्तानच्या ) विश्वासघातकी लोंगोवाल–बर्नालाना झोडपायला चागले कोलीत मिळाले! रस्त्यावर भेटलेले सुरजित–मनजित पण नेमके याच वर्मावर बोट ठेवत होते.

आनदपूरसाहिबवरून हिमाचल प्रदेशातील उनाला जाताना वाटेत जरा वाकडी वाट करून भाक्रा धरणाला भेट दिली. भाक्राचे बाधकाम चालू होते तेव्हा पाहिले होते. आता हे तीर्थशील्प पूर्ण झाल्यावर पहिल्यादाच आलो होतो. पवना धरणाच्या भागात काम करायला लागल्यावर व एकूणच धरणामुळे होणाऱ्या विकासाच्या प्रश्नामध्ये जरा तोंड घुसायला लागल्यावर या आधुनिक तीर्थक्षेत्रावरील विश्वासाला जरा धक्का बसला होताच. शिवाय सतलज नाही तरी रावी–वियासच्या प्रश्नावरून पजाब–हरयाना राजस्थानमध्ये जी तणातणी चालू आहे त्यावरून भीती वाटते, उद्या त्या पाटातून पाण्याऐवजी रक्ताचे लोट वहातील!

पजाबची सीमा ओलांडून घटकाभरापुरता ( मुक्कामापुरता ) हिमाचल प्रदेशात प्रवेश केला आणि वातावरणातील बदल एकदम जाणवला. आमचा काफिला रस्त्याने जाताना वा थाबल्यावर पंजाबमध्येही लोक बोलत, पण अतिशय जपून–दबून आजुबाजूला पहात. प्रत्यक्ष दहशतीपेक्षा त्याची नुसती भीती भयकर असते. हिमाचलमधले स्वागत त्या मानाने खूप मन–मोकळे होते. वास्तविक उना जिल्हा तसा पजाबने वेढलेला, दोन दिवसापूर्वीच तिथे शीख यात्रेकरूची पगडी–केश उतरविण्यावरून तणाव निर्माण झाला होता; पण लोकाच्या काय सरकारी स्वागतामध्येही उत्स्फूर्तता होती. बाबाची रहाण्याची व्यवस्था सरकारी अतिथीगृहात व आमची एका गुरुद्वारात केली होती; पण बाबा इतर साथीदारांबरोबरच रहाणे पसद करतात म्हटल्यावर अख्खे सरकारी अतिथीगृह खाली करून देण्याची ऑफर डी. सी. साहेबाना दिली एवढा मोठा निर्णय 'वरून आदेश' आल्याशिवाय घेणे म्हणजे कमालच झाली. कदाचित् उद्या–परवा होईल चौकशी थ्रू प्रॉपर चॅनेल!

पण मला सगळ्यात गमत वाटली आमच्यातील सक्सेना चाच्याची ब्रिटनमध्ये हयात गेली. हिमाचल प्रदेशच्या प्रेमात पडले म्हणून आता तिथंच रमले. बाकी काही लागाबाधा नाही; पण हिमाचल प्रदेशात जोरदार स्वागत झाल्यावर चाचाजी एवढे खूष झाले की एरवीचा तसा शात–धीमा माणूस बाबाच्या बसला लोंबकळून किंवा जोरजोरात 'जोडो भारत' चे नारे लावून आपली खुषी मनवत होता.

घोषणावरून सहज आठवल आपला प्रातिक अभिमान किती खोलवर रुजलेला असतो. 'जोडो भारत' ही यात्रेची प्रमुख घोषणा. मग एखाद्या सभेत निरनिराळ्या भाषेत तिची तामिली व्हायची. उदाहरणार्थ तामिळनाडूच्या मुदलवनने 'ओरिंगिणिप्पू ऽ ओरिंगिणिप्पू

भारत नाडे ओरिंगिणिप्पू– म्हणून नारा लावला की लगेच तेलगु देशमचा ( आय मिन आध्रचा ) अकबरअली कलपंडी ऽ कलपडी, भारत देशम् कलपडी– म्हणून सूर

लावायचा. एकदा हे भारत जोडो चालू झाले की सर्व हजर राज्यांची यात्रा पूर्ण करूनच थाबायचे. मध्येच एखादे राज्य राहिले की लगेच तिथले यात्रिक आरोळी ठोकायचे. त्यामध्ये स्पर्धा आणि इर्षा दोन्ही असायची !

उनाचा मुक्कामही गुरुद्वारामध्ये होता. पण वातावरण मोकळे. म्हणजे सिगरेट वगैरे ( वगैरे सिगरेटच ! ) ओढायची असेल तर जरा बाहेर जायचं आणि मोकळी हवा खायची ! बाकी ठिकाणी सारखी भीती. फट् म्हणता ब्रम्हहत्या नको. एकेक धमाल असते. आपल्या गुरवायूर वा कन्याकुमारीच्या मंदिरात जायचे म्हणजे कमरेच्या वरचे सोडून जायचे (जाऊ द्या. पण त्यातही लुंगी सफेत पाहिजे. या उलट शबरी मलईच्या अय्यप्पांच्या दर्शनाला जाताना कमरवस्त्र काळे पाहिजे. त्यातून ओलेते. अय्योय्यो. पचाईतम्) मशिदीत जाताना डोक आणि गुडघे झाकले पाहिजेत. तर गुरुद्वारात फक्त डोक झाकल तरी चालत. आम्ही हा रिवाज इमानाने पाळायचो. पण आफत होते लंगरमध्ये प्रसादाला जाताना. सामान बाहेर ठेवलेलं. खिशात जेमतेम हात पुसायचा रुमाल. (तोही बहुधा दुसऱ्याचा ढापलेला ) एक वेळ डोंबाऱ्याच्या दोरीवरून शीर्षासन करून चालत जाणे सोपे, पण डोक्यावरचा हा असला रूमाल साभाळत प्रसाद सेवन करणें महाकठीण. कारण एका हाताने रूमाल साभाळत प्रसाद घेतला तर वाढणारा सेवेकरी डोळे काढणार, कारण ' प्रसाद ' दोन्ही हाताने घेतला पाहिजे. दोन्ही हात पुढे केले तर रुमालाची शाश्वती नाही. आनंदपूर साहिबच्या लंगरमधली डाळ एवढी लाजवाब झाली होती, पण तेहतीस कोटी देवाशप्पथ सांगतो, ती घड खायची काही हिंमत होईना. सारखा सुटणारा रुमाल आणि वाढणाऱ्याच्या कमरेची कटयार सतावायची. उगाचच नाही रामदासानी म्हटल आहे, ' उदरभरण नोहे जाणिजे यज्ञकर्म ! ' बहुधा पंजाब–यात्रेनंतरच त्याना हा बोध झाला असावा.

पंजाब–यात्रेमध्ये आमच्या जीवाला धोका या असल्या गोष्टीकडून आहे. सर्वात धोका अतिरेक्याच्या गोळयाचा नाही तर पंजाबी यजमानाच्या जबरदस्त पाहुणचारचा आहे. दिवसाच्या वाटचालीत किमान दोन–तीन ठिकाणी तरी सामोसे–पकोडे' बर्फी–जिलेबी बिस्कीटस् लस्सीचा ' मामुली ' नास्ता होतोच. वरती परत तंदुरी रोटी-पुलाव-डाळ सब्जीचा ' मामुली ' खाना. वर खास पंजाबी मिठास आग्रह. झगडा-लढाई चलती रहेगी. खानेमे कसूर नही. असो.

### वेध होशियारपूरचे

अंबाल्याहून निघाल्यापासून सारखी उलट सुलट चर्चा ऐकत होतो–खरा आतंकवाद कुठे आहे शहरात की खेड्यात ? काही (शहरी) लोकांचं म्हणणं पंजाबातील खेड्या तून मुख्य वस्ती कडव्या जाट शिखाची. आतकवाद्याचे खरे साथीदार हे जाट शीख. शहरातील शिखाचा व्यापारी वर्ग कॉंग्रेस आयच्या बाजूचा पंजाबमधील आतकवादाची खरी माहिती घ्यायची असेल तर खेड्यातील या जाट शिखाना भेटा.

होशियारपूर जवळील चकसाधु गावी लगेचच ही संधी मिळाली. माधा–सुधा जाट शीख नाही तर प्रत्यक्ष जर्नेलसिंगच सामोरे आले. सहा फूट उंची. धिप्पाड शरीर. डोक्याला काळी पगडी. बघता क्षणीच दरारा वाटेल असा रूबाब. पण स्वारी महामिश्किल निघाली.

जर्नेलसिंग साहेबांनी आपली ओळखच करून दिली. ' आय ॲम जर्नेलसिंग–'

मग क्षणभर थांबून मिश्किलपणे हसत म्हणाले ' नॉट जर्नेलसिंग भिंद्रनवाले बट जर्नेलसिंग बाजवा-कमांडर इन इंडियन नेव्ही' कमांडर साहेब नेव्हीमध्ये असले तरी घर दार गावाकडे. गावातील घडामोडींकडे बारीक लक्ष व भरपूर रसही. आतकवादाचा विषय काढताच म्हणाले चलिये तो हमारे साथ कही भी देखो तो ये आतंकवाद कितना है. पिछले दफा मैं यहाँ से बंबई गया. वहाँ जाके उतरा, तो सभी अखबारो मे खबर पंजाब जल रहा है. कुछ छुट-फुट बाते जरूर होती है, मगर पंजाब जलाना इतना आसान नही–'

कमांडर साहेबांचं खरं दुःख होतं आज पंजाबच्या शूर बाजिंद्याला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं करून देशभक्ती सिद्ध करावी लागत आहे त्याचं सांगत होते लखनौला बास्केट बॉलची मॅच खेळायला गेलो होतो मधल्या विश्रांतीच्या वेळी इतर खेळाडू मुद्दाम डिवचाव तसं विचारत होते, ' क्यू सरदार खलिस्तान चाहिये,तो यहाँ क्यू आए? अगर भारत टूटेगा तो इस वृत्तीके कारण टूटेगा. '

शेजारी उभ्या असलेल्या सरदार हरभजन सिंगाची प्रतिक्रिया आणखी कडवट होती. आपल्या भरदार दाढीवर हात फिरवत ते म्हणाले ' अगर शिख्ख बाजिंदा देशप्रेमी नही है तो इस भारतमे कोई भी देश भगत् नही है ! '

दोष जर्नेलसिंगाचा नाही, हरभजनसिंगाचा नाही, तर कोणत्याही गोष्टीचे सरसकट सार्वत्रिकरण करणाऱ्या आपल्या बालबुद्धीचा आहे. केवळ सर्वसामान्य माणसं नाही तर चांगली शिकली सवरलेली माणसंही जेव्हा एखाद्या जाती वा जमातीवर सामूहिक दोषारोप करतात तेव्हा खरे दुःख होते. एकतर ही बालबुद्धी, त्यातून भारत नावाच्या आपल्या देशाबद्दलचे प्रचंड अज्ञान. मी छातीठोकपणे सागतो नर्मदेच्या उत्तरेच्या कोणालाही विचारा, दक्षिणेला कोण रहाते वा कोणती भाषा बोलली जाते. एकजात उत्तर येईल–मद्रासी ! बस्स्. आसामच्या पूर्वेचे सर्वजण आपल्याला चिनी–जपानी वाटतात. पंजाबबद्दलही तीच गोष्ट पुण्यात सर्व विद्वानच रहातात असा जसा (गोड) समज आहे, तस पंजाबमध्ये रहाणारे सर्व शीख आहेत असा बहुसंख्य लोकांचा समज आहे. वास्तविकतः पंजाबमध्ये शीख आणि पंजाबी हिंदू यांचे प्रमाण सुमारे ६०–३५ % आहे. त्याच्यातही परत सतराशे साठ सत–पंथ आहेत. पण हे वास्तव समजून न घेता आपण केवळ ठोकळ कल्पना करून बोलत असतो.


उनाहून निघाल्यापासून वेध लागले होते होशियारपूरचे. कारण खबर लागली होती तिथल्या तंग वातावरणाची. पण ते होशियारपूर राहिले दूर. तूर्तास पब्लिकची हालत तंग केली होती उनाच्या उभ्या घाटाने. घाट नुसता उभा नाही तर जागोजाग दरडी कोसळून धोकादायक झालेला. नाही म्हटलं तरी पाच हजार किलोमीटर्स पार करणाऱ्या सायकल वीरांना घाटाने हैराण केलंच पण त्यातही काही बहाद्दर निघालेच. ' पंगुम् लघयते गिरी ' हे वचन पुस्तकात नुसते वाचलेले वा पाठ केलेले. पण पुण्याचा बाबासाहेब सूर्यवंशी केवळ एका पायाच्या जोरावर ही बिकट वाट पार करताना पाहिला आणि आपण तर खलास झालो. बाबासाहेब आणि निपाणीच्या रेणुका पाटणकर तीन

मुलांची ही आई कन्याकुमारीहून निघाल्यापासून अजून एकदाही सायकल सोडून जीप वा बसमध्ये बसली नाही. आता घाटात ही ' घाट की रानी ' रेणुकाही थी !

उनाचा घाट ओलांडून होशियारपूरमध्ये प्रवेश केला मात्र आणि सर्व नूर एकदम पालटला. गावात कर्फ्यु होता, त्यामुळे सर्व रस्ते मोकळे सुनसान होते. आम्ही घोषणा द्यायला सुरुवात केली मात्र, दारा-खिडक्यातून डोकावणारी माणसंही सुरुवातीला घाबरून पटापट आत पळायची आणि मग हळूच बाहेर डोकवायची. मागेपुढे पंजाब पोलिसांच्या पाच–दहा गाड्या, जागोजाग नाक्या नाक्यावर शस्त्रधारी पोलिसांचा खडा पहारा अशा थाटात अखेर आमच्या स्वाऱ्या होशियारपूरच्या शक्ती मंदिरात पोहोचल्या. हे शक्ती मंदिर अखेर हिंदू शिवसेनेचा बालेकिल्ला निघाले.

पंजाबमध्ये बहुसंख्य हिंदूंची वस्ती शहरातून आहे. होशियारपूर तर पंजाबी हिंदूंचा बालेकिल्ला. गेल्यावर्षी येथील लोकदलाचे खासदार चौधरी बलवीरसिंगाची अतिरेक्यांनी हत्या केली होती. त्यातून दोन दिवसांपूर्वीच लुधियानाला हत्याकांड घडलेले, त्यामुळे नुसती ठिणगी पडायचा अवकाश. सहाजिकच पंजाब पोलीस काही धोका पत्करायला तयार नव्हते. गावातही आमच्या सभेला बंदी घातली होतीच, पण सर्व मिळून फक्त तीस कर्फ्यु पासेस दिले होते. त्यामुळे लोक जाम संतापून होते. पंजाब पोलिसांना– म्हणजे शीख पोलिसांना शिव्यांची लाखोली वहात होते.

ही शीख पोलिसांची भानगड इथे आल्यावरच समजली. लोकसंख्येच्या प्रमाणात बघितलं तर पोलिस–दलात शीख–हिंदूंचे प्रमाण किमान तीनास एक तरी पाहिजे होते. पण जमलेल्या लोकांचे म्हणणे होते की पोलिसमे सबके सब सरदार भरे है. ब्ल्यू स्टार ऑपरेशननंतर सैन्यातून पळालेल्या शीख सैनिकांचे ' पुनर्वसन ' वर्नाला सरकारने पोलीस दलात केल्याची आतली बातमीही लोक छातीठोकपणे सांगत होते. पंजाबी हिंदूंची ही तक्रार तर बाहेरून आलेले 'हिंदू' केंद्रीय राखीव पोलीस आमच्यावर जास्त दात खाऊन आहेत ही शिखांची भावना. केवळ लोकच नाही तर एकटा–दुकटा



एअर चीफ मार्शल अर्जुनसिंग (निवृत्त) आणि बाबा आमटे

पोलिसही खाजगीत हेच बोलून दाखवायचा. सर्वात कहर झाला रात्री पहाऱ्याला असलेल्या केंद्रीय पोलिसांच्या तुकडीचा. जरा सामसूम झाल्यावर आसाम–बंगाल–बिहार–महाराष्ट्रातील या 'आंतर-भारती' तुकडीतील जवान बाबाच्या दर्शनाला आत आले आणि बोलता–बोलता सहज बोलून गेले ' सभीका साथ इकठ्ठा होनाही अच्छा है, किसी का क्या भरवसा ! ' काय बोलणार !

होशियारपूरचा कार्यक्रम केवळ ' दर्शना'-वरच आटपावा लागला. पोलिसांची नजर चुकवून बाया–बापड्या– पोरं – बाळं मंदिराच्या भिंतीवरून उड्या मारून दर्शनाला आत येत होती. ' बाबा महाराजां ' वर फूल-पैसे अर्पण करून साष्टांग लोटांगण घालीत होते. उपदेशामृताची याचना करत होते. बिचारे बाबा तरी काय बोलणार ! आला प्रसंग आपल्यापरीने साजरा करीत होते. सगळा सोहळा बघून भारावलेल्या एका पोलिसाने विचारले बाबाजोका मठ कहाँ है मेलेमे जरुर आना चाहिये. विलासची आयडिया चांगली. आनंदवनाचेच ' डेराबाबा ' नामकरण करून टाकूया !

बाकी होशियारपूर आनंदपुरसाहिबचीच आवृत्ती होती. फरक एवढाच गुरुद्वाराच्या जागी मंदिर होते आणि शिखांच्या जागी हिंदू होते. बाकी सूडाची, एकाचा बदला दहांनी घ्यायची भाषा तीच. काय इतिहासाचा सूड आहे. याच पंजाबने केवळ चाळीस वर्षांपूर्वी फाळणीचे दुःख भोगले आणि तेव्हा सुखदुःखाला सामोरे गेलेले भाई-भाई आज पंजाबचे आणखी तुकडे करायच्या तयारीला लागले आहेत. हे दुष्टचक्र कधी आणि कसे संपणार कळत नाही !

होशियारपूरहून आमचा काफिला बाहेर पडला एकदम मिलिटरी स्टाइलमध्ये. आगे–मागे–पुढे पोलिसांच्या गाड्या. दुतर्फा शस्त्रधारी जवानांची खडी फौज. कोपऱ्या-कोपऱ्यावर वॉकी–टॉकी. शेवटी मलाच वाटायला लागलं की आपण ' भारत जोडो ' यात्रेऐवजी एखाद्या युद्ध-मोहिमेवर निघालो की काय. फक्त ' फायर ' हुकूम करायचाच अवकाश, बंदुकीच्या गोळ्यांची सरबत्ती झडली असती. वाटेत आदमपूर–वायूसेनेचा मोठा अड्डा. भारत–पाक युद्धात गाजलेले. म्हणजे एअर कव्हरपण घेता आले असते.

गाव संपले आणि खड्या जवानांची जागा घेतली निलगिरीच्या तगड्या फौजेने. रस्त्याच्या दुतर्फा पाच–पाच, सहा-सहा झाडांच्या रांगा. पंजाबमध्ये सुरुवातीला

सर्वदूर शिसूची झाड आणि आता निलगीर किंवा सफेदाची झाडं. शेतामध्येही अधुन-मधून सफेदाची बेट. कुठेही नजर टाका मोकळी जागा नजरेला पडायची नाही.

जलदरचा मुक्काम दुआबा कॉलेजमध्ये. बाबाची वार्ताहर परिषद तिथेच होती. प्रेसवाल्यांनी यात्रेला जोरदार प्रसिद्धी दिली होती. जलदर वर्तमानपत्रवाल्याचा अड्डाच. पजाब केसरी, हिंद समाचार, जनवाणी, अजित, मिलाप असे डझनावारी पेपर जलदरहून प्रकाशित होतात. वार्ताहर परिषदेला भरगच्च गर्दी होती नेहमीचे औपचारिक प्रश्न सपले नी वाटल की आता काही अस्सल वार्ताहारी सवाल-जबाबाना सुरुवात होईल. पण बाबाची गमत आहे. बाबाच कशाला आपल्या एकूण समाजाची गमत आहे-तिथे सभाषण, प्रश्नोत्तर घडतच नाही. होतो मोनोलॉग. अर्थात आताची परिस्थिती वेगळी होती. वातावरण स्फोटक. अर्थाचा अनर्थ व्हायचा सभव. मग चदीगड-प्रमाणे इथेही बाबानी आपली 'येस्' (Youth Emergency Services) आणि 'पुश्' (People United for Serving Humanity) ची कल्पना सविस्तरपणे माडली सुरुवातीच्या सरबत्तीतून सावरलेल्या पत्रकारानी मग विषय काढला बटालाचा! बटालाला आम्ही जाणार होतो. पण या बहुसख्य हिंदू वस्तीच्या गावाला ऑल इडिया शीख स्टुडंट फेडरेशनच्या लोकानी सपूर्ण वेढा घातला होता. सतत चार दिवस गावाचे दूध-पाणी-भाजी-पाल्याचा पुरवठा बद. गावात जायला कोणालाही परवानगी नाही. शेवटी बाबानी जाहीर करून टाकले वेढा घालणाऱ्यांची समजूत काढण्याचा आम्ही प्रयत्न करू. पण त्याला अपयश आले तर तसेच बेधडक आत जाऊ. अडविणाऱ्याना पण कळेल. 'यह मस्ताने भी सरपे कफन बांधकर निकले है -'

शेवटी गाडी आतंकवाद्याच्या वळणावर आलीच. आपल्याला आतकवाद्याना भेटण्याची इच्छा आहे व वर्तमानपत्रात त्याला ठळक प्रसिद्धी मिळावी अशी बाबाचीही इच्छा होती. पण प्रेसवाले सारखे सांधा बदलण्याच्या प्रयत्नात होते. बाबांनी भिद्रनवाल्याचे वडील बाबा जोगिदरसिंहाना भेटायची इच्छा प्रदर्शित केली. लगेच वार्ताहरानी विचारल - 'तुम्ही बाबा जोगिदरसिंहाना आतकवादी म्हणून भेटणार का?' बाबाही महावस्ताद. 'मी त्याना दोन जवान मुलाच्या मरणाचा आकात झालेला दुःखी बाप समजतो.' वार्ताहर परिषद आटपली.

मात्र उत्सुकता होती 'पजाब-केसरी'ला भेट देण्याची. पंजाब केसरी हे पजाबमधले जुने-जाणिते वर्तमानपत्र. खप सात लाखाचा. उर्दू हिंद समाचार आणि पजाबी भाषेतील जनवाणी ही पजाब-केसरीचीच भावडं. प्रचड खप तसेच वादग्रस्तही. भारत-पाकिस्तान फाळणीला पजाब केसरीने खादा दिला होता आणि आता पंजाबचे हिंदू-शीख तुकडे करायला 'यह तुला हुआ है इसे बद करो, आधा झगड खतम् हो जायेगा -' अशी कडवट प्रतिक्रिया ऐकली होती. प्रतिक्रिया नुस्ती मौखिक नव्हती तर सपादक लाला जगत् नारायण व रमेशचद्रचे खूनही पडले होते. पंजाब-केसरीच्या कार्यालयाजवळ गेलो तर त्याला युद्धातल्या मोर्चाबदीचे स्वरूप जागोजाग वाळूच्या पोत्यांच्या थप्प्या आणि त्याच्या आड दडलेले पोलीस-स्टेनगनस्-ब्रेनगनम्-रायफली तर कचऱ्यासारख्या फक्त टँक काय तो बाकी होता मोठ्या मिनतवारीने मला आत सोडले. प्रथम मेटल डिटेक्टरने कसून पहाणी. मग पाठीशी स्टेनगन् घेतलेले दोन पाठीराखे. बाबाना निरोप द्यायच्या निमित्ताने लालाजीचा नातू व सध्याचा सपादक विजयने दोन महिन्यानी प्रथमच मोकळी हवा खाल्ली. पण नमस्कारासाठी खाली वाकला तो एका हातात रिव्हॉल्व्हर घेऊनच.

मला पंजाबसंबंधी काही माहिती-आकडेवारी पाहिजे होती. म्हणून थेट गाठली जन-सपर्क अधिकाऱ्याची कचेरी मी तोंड उघडण्यापूर्वीच माझ्या छातीवरचा 'भारत जोडो'चा बिल्ला पाहून तिथल्या कारकुनाने माझ्या हातात भराभरा 'वीस कलमी कार्यक्रम'छाप पुस्तिका कोबायला सुरुवात केली.

'एकता' नावाच्या पत्रकाचा तर मोठा गठ्ठाच हातात ठेवला मी जीव तोडून सागत होतो 'भाईजान, मेरे लिये एकही पर्ची काफी है -'

जनाब निर्विकारपणे म्हणाले - 'ले जाओ तुसी यहाँ एकता तो ढेरो में पडी है -'

(अपूर्ण)

# अमेरिकेतून

## ☐ कल्पनेचो उड्डाणे TWA ची आगळी स्पर्धा

मुंबईतल्या एका स्पर्धकाने लिहिले की विमाने अणुशक्तीवर चालतील, सूसू असा आवाज करीत २००० मैल वेगाने उडतील आणि एका वेळेला १००० प्रवासी त्यात असतील. अमेरिकेतल्या नॉर्थ डकोटा या राज्यातील एका गृहस्थाने एका उडत्या तबकडीसारख्या दिसणाऱ्या विमानाचे चित्र काढले आणि विमाने बिनधोक, ज्वाला-विरोधी आणि कोसळल्यावरसुद्धा तडा न जाणारी असतील असा कल्पनाविलास केला. एका स्पर्धकाने लिहिले की वानरे विमाने चालवतील. दुसऱ्याने लिहिले की विमाने स्वयचलित करता येतील तर १९५५ साली जाहीर केलेल्या 'अजून ३० वर्षांनी (म्हणजे १९८५ साली) प्रवासी विमान वाहतूक कशी असेल' यासबधी अचूक भविष्य वर्तविण्यास आवाहन करणाऱ्या आणि ५०,००० डॉलर्सचे बक्षिस असलेल्या या स्पर्धेत उतरणाऱ्या एका स्पर्धकाने लिहिले की १९८५ साली प्रवासी विमान वाहतूक अजिबात अस्तित्वातच असणार नाही! कारण काय तर मानव त्या वेळेपर्यंत गुरुत्वाकर्षण नमलेल्या दुसऱ्या एखाद्या ग्रहावर वस्ती करायला गेला असेल!! आणि तो स्वतःच सर्व ठिकाणी उड्डाण करू शकेल!!

TWA ने ही स्पर्धा १९५५ साली ज्या वेळी जाहीर केली त्यावेळी पख्याचे constellation नावाचे विमान आकाशाचे आधिपत्य करत असे आणि न्यूयॉर्क ते सॅन फ्रॉन्सिस्को या ३००० मैलाच्या प्रवासामध्ये इंधन भरून घेण्याकरता विमानाना एकदा मधे उतरावे लागे. १९५५ साली या स्पर्धेत १३०० जणानी भाग घेतला होता. सर्व स्पर्धकांनी केलेली भविष्ये कॅन्सस सिटी या शहरात एका तिजोरीमध्ये ३० वर्षे जपून ठेवली

होती. गेल्या महिन्यात या स्पर्धेतील विजयी स्पर्धक म्हणून MIT मध्ये एका संशोधन प्रयोगशाळेत त्या वेळी काम करत असलेल्या श्रीमती हेलेन थॉमस याना ५०,००० डॉलर्सचे चेक बहाल केला. ८० वर्षांच्या श्रीमती थॉमस यांचा या गोष्टीवर किती तरी वेळ विश्वासच बसेना कारण त्या १९५५ च्या स्पर्धेसबंधी केव्हाच सर्व विसरून गेल्या होत्या. त्यानी १९८५ च्या विमान वहातूकीसबंधी अचूक भविष्य त्यावेळी वर्तवले होते. त्यानी लिहिले होते की– विमाने न थावता एका वेळेस ५००० मैलापर्यंत, ७०० मैल वेगाने उड्डाणे करतील, एका विमानात ३०० प्रवासी बसू शकतील आणि विमानात जेट यंत्रे बसवली जातील

काही स्पर्धकानी मात्र कल्पनेच्या विलक्षण भराऱ्या मारल्या होत्या उदाहरणार्थ-विमानांचा वेग १०००० ते ३५००० मैल असेल शनिवार – रविवारकरता दुसऱ्या एखाद्या ग्रहावर जाण्याची सुविधा असेल, कुठेही जाण्याकरता टॅक्सीप्रमाणे छोटी विमाने उपलब्ध असतील इ इ. तर काही स्पर्धक कल्पनेच्या बाबतीत फारच बुजरे ठरले– उदा. एकाने लिहिले की १९८५ पर्यंत १०० ते २०० प्रवासी एका वेळेला विमानात बसू शकतील, दुसऱ्याने लिहिले की विमानात चित्रपट दाखवण्याची सोय होईल.

## ☐ जाहिरातींचा देश

अमेरिकेच्या अनेक वैशिष्टयाबरोबर हा एक जाहिरातीचा देश आहे असे म्हणायला हरकत नाही. दिवसाचे चोवीस तास, घरी रेडिओवर, दूरदर्शनवर, वर्तमानपत्रातून, मासिकातून, पोस्टाने पाठवलेल्या पत्रकाद्वारे आणि घराबाहेर पडल्यावर मोटारीमधल्या रेडिओवर आणि हमरस्त्याच्या बाजूने लावलेल्या मोठमोठ्या साध्या किंवा झगझगीत दिव्यांच्या फलकाद्वारे जाहिराती तिन्ही त्रिकाळ कानावर आदळत असतात किंवा डोळ्यासमोर नाच ( काही जाहिरातीच्या बाबतीत 'नंगा' नाच ) करत असतात. या जाहिरातीवर किती अवाढव्य खर्च होतो आणि या सर्व माध्यमाचा इथे केवढा प्रचंड पसारा आहे याचा या लेखात आढावा घ्यायचा आहे.

१९८५ मधे सबंध देशात सर्व प्रकारच्या जाहिरातीवर एकूण ९५ अब्ज डॉलर्स खर्च करण्यात आले. यात वर्तमानपत्रातल्या जाहिरातीवर सर्वांत जास्त म्हणजे २५ अब्ज डॉलर्स खर्च झाले इथे वर्तमानपत्रांचा रोजचा खप सुमारे ६ कोटी आहे. अमेरिकेची वस्ती २४ कोटी आहे या जाहिराती स्थानिक स्वरूपाच्या असतात. पण यातल्या काही वर्तमानपत्राचे राष्ट्रीय पातळीवर जाळे आहे. जाहिरातदार या जाळ्यातर्फे सबंध देशभरच्या वर्तमानपत्रात एकाच वेळी जाहिरात देऊ शकतो

दूरदर्शनवरील जाहिरातीवर २१ अब्ज डॉलर्स खर्च झाले या देशातल्या ९८ टक्के घरात दूरदर्शनचा एक तरी सेट आहे. निम्म्याच्यावर घरात एकापेक्षा जास्ती दूरदर्शन सेट्स आहेत. ( VCR सुमारे १/३ घरात आहेत. ) सबंध देशभर जाहिरातीच्या उत्पन्नावर अवलबून असणारी ८८५ दूरदर्शन केन्द्रे आहेत शिवाय ६४०० दूरदर्शन केन्द्रे केबलद्वारे क्षेपण करतात. या सर्वातली बरीच केंद्रे राष्ट्रीय पातळीवर क्षेपण करत असल्यामुळे जाहिरातदाराना दूरदर्शन हे अतिशय महत्त्वाचे आणि परिणामकारक माध्यम वाटते.

रेडिओवरच्या जाहिरातीवर सुमारे ७ अब्ज डॉलर्स खर्च झाले. या देशात ८४७० रेडिओची केन्द्रे आहेत ९९ टक्के घरात एक तरी रेडिओ आहे मासिकातल्या (यात साप्ताहिके, पाक्षिके पण आली ) जाहिरातीवर सुमारे ५ अब्ज डॉलर्स खर्च झाले. इथल्या मासिकाचे एक वैशिष्टच म्हणजे तुम्ही म्हणाल त्या विषयाला वाहिलेले मासिक इथे उपलब्ध असते–उदा गृहकृत्य करणाऱ्या स्त्रियाकरता, व्यवसाय करणाऱ्या स्त्रियाकरता, तरुण मुलीकरता, शिकार करणाऱ्याकरता, छद म्हणून मासे पकडणाऱ्याकरता इ. इ. यामुळे विविध व्यवसायातल्या, विविध छद असलेल्या किंवा विशिष्ट जीवनपद्धती असलेल्या वर्गणीदारापर्यंत त्याना जी साधने, उपयोगी असतील त्यासबधीच्या जाहिराती या प्रकारच्या मासिकाद्वारे सबंध देशभर पोचू शकतात

अशा जाहिरातीचा अखड वर्षाव चालू असल्याने लक्ष द्यायचे नाही असे म्हटले तरी जाहिरातीपासून इथल्या जीवनात सुटका नाही खरे सागायचे म्हणजे इथे वस्तू, सोयी आणि त्याच्या किमती या सर्वांमधे इतकी विविधता आहे की सर्व अमेरिकनाना–मग रोजच्या स्वयपाकाच्या वस्तू, विमानप्रवासाचे तिकीट किंवा मोटार यापैकी काहीही विकत घ्यायचे असले तरी या जाहिरातीकडे नीट लक्ष द्यावे लागते आणि त्याची मदत घ्यावी लागते.

वेस्टफिल्ड,
एप्रिल ६, ८६

डॉ विजय वि. आणि
सौ. जयश्री वि. जोशी

---

अहो, येता जाता

---

# औरंगाबादेच्या पट्रोल–पंपावर

फिरोझ रानडे

त्या वेळी औरगाबादेला आमच एक मोठघा हॉटेलच काम चालल होत. हॉटेलच काम म्हणजे मोठ्या पैकीवाल्या माणसाच काम हे वेगळ सागायला नकोच तो पुष्कळ पैसा खर्च करणार होता. वर आम्ही त्याला आणखी पैसा खर्च करायला वेगळे–वेगळे मार्ग सुचवत होतो, उत्तेजन देत होतो. कारण तो जितका जास्त पैसा खर्च करेल तितकी जास्त फी आम्हाला आर्किटेक्टस् म्हणून मिळणार होती. त्यामुळेच औरगाबादेला आमच जाण–येण बरच वाढल होत.

मुबईहून औरगाबादेला सगळयात कमी वेळेचा व अत्यत सुखाचा मार्ग म्हणजे विमानाने जाण्याचा. विमानाने जाव, त्या पैसेवाल्या माणसाच्या गाडीतून हव तेथे जाव याव व विमानाने परत याव. पण आमच्या साहेबाची हौस अशी की त्याच्या मर्सिडीस् गाडीन जायच. ही आता एवढी भलीमोठी मर्सिडिस गाडी घेऊन जायच म्हणजे खर्च तर होणार होताच पण प्रवासाला बराच वेळ लागणार होता वर दगदग होणार होती.

पण आमच्या साहेबाचे म्हणण अस की, स्वत च्या गाडीन गेल की कुठेही जाण्या–येण्याच मोकळेपण मिळत. वर मर्सिडिस्

गाडीचा क्लायन्टस्वर रूबाब पडतो तो वेगळाच.

आम्ही रात्री पुण्याला मुक्काम केला व सकाळी औरंगाबादेला जायला निघालो. पोहोचता पोहोताच इमारतीचं काम चाललं होतं तेथे गेलो. एकदा तेथे गेल्यावर किती बांधकाम झालं, कसं झालं, कॉन्ट्रॅक्टरला काही अडचणी आहेत का ह्यात संध्याकाळ कशी झाली ते कळलं नाही. त्याच गडबडीत आम्ही जेऊन घेतलं होतं.

साहेबांना दुसऱ्या दिवशी मुंबईत कोठली तरी मिटिंग होती. ते संध्याकाळच्या विमानाने परत जाणार होते व मी गाडी घेऊन परत येणार होतो. ठरल्याप्रमाणे साहेबांना विमानतळावर पोहोचवलं. ताबडतोब निघावं, पुण्यालाच जेवावं व रात्री मुक्काम करून सकाळी निघावं असा विचार होता. पण निघायच्या आधी गाडीत पेट्रोल घ्यावं म्हणून पंपावर आलो. पंपावर कोठल्या बाजूनी यावं व कोणत्या बाजूनी जावं ह्याबद्दल मुंबईला जशी शिस्त असते तशी काहीही शिस्त नव्हती. सोयीप्रमाणे लोक येत होते व जात होते.

पंपावर मला काहीच करायचे नव्हते. ड्रायव्हर खाली उतरला व पुढली कारवाई करू लागला. मर्सिडिस् गाडी म्हणजे सगळ्यात रूबाबदार गाडी. त्यातून औरंगाबादेत अशी गाडी अगदी विरळा. तेव्हा सगळे लोक त्या गाडीकडे कौतुकाने पहात होते, त्याचबरोबर मागल्या सीटवर सुटाबुटात बसलेल्या माझ्याकडे. त्यांना मी गाडीचा मालक वाटत होतो व मीही मालकाच्या रूबाबात बसलो होतो.

पुष्कळ गाड्या, रिक्षा, स्कुटर्स जात होत्या, येत होत्या. अशीच समोरून एक स्कुटर आली. हल्ली फार करून दिसणारं तिडपं त्यावर होतं. तिडपं म्हणजे तीन जण. नवरा बायको व लहान मुलगा. नवरा काही तरी तीस–बत्तीसचा, बायको पंचविशीची व मुलगा पाच–सहा वर्षाचा, स्कुटरच्या पुढल्या जागेत उभा. ते मध्यम वर्गातले व ब्राह्मणी संस्कृतीचे वाटले. सगळे जण गोरे पण बायको नेहमी असते तशी नवऱ्याच्यामानाने जास्त स्मार्ट.

त्यांची स्कुटर आमच्या गाडीजवळ येता येताच तो मुलगा 'बाबा, मी ही गाडी कोणती ते ओळखतो' म्हणून ओरडायला लागला. बाबानेही मोठ्या कौतुकाने 'कोणती आहे?' म्हणून विचारलं. मुलगा 'मर्सिडिज-मर्सिडिज' म्हणून उत्तरला. त्याचा बापाला आनंद झाला, मुलाला झाला.

समोरून येणारी ती स्कुटर आमच्या अगदी जवळ येऊन थांबली. प्रथम बायको उतरली, मग मुलगा व नंतर बाप. बापाने स्कुटर उभी केली व पंपाकडे म्हणून गेला. आता मुलगा आईकडे वळला. 'आई, आई, मी ही गाडी बरोबर ओळखली बघ, मर्सिडिस आहे, मर्सिडिस !' असे म्हणत आईचा हात ओढू लागला.

तेव्हा आईने आमच्याकडे पाहिले. ती भली मोठी निळोशार गाडी भारदस्त व श्रीमंत दिसत होती. गाडीकडे पाहून झाल्यावर तिने माझ्याकडे पाहिले. मीही कोटाची कॉलर जरा ओढून घेत रुबाबात, 'कशी आहे आमची मर्सिडिस गाडी ?' ह्या अर्थी तिच्याकडे पाहिले.

माझ्या पहाण्यातला अर्थ तिच्या ध्यानी आला. त्याला उत्तर म्हणून, 'असेल तुमची मोठी मर्सिडिस् गाडी, आमची पण स्कुटर आहे म्हटलं' ह्या अर्थी माझ्याकडे पाहिलं.

नुसत्या बघण्या–बघण्यात इतकी अर्थपूर्ण देवाण–घेवाण होऊ शकते ? माझ्या मनात आलं. त्या बिन–शब्दी उत्तर देणाऱ्या मुलीचं कौतुक वाटलं. अजूनी मुलगा कौतुकानं मर्सिडिस म्हणून ओरडत होता. पण त्या मुलीनं गाडीकडे वा माझ्याकडे परत म्हणून पाहिले नाही.

किती स्वाभिमानी मुलगी ! त्यांची साधी स्कुटर पण त्याचा तिला किती अभिमान वाटत होता.आणि हे असेच पाहिजे. तुमच्याकडे किती आहे व काय आहे ह्यापेक्षाही जे आहे त्याचा अभिमान वाटला पाहिजे.

आपल्याला आपल्या आहेत त्या गोष्टीबाबत अभिमान वाटण्याऐवजी सतत खंत वाटत असते. किंबहुना अशी सतत खंत वाटते म्हणूनही पुष्कळ प्रश्न निर्माण झाले आहेत असं म्हणायला हरकत नाही.

आपल्याकडे मोठा अभिमान वाटण्याजोग्या पुष्कळ गोष्टी आहेत हेच आम्ही विसरून गेलो आहोत.

मी ह्या विचारात गढून गेलो होतो. तेवढ्यात 'साहब, चलना है ना ?' म्हणून ड्रायव्हरने विचारले. मी एकदम चमकून गेलो व म्हटले, 'हां, भाई यहाँसे चलना है।

□


ग्रामीण भागात
डॉक्टर्स नेण्याचा प्रयत्न
भारतात प्रथम
डॉ. आयडांनी केला.
त्यांच्या त्यागमय
जीवनाची कहाणी.

**डॉ. आयडा स्कडर**

सौ. वीणा गवाणकर

बावीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

वैराण मुलुखाचे
सुजलाम् सुफलाम् भूमीत
रूपांतर करणारा
थोर निग्रो संत आणि शास्त्रज्ञ
डॉ. कार्व्हर यांचे प्रेरणादायी
चरित्र.

**एक होता कार्व्हर**

सौ. वीणा गवाणकर

तीस रुपये

राजहंस प्रकाशन
१०२५ सदाशिव पेठ, पुणे - ३०.

## वेशीबाहेरचे एक पान

**या**सीन आज तांबडं फुटायलाच उठला. दुकानापुढं आला. तिथ दावण होती. सहज नजर गेली. बोकडांनी वैरण खाल्ली नव्हती. बोकडं मोजलं. दोन पाटा एक ग्वड्डु शेळी. एकूण दहा नग बरोबर होत. दावण निपचिप होती.

आज धुळवड. गिराईक लयी गडबड करणार. झाडून पाक मराठा आज नळी फोडतोय. काल पोळी झाली. आज नळी. त्याचं त्यालाच हसू आलं. हसतच दुकानाचं कुलूप काढलं. बटन दाबलं. दिवा लागला. फडक्यात गुंडाळलेल्या सुऱ्या काढल्या. जात्याच्या दगडावर तो एक एक सुरी घासू लागला. अंगठ्यानं त्याची धार बघू लागला.

गडी आला. बॅरलातलं बादलीभर पाणी उपसलं. दुकानाच्या मागच्या आडोशाला गेला. इथं बकरं सोडावायचं. रगती धरायची. मुंडी-पाय कोपऱ्यात टाकायचं. हुक्काला बकरं पायाकडनं टांगायचं. ढुंगणाकडनं कातडं काढत राहायचं. आतडी, कोथळा धुयायचा.

यासीननं भराभर बकरी सोडवली. टांगली. कातडं काढलं. धुतलं, वजन करून नोकराच्या ताब्यात दिलं. चार-पाच होत होत सात बकरी लोंबकळाय लागली.

दुकानात गिराकानं गरदी केली. एकट्या गड्याला गिराक आवरना. त्यो फरा तोडता तोडता म्हणाला ‘मालक, आता आत या.’ लोंबकळत्या बकऱ्याला घेऊन तो आत आला. आठ बकरी झाली.

गडी वजन करून मालकापुढं टाकू लागला. मालक मटणाचं बारीक तुकडं करून द्यायला लागला. मागण्या लई होत्या, कोण रगती मागत होता, तर कोण काळीज, कोण कोथळा, कोण चरबी, कोण मऊ टाक, फऱ्यातलं दे. मुंडी सोलून दे. ते दोघेही भराभर देत होते. वाढल्यालं गिराक आता जरा कमी होत आलं.

गडी म्हणाला मालक आता जावा– उरल्याली तेवढी सोडवा. तो दावणीकडं गेला. दोन राहिली होती. एक पाट एक ग्वड्डु शेळी. पाटाचं दावं सोडलं. तिच्या कानाला धरून वढत आणलं. कोपऱ्यात गळा सोडवला. धडानं उगचच पाय हालवून धडपडलं. यासीनच हात सराईतपणे पुढल्या कामाला लागलं. पंधरा वीस मिनिटात काम झालं. वजन केलं. बावीस किलो. त्यानं वजन गड्याला सांगितलं.

आता दावणीला एकच ग्वड्डु शेळी राहिली होती. तिचं दावं सोडलं. ती वरडाय लागली. तिच्या डोळ्यापुढं सुरी फिराय लागली. यासीनला ते नवं नव्हतं. त्यानं कानाला धरलं. पण शेळी पुढं येईना. तसं त्यानं पेकटात लाथ घातली. शेळी फळ फळ मुतली. बचाकभर लेंड्या टाकल्या. मग यासीननं पोटाखाली हात घालून उचलून नेलं. शेळी धडपडली. पण उपयोग नव्हता.

शेळीच्या डोळ्यावर त्यानं हात ठेवला. गडी मागचं-पुढचं पाय धरून होता मान सोडवली. धडपड. डोळं उघडं ठेवूनच जीव गेला. यासीनचं पोरग दुकानात आलं. ‘आब्बा, माँ जल्दी बुला रही है।’

‘क्यों रे ?’

‘माँको दवाखानेको लिजानेका है।’

‘आतूय चल.’

पोरगं ज्या वेगानं आलं त्याच वेगानं गेलं. शेळी टांगली. सोलायला लागला. पोटाजवळ सुरी आली. तटली. जरा जोर लावला, सुरी पुढं गेली. पिशवीतनं मेल्यालं पिल्लू पटकन् खाली पडलं. यासीनला हे नवं होतं. असं कधी घडलं नव्हतं.

‘अरे ये तो भाँज आत्ती.’ यासीन नोकराला म्हणाला.

‘होता है मालक, कभी कभी पेट दिखलाई नही देता.’

पण यासीनचं मन कुणी तरी कापल्यासारखं झालं. त्याला कसं तरी वाटायला लागलं. त्याच्या नदरंसमोर पिशवीतनं पडल्यालं पिल्लू दिसाय लागलं. त्याचं मुकं मन घराकडं वळलं.

घराला कुलूप होतं. शेजाऱ्यानी सांगितलं ‘बायकूला दवाखान्यात नेलंय.’ त्याचं मन अपशकूनाच्या सुरीनं काळीज फाडाय लागलं. तो गळा सोडवतानाच त्याला आठवाय लागलं. तो दवाखान्यात पोहोचला.

डॉक्टर सहीसाठी वाट बघत होते. डॉक्टर म्हणाले, ‘पोर आडवं आहे. पूर्ण वाढ नाही. पोर हाताला लागणार नाही.’ तो गप् उभा राहिला. कागद पुढं आल्यावर त्यानं शाईत अंगठा बुडवला कागदावर उठवला. त्याच्या अंगठ्याच रक्तबी कागदावर उठलं. डॉक्टर आत गेले.

त्याला समोर दिसाय लागलं– डॉक्टर... पोट फाडायला लागलाय.

शांत दवाखान्यात एक किंकाळी ऐकू आली.

–बापू जाधव
किर्लोस्करवाडी



# बार्शी : भारतातील पहिले ग्रामीण कर्करोग निवारण केंद्र

## सुभाष काळे

**बा**र्शी ! शहरातल्या सिल्व्हर ज्युबिली हायस्कूल रोडवरील एक प्रशस्त बगला. बगल्याच्या भोवती चागला बागबगिचा. आकाशाला भिडलेली आशोकाची आणि नारळाची झाडे भरपूर नोकर चाकर. सपत्ती आणि समृद्धी हातात हात घालून नादताहेत कोणतीही कमतरता नाही. उणीव होती फक्त अपत्याची शिवाय दोघेही पती–पत्नी अपग. मालकाने साठी ओलाडलेली १९४८ पासून 'बोन स्पॉडिलायटिस 'मुळे त्याना वाकता येत नाही की जमिनीवर बसता येत नाही त्यातच डावा पाय एका किरकोळ जखमेचे निमित्त होऊन प्रचड सुजलेला. तर पचावन्न वर्षाची पत्नी पॅरलिसीसमुळे जमिनीला खिळून. या गडगज इस्टेटीचे करायचे काय ही त्या दोघाना रात्रदिवस चिता. बगल्यात एका प्रकारची यामुळे विषण्णता. खायला उठणारा सुन्नपणा या नैराश्यपूर्ण वातावरणात प्रसन्नता यायची ती एका तरुण डॉक्टराच्या आगमनाने. रात्रीच्या नीरव शाततेत रातराणीचा सुगध दरवळावा आणि सभोवतालचे वातावरण उल्हासित व्हावे तसे या डॉक्टराच्या आगमनाने सबध बगल्यातले वातावरण चैतन्यमय व्हायचे. सर्व नोकर–चाकर मरगळ झटकून कामाला लागायचे. आल्या आल्या डॉक्टर प्रथम त्या दोघाची आस्थेने विचारपूस करी, तपाशीत, औषधपाणी देत. तोपर्यंत चहा तयार झालेला. असे चहा घेऊन होताच डॉक्टर आपल्या हातातील सिगारेट शिलगावीत. ती दोघे पती–पत्नी आणि डॉक्टर अशा या त्रिकुटाच्या चागल्या तास दीडतास गप्पा चालत. डॉक्टर नुकतेच इग्लडहून परतलेले होते. व्यवसायात अद्याप जम बसलेला नसल्याने डॉक्टराना तसा भरपूर वेळ असायचा. अनेक विषयावर गप्पा रगत आणि हळूहळू गप्पाचा ओघ एका ठराविक विषयाकडे वळत असे.

'डॉक्टर तुमच्या औषधाचा मला चागला गुण आला. खरे तर माझे आयुष्य सपलेले होते; -पण तुम्ही मला वाचविलेत. जिवदान दिलेत. केवळ तुम्ही होता म्हणूनच मी जिवत राहिले'

–बगल्याच्या मालकिणीचे कृतज्ञतेचे उद्गार.

'तसे काही नाही वहिनी, मला मिळालेल्या ज्ञानाचा उपयोग मी योग्य प्रकारे केला इतकेच. जीवदान वगैरे काही नाही तुम्हा दोघाना भरपूर आयुष्य आहे. दादाना आणि तुम्हाला आनदी बघून मलाही आनद होतो.'

डॉक्टराचे ठरलेले उत्तर.

'पण...डॉक्टर ! आमचा आनंद यापेक्षा अधिक वाढावा असे जर तुम्हाला खरोखरच वाटत असेल तर आमचे ऐका. म्हातारपणी काय करायचीय ही एवढी इस्टेट ? ती बाधून थोडीच आम्हाला स्वर्गात नेता येणार आहे ? आपण आमची अल्पशी भेट स्वीकारलीत तर आमचा आनद यापेक्षा अधिक वाढेल.'

बगल्याच्या मालकाची डॉक्टरांना विनवणी.

'दादा, तुम्ही माझी ठरलेली व्हिजिट फी देता. मी आल्यानंतर आगत्याने चहापाणी करता यातच मला सर्व काही आले तुम्ही एखादा चागला तरुण मुलगा शोधून दत्तक घ्या. त्याला वारसदार नेमून त्याच्यावर इस्टेटीची जबाबदारी सोपवा. तो इस्टेटीची देखभाल करेल आणि तुम्हालाही साभाळेल. वृद्धापकाळी कोणाचा तरी आधार हवाच ना ?'

डॉक्टराच्या उत्तराने दोघेही निरुत्तर होत.

अर्थात हा विषय आणि त्यावरील प्रश्नोत्तरे अगदी ठरलेलो असत एखाद्या कुटुबातील कर्त्या मुलाने लग्न न करण्याचा निर्णय करावा आणि त्याला लग्नाला तयार करण्यासाठी घरातील वडिलधाऱ्या मडळीनी घडपडावे, तसे या दापत्याचे प्रयत्न असत.

दोन–तीन वर्षापासून हे असेच चालले होते; पण एक दिवस काय घडले कोण जाणे पती–पत्नी अधिकच अगतिक बनली. कोणत्याही परिस्थितीत डॉक्टराकडून होकार मिळवायचा अशा जिद्दीने त्यानी चर्चा सुरू केली.

'डॉक्टर– तुम्ही आमच्या प्रेमाच्या भेटीला नकारच देत आहात. इस्टेटीच्या विल्हेवाटीबद्दल बोललो तर बघू, करू असे म्हणता. तुम्ही निर्णय तरी कधी करणार आहात ? आम्ही वर गेल्यावर ? ते काही नाही डॉक्टर ! आज मी तुमचे काही ऐकणार नाही. आमची अल्प स्वल्प भेट स्वीकारावीच लागेल. हवी तर ती नंतर कोणालाही देऊन टाका.'–

बगल्याच्या मालकाची निर्वाणीची भाषा.

'डॉक्टर तुमच्याशिवाय आम्हाला आहे तरी कोण ? तुम्हीच पुत्र, प्राणदाते सर्व काही आहात आज नाही म्हणू नका व कधी तरी आम्हाला मोकळे करायचे आहे ना ? मग आजच निर्णय घेऊन टाका' पती पाठोपाठ पत्नीचाही आग्रह.

डॉक्टरानी अनेक वेळा त्या दापत्याची समजूत काढली होती. दुर्लक्ष करून, विषयातर करून या ना त्याप्रकारे चर्चा टाळली होती. पण आज त्याचा नाईलाज झाला होता. डॉक्टराना पैशाचा अजिबात लोभ नव्हता. देवावर गुलाल उधळावा तसे स्वत चे आयुष्य उधळून देऊन, निस्वार्थपणे देशाची सेवा करणाऱ्या एका देशभक्ताच्या घरात डॉक्टर जन्मलेले होते. आपले वैद्यकीय ज्ञान आपल्या भागातील गोरगरीब माणसाना वेदनामुक्त करण्यासाठी उपयोगात आणायचे या ध्येयाने भारलेले होते. त्यासाठी त्यानी इग्लडमधील लठ्ठ पगाराची लेक्चररशिप नाकारली होती ऑस्ट्रेलियातील एका मोठ्या मानाच्या जागेला नकार दिला होता. इतकेच नव्हे तर मुबईसारख्या मोहनगरीतील 'जसलोक' हॉस्पिटलची ऑफर दुर्लक्षून ते आपल्या

जन्मभूमीत बार्शीसारख्या छोट्या शहरात आले होते. डॉक्टर गर्भश्रीमत नव्हते की लक्षाधीश नव्हते. पैसा त्याना हवा होता तो स्वत.चे, बायकामुलाचे पोट भरण्यासाठी. पण असे असले तरी त्याना केवळ पैसाच मिळवायचा नव्हता. मिळवायचा होता तो फक्त गरजेपुरता. तेव्हा एवढ्या निरिच्छ वृत्तीचे डॉक्टर कशाला या इस्टेटीचा किंवा एका रुग्णाच्या भेटीचा स्वीकार करतील ?

हा विषय निघे तेव्हा डॉक्टराना जाणवे ती स्वत.ची मर्यादा. या मर्यादेत आपण काय करणार ? मोफत दवाखाना चालवू शकत नाही की मोफत सल्ला देऊ शकत नाही. लोकासाठी काही तरी करायचे तर त्यासाठी पैसा हवाच ना ? मग आपण या दापत्याच्या संपत्तीचा उपयोग का करू नये ? असा अनेक वेळा विचार त्यांच्या डोक्यात येवून गेला, नाही असे नाही; पण डॉक्टराचे मन चटकन होकार द्यायला तयार नसायचे; पण आज त्यांनी मनाशी काही ठरवून होकार दिला.

'ठीक आहे. दादा मला तुमची इच्छा मला मान्य आहे, पण त्यासाठी माझी एक अट आहे. कबूल ?

'बोला डॉक्टर ! मोकळेपणानी बोला. आम्हाला तुमची अट मान्य आहे.'

बऱ्याच दिवसाच्या प्रयत्नाना यश आलेले पाहून त्या अपग जोडप्याचे चेहरे आनदाने फुलले. त्या आनदाच्या भरात डॉक्टरानी एकच काय पण अनेक अटी सागितल्या तरी मान्य करायला ते एका पायावर तयार होते.

'दादा, तुमची भेट स्वीकारतो; पण त्यातला एक पैसादेखील मी स्वत:साठी घेणार नाही. आपण त्याचा एक ट्रस्ट स्थापन करू. आणि त्यातून एखादी सामाजिक सस्था सुरू करू. आहे मान्य ?'

'डॉक्टर तुमची इच्छा. तुम्ही सागायचे आणि आम्ही ऐकायचे, बस !'

त्या जोडप्यानी डॉक्टराचे मन वळविले होते आणि काही तरी सामाजिक कार्य करायचे या सद्हेतुपोटी डॉक्टरानी त्याना होकार दिला होता. सामाजिक कार्य करायचे हे ठरले तरी नेमके काय करायचे हे ठरलेले नव्हते. डॉक्टरानी इग्लडमध्ये वृद्धाश्रम पाहिले होते त्या धर्तीवर बार्शीत एखादा वृद्धाश्रम सुरू करावा असा त्याचा प्रथम विचार होता; पण इंग्लड आणि भारतातील सामाजिक परिस्थितीत अतर फार. इंग्लडमध्ये ती एक गरज आहे. भारतातील सामाजिक परिस्थिती अद्याप तेवढी हाताबाहेर गेलेली नाही हे लक्षात आल्यानतर तो विचार डॉक्टरानी सोडून दिला. त्यानतर कुष्ठरोग निवारण केंद्र सुरू करण्याचाही विचार त्याच्या डोक्यात आला. केंद्र सरकारने त्याचप्रमाणे राज्य शासनाने कुष्ठ निवारण्याचे कार्य मोठ्या प्रमाणात चालविलेले आहे. शिवाय बार्शीजवळ असलेल्या वैराग येथे हे केंद्र असल्याने, तसेच काही जणानी विरोध केल्याने तोही विचार बारगळला. कुष्ठरोग निवारण केंद्राच्या पाठोपाठ अर्थोपेडिक सेंटरचाही विचार मागे पडला आणि एक दिवस वीज चमकावी तसा कॅन्सर हॉस्पिटलचा विचार डॉक्टराच्या डोक्यातून चमकला.

डॉक्टरांनी इंग्लडहून परतल्यानतर बार्शीत आपले मित्रमडळ चांगले वाढविले होते. त्यात डॉक्टर, वकील, व्यापारी, प्राध्यापक शिक्षक, कर्मचारी, शेतकरी तसेच काही समाजसेवकाचाही त्यात अंतर्भाव होता. या मित्रमडळीत डॉक्टरानी आपली कॅन्सर हॉस्पिटल काढण्याची कल्पना माडली. ती सर्वानी मोठ्या आनदाने उचलून धरली.

एक दिवस अगदी सकाळीच डॉक्टराची लाल रगाची प्रिमियर पद्मिनी त्या प्रशस्त बगल्याच्या फाटकातून आत शिरली.

'वा ! वा !! डॉक्टरसाहेब आज अगदी सकाळीच येणे केलेत ? डॉक्टराच्या अनपेक्षित आगमनाने काहीसे आश्चर्यचकित बनलेल्या बंगल्याच्या मालकाचे उद्गार.

'दादा, आज मी डॉक्टर म्हणून औषधोपचार करण्यासाठी आलेलो नाही तर एक याचक म्हणून देणगी मागायला आलो आहे.'

'खरेच म्हणता डॉक्टर ? तसे असेल तर आजचा आमचा दिवस सोन्याचा ठरेल. बोला डॉक्टर काय देऊ मी तुम्हाला ? शेती, बगला, की आणखीन काही ?'

'दादा, कॅन्सर म्हणजे महाभयानक रोग. प्रत्यक्ष मृत्यूच ! श्रीमंत माणसे शहरात जाऊन औषधोपचार घेऊ शकतात; पण गोरगरिबाचे काय ? त्याना कोण वाली ? आपण अशा गोरगरीब लोकांसाठी कॅन्सर हॉपिटल काढावे असा आमचा विचार आहे. कशी काय वाटते कल्पना तुम्हाला ?'

'डॉक्टर, कल्पना चागली आहे. माझी हिरेमठ हॉस्पिटलच्या पुढे-चार फर्लांगावर आगळगाव रोडला सात एकर जमीन आहे. त्यात बांधलेली विहीर, दोन बगले आहेत. ते मी तुम्हाला देतो. आपला प्रकल्प फार मोठा आहे. त्यादृष्टीने ही देणगी म्हणजे दर्यामे खसखस. माझ्या आईच्या नावावर शेलगावला ५४ एकर जमीन आहे. ती पण स्वीकारा. म्हणजे काम भागेल.'

'दादा तुमच्या दातृत्वाची तुलना कोणाशी करता येईल असे वाटत नाही. तुमच्यासारखे दाते तुम्हीच आहात. आपण तुमच्या या इस्टेटीचा ट्रस्ट स्थापन करू आणि त्यामार्फत कॅन्सर हॉस्पिटल सुरू करू चालेल ना ?

'हो, का नाही ? डॉक्टर यापुढे एकच सागतो. आपण मला माझ्या मुलाच्या जागी आहात यापुढे तुम्ही म्हणाल ती पूर्व. बस !'

हा सवाद एखाद्या सामाजिक कादबरीतला, आदर्शवादी नाटकातला किंवा 'देवघर'सारख्या ध्येयवादी चित्रपटातला नाही तर प्रत्यक्षात घडलेला आहे ती एक हकिकत आहे. बार्शीचे माजी नगराध्यक्ष श्री. उत्रेश्वर तथा बाबुरावजी कथले याच्या बगल्यातली. सवादातले डॉक्टर म्हणजे बार्शी येथील भारतातील पहिल्या ग्रामीण कॅन्सर निर्मूलन प्रकल्पाचे प्रवर्तक डॉ. बी. एम तथा शरदराव नेने आणि बगल्याचे मालक मालकीण म्हणजे खुद्द बाबुरावजी कथले व त्याच्या पत्नी सर्वमगलाबाई कथले.

चार पैसे जवळ असलेल्या माणसालाच नव्हे तर केवळ हातावर पोट भरणाऱ्या माणसालादेखील वशाचा दिवा लागतो. गडगज इस्टेट असलेल्या श्रीमत माणसाविषयी तर बोलायलाच नको बालाजीला जाऊन नवस काय करतील, काशी विश्वेशराला साकडे काय घालतील एवढे करून मुलगा न होता सर्व मुलीच झाल्या तर दोनच काय तीन तीन लग्ने करायला देखील हे लोक मागेपुढे पहात नाहीत आणि त्यानतरही मूलबाळ न झाल्यास दत्तक घेऊन इस्टेटीच्या वारसदाराची सोय केली जाते. शेकडो वर्षापासून चालत आलेली ही

रंपरा. पण बाबुरावजी कथले यानी या परंपरेला धक्का दिला ती रुढी पायदळी तुडविली. कोणा एका कुलदीपकाला वारसदार नेमण्याच्या ऐवजी एका तरुण डॉक्टराकडे आपली जायदाद सोपवून दिली. ज्या समाजाने वाढविले, मोठे केले त्या समाजालाच ट्रस्ट करून वारसदार नेमले.

आपल्या संस्कृतीत दानाला फार महत्त्व आहे पण त्याहीपेक्षा अधिक महत्व आहे ते सत्पात्री दानाला. योग्य ठिकाणी, योग्य व्यक्तीला जर दान दिले तरच पुण्य मिळते असे आपल्या धर्मात सांगितलेले आहे बाबुरावजी कथले यानी केलेले दान सत्पात्री तर आहेच आहे, पण स्तुत्यही आहे ! आदर्श आहे ! ! सर्वांनी अनुकरण करावे असे आहे

रुग्ण म्हणजे पैसे मिळवायचे साधन ही आजकाळच्या डॉक्टराची धारणा. वाटेल त्या मार्गाने पैसे मिळविण्याच्या डॉक्टराच्या वाढत्या मनोवृत्तीच्या काळात, ठरलेल्या फी व्यतिरिक्त मला कोणाकडून एक पैसाही जादा घेण्याचा अधिकार नाही हे केवळ बोलण्यापुरतेच नव्हे तर प्रत्यक्ष कृतीत आणणारा नेने यांच्यासारखा डॉक्टर कथले याना वारसदार लाभावा ही कथले यांच्याच नव्हे तर सबंध कॅन्सरग्रस्त रुग्णाच्या भाग्याची गोष्ट आहे कथले याचा तर त्याग आहेच आहे; पण डॉक्टराचाही स्वार्थत्याग मोठा आहे कोणतेही महानकार्य शेवटी महान त्यागातूनच उभे राहत असते हे काही खोटे नाही,

कॅन्सर ! बस एक शब्द. अवघी तीन अक्षरे. पण किती भयानक? माणसाच्या अंगाला अक्षरश: घाम आणतात सशस्त्र व्यक्तीने जर अचानक एखाद्या माणसावर हल्ला चढविला तर त्या क्षणी त्या माणसाच्या मनाची जी काय अवस्था होते ती अवस्था 'तुम्हाला कॅन्सर झाला आहे' या एका वाक्याने होते. स्वतलाच नव्हे तर थोडा फार परिचय असलेल्या व्यक्तीला जरी कॅन्सर झाल्याचे समजले तरी माणूस क्षणभर का होईना अस्वस्थ होतो. हळहळतो. याचे कारण म्हणजे कॅन्सरची भयानकता कॅन्सर म्हणजे आज तरी प्रत्यक्ष मृत्यूच. साधा नव्हे. तर महाभयानक मृत्यू वेदनेने अधिकाधिक कापीत नेणारा मृत्यू. त्यामानाने शस्त्राने किंवा अन्य कारणानी येणारा मृत्यू फारच सुखावह म्हटला पाहिजे. शस्त्र क्षणभरात वार करून बाजूला सरकते. इतर कारणानी येणारा मृत्यूही विशेष त्रास न देता माणसाला चटकन मारतो पण कॅन्सरग्रस्त व्यक्तीला मात्र भयानक वेदना सहन करीत मृत्यूला कवटाळावे लागते कॅन्सर माणसाचा आठवा मारेकरी आहे असे म्हणतात ते उगीच नव्हे.

यापूर्वी क्षय, कुष्ठरोग इत्यादी रोगाची गणना असाध्य रोगात केली जात होती. पण शास्त्रज्ञानी अविरत प्रयत्न करून त्यावर विजय मिळविला. आज हृदयासारखा शरीरातील सर्वात महत्त्वाचा आणि अत्यत नाजूक अवयव पूर्णपणे रोपण केला जातो, इतकेच नव्हे तर कृत्रिम हृदय निर्मितीपासून ते टेस्ट ट्यूब बेबी निर्मितीपर्यंत डॉक्टरानी अनेक क्षेत्रात यशस्वी मजल गाठलेली आहे. पण या सर्वांचे कॅन्सरपुढे मात्र हात टेकलेले आहेत हा रोग इतर रोगाप्रमाणे जतुपासून किंवा ससर्गाने होत नसल्याने आजकाल अमृतवल्ली ठरलेली अॅन्टीबायोटिक औषधेदेखील कॅन्सरपुढे कुचकामी ठरलेली आहेत. आज जगभर कॅन्सरवर हजारो सस्था कोटयावधी रुपये खर्चून संशोधन करीत आहेत. अनेक तज्ज्ञ डॉक्टर्स, सशोधक अहोरात्र प्रयत्न करताहेत; पण अद्याप कॅन्सरवर रामबाण उपाय किंवा एखादे हुकुमी औषध सापडलेले नाही. प्रतिवर्षी कॅन्सरचे रोगी वाढत आहेत. कॅन्सरग्रस्त व्यक्तीचे यातनामय जीवन आणि भयानक अवस्थेतील मृत्यू हे आजच्या वैज्ञानिक युगापुढे एक मोठे आव्हान होऊन बसले आहे.

काही काही विषय असे असतात की, त्यावर ठिकठिकाणी चर्चा, प्रचार होऊन देखील माणूस त्याकडे दुर्लक्ष करतो आयुष्यात जेव्हा केव्हा त्या विषयाशी सबध येईल तेव्हाच माणसाचे त्याकडे लक्ष जाते. उदाहरणार्थ कुटुब नियोजन. एका ठराविक वयाच्या काळात माणूस त्यात लक्ष घालतो तसेच कॅन्सर. कॅन्सर हा पस्तीशीनंतर होत असल्याने आधीच्या वयात त्याकडे गांभीर्यपूर्वक, कोण बघतो ? याला मी पण अपवाद नाही. कॅन्सरवर मी कधीच काही वाचले नाही. वाचण्याचे कारणही वाटले नाही हा तर भाग झालाच; पण पत्रकार म्हणून देखील मी कधी त्या विषयाकडे वळलो नाही. बार्शी हे माझ्या सोनारी गावाजवळचे शहर प्रत्येक वेळी गावी जायचे म्हटले की बार्शीवरून जावे लागते. गेल्या चार वर्षात किमान पाच-पचवीस वेळा तरी मी बार्शीवरून आलो गेलो असेन. कॅन्सर हॉस्पिटल बद्दल बरेचसे ऐकले होते वृत्तपत्रातूनही वाचले होते पण एका मर्यादेपलीकडे या विषयात अधिक लक्ष घातले नाही इतकेच नव्हे तर माझ्या वडिलाना त्यांच्या अखेरच्या आजारात हिरेमठ हॉस्पिटलमध्ये अॅडमिट केले होते. त्याना भेटायला जात असे तेव्हा कॅन्सर हॉस्पिटलचे प्रवर्तक डॉ नेने तपासण्यासाठी आलेले असत. एक दोन वेळा त्यांच्याशी बोलण्याचाही प्रसंग आला. पण एका. कोण जाणे कॅन्सर रुग्णालयाबाबत काही जाणून घ्यावे असे माझ्या मनातदेखील त्यावेळी कधी आले नाही. पण एक दिवस मला हा विषय डोक्यात घ्यावा लागला आणि तीन-चार वर्षे आपण त्याकडे दुर्लक्ष केले याची खत वाटली.

साधारणत: सात-आठ महिन्यापूर्वीची गोष्ट असेल. अल्सरच्या आजाराने मी अंथरुणाला खिळून होतो. डॉक्टराकडे दररोज सकाळ सध्याकाळ चकरा मारीत होतो. अशात एक दिवस एका डॉक्टरानी 'काळे, तुम्हाला मोठया आतडयाचा कॅन्सर असावा असे वाटते' असे म्हटले. अर्थात हा डॉक्टराचा फक्त सशय होता, घाबरण्याचे काही कारण नव्हते. पण ते शब्द ऐकूण अक्षरश: माझ्या अंगाला घाम फुटला. आधीच मी अल्सरने अर्धमेला झालो होतो, त्यात कॅन्सरची भर. मृत्यूला घाबरत नसल्याच्या फुशारक्या सर्वजण मारीत असतात पण मृत्यू समोर दिसल्यानतर माणसाच्या मनाची काय अवस्था होते, याची कल्पना असा प्रसंग आल्यानतरच येते.

## प्रचंड खर्चाचे दडपण

माझ्या डोळ्यासमोर काजवे चमकले. कारण औषधोपचारासाठी लागणारा प्रचड खर्च. कॅन्सरच्या औषधोपचारासाठी येणारा खर्च पाहता मृत्यूच बरा वाटतो. पण केवळ औषधोपचाराला पैसे नाहीत म्हणून कोणी मरण पत्करत नाही जवळचे असेल नसेल ते किडूक मिडूक विकून, उसने-पासने घेऊन, मदत मिळवून या ना त्या मार्गाने औषधोपचाराची तजवीज करतो माझ्याही पुढे आर्थिक अडचणी होत्या. नव्हे तर अनत अडचणी होत्या. तरी देखील मी घरात

'दाता भवती वा न वा' असे म्हणतात. पण इथे सगळा योग कसा छान जुळून आला...



श्री. बाबुरावजी कथले, सौ. सर्वमंगलाबाई कथले आणि डॉ. शरद नेने

□

कल्पना न देता धडपडत राहिलो. पुण्या–मुंबईच्या चार–पाच वाऱ्या केल्या. चांगले दोन–चार हजार रुपये घालविले. जेव्हा डॉक्टरांनी सर्व काही ठीक असल्याचा निर्वाळा दिला, तेव्हा कुठे माझ्या जीवात जीव आला. मी अगदीच कफल्लक नसल्याने एवढा तरी खर्च करू शकलो. पण माझ्या जागी एखादा रोजंदारीवर काम करणारा सर्व-सामान्य माणूस असता तर त्याची काय अवस्था झाली असती हा जेव्हा मी विचार केला तेव्हा मला बार्शीच्या कॅन्सर हॉस्पिटलची उपयुक्तता पटली. त्याचे महत्त्व प्रकर्षाने जाणवले. कॅन्सर हॉस्पिट-लच्या सर्व बाजू माणूसच्या वाचकांसमोर आणण्यासाठी एखादा लेख लिहावा असा विचार चालू असतानाच, दिवाळीच्या सुट्टीत बार्शीच्या नगराध्यक्षा श्रीमती प्रभाताई झाडबुके यांची एका लेखाच्या निमि-त्ताने भेट झाली. त्यांनी कॅन्सर हॉस्पिटलबद्दल सा. माणूसने काही तरी लिहायला हवे असे सांगितले. त्यानंतर श्री. दादासाहेब गाडेकर भेटले. त्यांनी गप्पांच्या ओघात रुग्णालय उभारणीच्या पूर्वीपासूनची हकीकत सांगून सा. 'माणूस'ने एखादा विशेष अंक काढावा असा विषय असल्याचे सुचविले. श्रीमती प्रभाताई झाडबुके व श्री. गाडेकर यांची इच्छा मी श्री. श्री. ग. माजगावकर यांच्या कानावर घालताच त्यांनी तात्काळ हिरवा कंदिल दाखवला. दिवाळीनंतरचा कावीळीचा आजार, पाठीच्या मणक्याचे ऑपरेशन आणि त्यानंतर दोन महिने विश्रांती घेऊन लेख लिहिण्याच्या इराद्याने डिसेंबर अखेर मी बार्शी गाठली.

बार्शी कॅन्सर निर्मूलन ग्रामीण प्रकल्पाचा परिचय करून घेण्यापूर्वी कॅन्सरविषयी थोडी माहिती करून घेणे योग्य ठरेल. भारतात दर-वर्षी सरासरी १५ लाख लोकांना कॅन्सरची लागण होते. म्हणजे प्रत्येक साठ भारतीयामागे एक व्यक्ती कॅन्सरग्रस्त असते. तर पाच लाख माणसे मरण पावतात म्हणजे बारा व्यक्तींपैकी एकजण मरतो. एकदर कॅन्सर झालेल्या रुग्णांपैकी साठ टक्के रुग्ण मरण पावतात. यावरून त्याची भयानकता लक्षात येऊ शकते.

आपल्या शरीराचा प्रत्येक अवयव लहान लहान पेशींनी बनलेला आहे. प्रत्येक अवयवाच्या पेशींचा आकार, कार्य, कार्यपद्धती वेगवेगळी असते. या पेशींचा जगण्याचा काल ठरलेला असतो. एक पेशी मृत होताच तिची जागा दुसरी नवीन पेशी घेते. या स्थित्यंतराचाही कालावधी ठरलेला असतो. एका ठराविक काळापर्यंत ही प्रक्रिया सतत चालू असते.

दोन पेशींमधला संपर्क हा रासायनिक स्वरूपाचा असतो तसेच हे संपर्क कार्यही ज्या त्या अवयवाचे ठरलेले असते. मेंदूच्या पेशी फक्त मेंदूचेच कार्य करतात. हृदयाच्या पेशी फक्त हृदयाचेच कार्य करतात. अदलाबदलाची जी रासायनिक प्रक्रिया घडते ती त्या त्या अवयवा-तील दोन पेशींमध्ये घडते. परस्पराच्या रासायनिक संपर्कातून पेशी आपापले कार्य करतात. कॅन्सरमध्ये ही प्रक्रिया थांबली जाते. पर-स्पराच्या संपर्काला प्रतिसाद मिळत नाही. वास्तविक पाहता शरीरात प्रवेश करणाऱ्या जंतूशी किंवा कोणत्याही परकीय पेशीशी मुकाबला करणे हे काम श्वेत पेशींचे. पण कॅन्सरमध्ये श्वेत पेशींच्यात प्रवेश होऊन त्यांची रचना पूर्णपणे उध्वस्त होते. (१) पेशींची अनपेक्षित वाढ होते. (२) अनियमित वाढ होते (३) अचानक वाढ होते. (४) अनावश्यक वाढ होते. एकाच वेळी अनेक पेशी निर्माण होऊन सबंध अवयव निकामी होत निघतो.

सर्वसाधारणपणे वयाच्या पन्नाशीनंतर कॅन्सर होतो. कॅन्सरचा प्रवेश मानवाच्या शरीरात अगदी चोर पावलाने होतो. प्रारंभी कॅन्सरची विशेष अशी कोणतीच लक्षणे दृष्टोत्पत्तीस येत नाहीत. वेदनारहित अशी ही अवस्था असल्याने कॅन्सर झाल्याचे प्रथमावस्थेत लक्षात येत नाही. असे असले तरी पुढील लक्षणे कॅन्सरचा इशारा देतात.

१) चिघळलेली जखम– शरीरावर एखाद्या ठिकाणी झालेली जखम भरून येण्यास फार वेळ लागणे. तोंडामध्ये व्रण अथवा छल्ला पडून तो लवकर बरा न होणे. तोंडातील गालाच्या आतल्या बाजूला विशेषत: जिभेवरील व्रण फारच महत्त्वाचे असतात. यातच चेहऱ्यावरील व्रण मोडतात.

२) गाठ– शरीरात कोठेही गाठ अगर घट्टपणा जाणवणे. मानेवरील गाठ घशाच्या कॅन्सरची सूचना देते. स्त्रियांच्या उरोभागी, स्तनाच्या जागी गाठी होणे कॅन्सरची लक्षणे होत.

३) वजन घटणे– पोटात अगर इतरत्र कोठेही दुखत नसताना अगर जुलाब वान्त्या होत नसताना वजन घटणे, अशक्तपणा जाणवणे ही कॅन्सर लागण झाल्याची सूचना असते. थॉयराईड ग्रंथीचे अतिरेकी काम, मधुमेह अथवा अपचनाचे दोष इत्यादी आजारामुळे वजन घटू शकते, नाही असे नाही पण या कारणाखेरीज घटणारे वजन कॅन्सरमुळे घटत असते.

४) गिळताना त्रास– अन्न गिळताना छातीत अडकणे, उलटी होणे, बरेच दिवस चाललेला खोकला, दमा, अथवा, बसलेला आवाज स्वरयंत्रणेचा कॅन्सर झाला असण्याची शक्यता दर्शवितात. खोकल्याबरोबर कफातून रक्त पडू लागल्यास कॅन्सरची शक्यता असते.

५) वारवार होणारा रक्तस्त्राव– विशेषत: स्त्रियांच्या मासिक पाळीच्यावेळी होणारा रक्तस्त्राव. चाळीशीनंतर अनियमित मासिक पाळी, अनियमित व वरचेवर, विशेषत: पाळी संपल्यानंतर रक्त जाणे वगैरे गर्भाशयाच्या कॅन्सरची लक्षणे होत. मुळव्याधीमुळे पडणारे रक्त व आतड्याच्या कॅन्सरमुळे पडणारे रक्त यातील फरक प्रॉक्टोस्कोपी अगर सिगमायडोस्कोपी असा तपासून पाहिला जातो. नाकातून, तोंडातून, लघवीतून होणारा रक्तस्त्राव देखील कधीकधी कॅन्सरमुळे असू शकतो.

६) आतड्याच्या नेहमीच्या सवयीत, संडासच्या सवयीत अचानक बदल होणे, विनाकारण अपचन अथवा शौचास अवरोध, जुलाब ही देखील कॅन्सरची लक्षणे असू शकतात.

७) शरीरावर कोठे चामखीळ असल्यास त्याच्या आकारात व रंगात बदल, अंगावरील तीळ वाढू लागणे, तिळावर केस येऊ लागणे, शरीर काळवडू लागणे. रक्तक्षय (ॲनेमिया) यातून कॅन्सरची पूर्वसूचना मिळू शकते.

सर्वसाधारणपणे ही सात लक्षणे कॅन्सरची मानली जातात पण सर्वच कॅन्सर सहजासहजी वरून स्पष्ट होत नाहीत. त्यामुळे ते अधिक घातक ठरतात.

आपल्याकडे तोंडाच्या कॅन्सरचेही प्रमाण बरेच आहे. तोंडाच्या कोणत्याही भागास झालेल्या कॅन्सरला–मुख कर्करोग (ओरल कॅन्सर) म्हणतात. त्याचा परिणाम टॉन्सिलवरही होतो. रोगाच्या सुरुवातीस याचा फारसा त्रास होत नाही. पण नंतरचे जीवन म्हणजे अक्षरश: यमयातना. कॅन्सर तोंडाच्या जितक्या आतील भागास होईल, तितका तो जास्त धोक्याचा मानला जातो. या कॅन्सरचे प्रमाण ग्रामीण भागात जास्त आहे. त्याचे कारण तबाखू, विडी तंबाखू विडी घातक आहे तसा पाईप सिगारेटपण घातक आहेच. यामुळे ओठांना कर्करोग होतो. धूम्रपानाने पोटासही कॅन्सर होऊ शकतो. तोंडासही व्रण पडू शकतो. तथापी तो लवकर बरा होतो. आपल्या देशात धूम्रपानाची परंपरा प्राचीन कालापासून चालत आलेली आहे. पूर्वी हुक्का, गुडगुडी होती. त्याची जागा काही काळानंतर चिलिमीने घेतली. चिलीम गेली आणि त्याच्या जागी विडी, पाईप, सिगारेट आली. हुक्का, गुडगुडी, चिलीम, विडी, सिगारेट, पाईप याच्या आकार, रंग, रूप, चव यात विविधता असली तरी त्याचा आत्मा एकच आहे, तो म्हणजे तंबाखू. तंबाखू हा माणसाला हळूहळू कॅन्सरकडे खेचून नेणारा पदार्थ आहे.

तबाखूच्या जवळ जवळ ८५ जाती व अदाजे १८०० उपजाती आहेत प्रत्येक प्रकारच्या तबाखूची चव, रग वेगवेगळा असला तरी तबाखूतील निकोटीन सर्वत्र सारखेच असते. निकोटीन हे सर्वात जास्त घातक आहे. ते तबाखूत जास्त प्रमाणात आहे. एका सिगरेटमुळे २५ मिलीग्रॅम इतके निकोटीन माणसाच्या शरीरात जाते. तसेच Benzo ( A ) Pyrine, Dibenzo ( A–1 ) Pyrine, Dibenzo ( AB ), Authraacin, टार, कार्बन मोनोक्साईड इत्यादी अत्यंत प्रभावी कर्करोगजन्य पदार्थ त्यात आहेत. कॅन्सर निर्मितीतही निकोटीन कार्य करते. धूम्रपानामुळे शरीरातील पेशीचे वेगाने विभाजन होऊन त्याची अफाट वाढ होते. त्याला कोणीही नियंत्रित करू शकत नाही. ही वाढ घातक असते. त्याच्या गाठी तयार होतात. काही पेशी इतरत्र पसरून त्या रक्तात मिसळण्याचा प्रयत्न करतात. फुफ्फुमाचे कॅन्सरने ( Lung–Cancer ) मरण पावलेल्यांपैकी निर्व्यसनी रोग्यापेक्षा रोज दहा सिगारेट ओढणाऱ्या रोग्यामध्ये १० पटीने व रोज २० सिगारेटपेक्षा जास्त सिगारेट ओढणाऱ्या रोग्यामध्ये ४ पटीने मृत्यूचे प्रमाण जास्त असल्याचे संशोधनाती आढळून आले आहे. धुरातील विषारी रसायनामुळे तोंड, ओठ, हिरड्या, स्वरयंत्र, फुफ्फुस, श्वासनलिका इत्यादी भागाना कॅन्सर होतो. पुढे रक्तात मिसळलेली रसायने मूत्रपिंडाद्वारे रक्तातून वेगळी होतात व त्याचा साठा मूत्राशयामध्ये होतो व तेथे कॅन्सरची सुरुवात होते. चुना, तंबाखू खाणे अगर त्याच्या मिश्रणाची गोळी तोंडात सातत्याने ठेवल्याने तोंडाचा कॅन्सर होतो. विशेषत: याच कारणाने तामिळनाडूत तोंडाच्या कॅन्सरचे प्रमाण जास्त आहे. पान, तंबाखू, विडी, सिगारेटबरोबर आजकाल मद्यपान वाढत आहे. त्या प्रमाणात कॅन्सरचे रोगीही वाढत आहेत.

ओरल कॅन्सरखेरीज स्त्रियाच्या गर्भाशयाचे कॅन्सरचेही प्रमाण भारतात फार आहे. एकंदर कॅन्सरच्या प्रमाणात साठ टक्के स्त्रिया गर्भाशयाच्या कॅन्सरने त्रस्त आहेत. यातल्या अधिक स्त्रिया ग्रामीण भागातल्या आहेत.

कॅन्सर नेमका कोणत्या कारणामुळे होतो हे स्पष्ट करता आले नाही, तरी कोणतेही दाह फार काळ चालू राहिल्यास कॅन्सर होऊ शकतो हे लक्षात घ्यावे. विडी-सिगारेटप्रमाणेच अधिक सुपारी खाणे, कमरेला धोतर अगर परकर फार करकचून बांधण्यानेही कॅन्सर होतो.

जागतिक आरोग्य संघटनेच्या सर्वेक्षणावरून जगाच्या कॅन्सरच्या प्रमाणात अविकसिक किंवा विकसनशील देशात कॅन्सरचे साठ टक्के रोगी आहेत तर विकसित देशात चाळीस टक्के लोक कॅन्सरग्रस्त आहेत.

भारतात ५७५९३ खेडी आहेत. वाढती लोकसंख्या, वाढते दारिद्र्य, जुनाट रूढी, अज्ञान, चुकीच्या कल्पना, लोकाची वाढती

व्यसनाधिनता, त्याचबरोबर योग्य त्या वैद्यकीय उपचार केंद्रांचा व प्रशिक्षित तज्ज्ञांचा अभाव यामुळे कॅन्सरचे प्रमाण दिवसेंदिवस वाढत आहे, आणि ही सर्व वाढ ग्रामीण भागात आहे

भारतात कॅन्सरसबंधी कार्य करणाऱ्या एकंदर दहा सस्था आहेत. रुग्णालये जोडून असलेली पासष्ट महाविद्यालये आहेत. 'दि फेडरेशन ऑफ कॅन्सर हॉस्पिटल्स ऑफ इंडिया' ही राष्ट्रीय सस्था व सर्व हॉस्पिटल्स तिची सभासद आहेत. या सर्व ठिकाणी मिळून अवघ्या सत्तर हजार रुग्णांची व्यवस्था होऊ शकते. म्हणजे एकूण कॅन्सर झालेल्या रुग्णांपैकी अवघ्या चार ते पाच टक्के रुग्णांची व्यवस्था होऊ शकते. बाकीच्या पच्याण्णव टक्के लोकाना कॅन्सरच्या औषधोपचारापासून वंचित रहावे लागते आणि त्यातले प्रामुख्याने लोक ग्रामीण भागातले आहेत.

## टाटा संस्थेचे कार्य

भारतात कॅन्सरवर सर्व पद्धतीचे औषधोपचार करणारी, सशोधनाचे कार्य करणारी सर्वात मोठी सस्था म्हणजे मुंबईचे 'टाटा मेमोरियल हॉस्पिटल.' आशियातील प्रथम क्रमांकाची आणि जागतिक पातळीवर प्रसिद्धी लाभलेली ही एकमेव संस्था आहे. सर दोराबजी टाटा ट्रस्टने १९४० मध्ये टाटा मेमोरियल हॉस्पिटल सुरू केले. टाटा मेमोरियल ही रुग्णांची तपासणी, उपचार, शस्त्रक्रिया वगैरे करते, इंडियन कॅन्सर सोसायटी देशभर कॅन्सरविषयक लोकशिक्षण जनजागरणाचे कार्य करते तर 'टाटा फंडामेंटल रिसर्च इन्स्टिटयूट' हा संपूर्णतया कॅन्सरवरील मूलभूत सशोधनाला वाहिलेला विभाग आहे. भारतातील पहिला ग्रामीण प्रकल्प म्हणून प्रसिद्धी पावलेला बार्शी कॅन्सर निर्मूलन ग्रामीण प्रकल्प हा टाटामार्फतच राबविला जात आहे. त्यादृष्टीने टाटाने कॅन्सरविषयक केलेल्या सशोधनाची थोडी माहिती घेणे उचित ठरेल.

टाटा फंडामेंटल रिसर्च इन्स्टिटयूटमध्ये संशोधनाचे कार्य १९५२ मध्ये सुरू झाले. प्रसिद्ध संशोधक प्रा. व्ही. आर. खानोलकर हे संस्थेचे पहिले संचालक. त्यानी प्रारंभीच्या काळात जे काही कार्य केले त्यामुळे सशोधनाला चांगली गती लाभली. आज सस्थेचे जे विकसित स्वरूप आहे, त्याचा पाया खानोलकरानी घातलेला आहे. त्याला जागतिक मान्यता प्राप्त झाली आहे. टाटा इन्स्टिटयूट ऑफ फंडामेंटल रिसर्चचा एक विभाग तंबाखू सेवनामुळे भारतातील ग्रामीण भागातील लोकाना होणाऱ्या कॅन्सरवर व दंतविषयक मूलभूत संशोधन करतो या विभागाचे सशोधन १९६६ पासून केले जात आहे. या संशोधनाचे महत्त्व ओळखून अमेरिकेच्या नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ हेल्थ या संस्थेने टाटाच्या या संशोधन विभागाला मोठी देणगी दिली आहे. अमेरिकेचे मुंबईतील कॉन्सुल जनरल जे. ब्रुस ऑगस्टस् यानी ८ जुलै १९८५ रोजी ३१ लाख ४४ हजार २०० रुपयाचा चेक टी. एफ आर. च्या व्यवस्थापकीय मंडळाचे सदस्य डॉ. होमी शेठना याच्याकडे सुपूर्द केला. या अनुदानावरून संस्थेच्या कार्याचे महत्त्व लक्षात येते.

(१) बायॉलॉजिकल केमेस्ट्री (२) बायोफिजिक्स (३) सेल बायॉलॉजी (४) कार्सिनोजिनेसिस (५) सेल अँड डेव्हलपमेंट पॅथॉलॉजी (६) किमोथेरेपी (७) एन्डो क्रिमॉलॉजी (८) एपिडेमिऑलॉजी (९) इम्यूनॉलॉजी अल्ट्रा स्ट्रक्चर अशा नऊ निरनिराळया विभागात कॅन्सरच्या विविधांगावर ९० शास्त्रज्ञ व ३४ सशोधक (रिसर्च फेलोज) झटत असतात. कॅन्सर रिसर्च इन्स्टिटयूटचे आजपर्यंतचे सशोधन थोडक्यात पुढीलप्रमाणे आहे :

१) कामगारामध्ये पोटाच्या व श्वसनसंस्थेच्या कॅन्सरचे प्रमाण अधिक आहे. धूम्रपानामुळे कॅन्सर होतो तरीही लोक विड्या ओढतातच. ज्या विडीमुळे कॅन्सर होतो ती विडीच जर 'कॉटन सिल्व्हर' नावाच्या पदार्थाचे फिल्टर घालून बनविली तर तिची किंमतही जास्त न वाढता टार व निकोटीन यांच्यामुळे येणारा व कॅन्सरला कारणीभूत होणारा घातक धूरही कमी करता येईल अशा प्रकारच्या विड्या बनवून तिच्या काही चाचण्या कॅन्सर इन्स्टिटयूटतर्फे घेण्यात येत आहेत.

२) पान खाण्यामुळे तोंडाचा, घशाचा कॅन्सर होतो हे सर्वांनाच माहित आहे. पण तो नेमका कोणत्या घटकामुळे होतो या प्रश्नावर कॅन्सर रिसर्च इन्स्टिटयूटने बरेच सशोधन केले असून 'नायट्रो सायन्स' नावाची द्रव्ये याला कारणीभूत असल्याचे सस्थेचे मत आहे. तंबाखूचे पान खाणाऱ्यांच्या लाळेत हे द्रव्य जास्त प्रमाणात असते व पान न खाणाऱ्यामध्ये या द्रव्याचे प्रमाण अगदी कमी असते. असेही या संस्थेने एका पहाणीद्वारा सिद्ध केले आहे.

३) 'आयसोनिया साईड' हे औषध क्षय रोग्याच्या (टी. बी.) उपचारार्थ देतात. पण त्या औषधामुळेच कॅन्सर होतो की काय या विषयावर सशोधन सुरू असून आतापर्यंत झालेल्या सशोधनावरून असा निष्कर्ष निघतो की, हे औषध गरोदर स्त्रियाना देताना विचार करावा. कारण त्यामुळे अर्भकाला 'ट्युमर' होण्याची शक्यता असते अर्थात या संदर्भात अजूनही बरेच निष्कर्ष निघायचेत.

४) पिनियल ग्लँड या ग्रंथी स्तनाच्या कर्क रोगात महत्त्वाचे कार्य करतात असे मत या संस्थेने माडले आहे. मात्र या संदर्भात 'पूर्ण निष्कर्षाप्रत' ही सस्था आलेली नाही.

५) भारतात कुपोषणाचे प्रमाण खूपच आहे. कोटयावधी लोक संपूर्ण आहार घेऊ शकत नाहीत. या सगळयाचा कॅन्सर उपचारावरदेखील परिणाम होतो असे दिसून आले आहे. सस्थेने 'मेथो टेक्झट' या औषधावर या संदर्भात सशोधन केले आहे. हे औषध डोक्याच्या व मानेच्या कॅन्सरवर वापरले जाते. या औषधाबद्दलच्या अभ्यासात संस्थेला असे आढळून आले की असमतोल आहार घेणारे, कमी आहार घेणारे अशा लोकाच्या शरीरात हे औषध फारच हळू कार्य करते. त्यामुळे उपचारार्थ हे औषध प्रभावी न ठरण्याचे कदाचित हे कारण असू शकते.

याच कुपोषणाच्या संदर्भात हैद्राबादच्या राष्ट्रीय आहार सस्थेतील (निन) सशोधिका डॉ. कमला कृष्णास्वामी यानीही माणसाच्या आहार प्रमाणावर कॅन्सरचा धोका अवलंबून आहे असे म्हटले आहे.

राष्ट्रीय आहार सस्थेच्या नियतकालिकातील एका लेखात त्यानी त्याचे तपशीलवार विश्लेषण केले आहे. माणसाच्या आहाराच्या निश्चित प्रमाणावरच त्या त्या वयातील वजनही अवलंबून असते आणि या आवश्यक आहाराच्या गरजा माणसाने नियमित भागवायला पाहिजेत असे त्यानी सुचविले आहे. निश्चित प्रमाणापेक्षा

अधिक किंवा कमी असा दोन्ही प्रकारचा. असतुलित आहार आरोग्याला घातक आहे, यावर त्यानी भर दिला आहे. सततचा अल्पाहार हा 'कार्कोनिजीन' या कॅन्सरच्या रोगजंतूच्या प्रत्यक्ष वा अप्रत्यक्ष निर्मितीला कारणीभूत ठरतो किंवा हे रोगजंतू ज्या पदार्थामध्ये असतात त्याच्या निर्मितीलाही हा गरजेपेक्षा कमी घेतलेला आहार कारण ठरू शकतो, असे त्याचे सशोधन आहे.

आहारात सातत्याने केलेला बदल किंवा आहाराबाबत घेतलेली काळजी ही या रोगजतूच्या पदार्थाच्या निर्मितीच्या प्रक्रियेला आळा घालू शकतात. ही प्रक्रिया कमजोर करू शकतो. त्याचबरोबर तळलेले, भाजलेले, आंबट, अधिक क्षारमय पदार्थांच्या प्रमाणाबाहेरील सेवनावरही नियंत्रण घालण्याची सूचना त्यांनी या लेखातून केली आहे.

प्रमाणबद्ध आहारासाठी त्यानी ताज्या फळभाज्याचा आहार सुचविला आहे. एकाच प्रकारचा पोषक आहारही सातत्याने घेऊ नये असे त्यानी म्हटले आहे. नियमित आहारामधील पालेभाज्याचा वाढत्या प्रमाणानुसार कॅन्सरचा प्रभाव कमी होतो. अशा प्रकारच्या अनेक घटना वेगवेगळ्या पाहणी अहवालांमधून निदर्शनास आल्या आहेत. 'गॅस्ट्रो' या साथीच्या रोगाबाबत तर पालेभाज्याचा हा गुणकारी प्रभाव रोग निर्मूलनासाठी सहाय्यक ठरला आहे. पालेभाज्यामध्ये पौष्टिक सत्त्व असून फेनॉल, इन्डोनल्स, कॅन्सर प्रतिबधके निर्माण करण्यासाठी त्या पूरक ठरतात असे संशोधनातून निष्पन्न झाले आहे. या राष्ट्रीय आहार सस्थेत पालेभाज्याचे व मासाहाराचे कॅन्सर प्रतिबधाबाबतचे कार्य यावर अधिक संशोधन सुरू आहे.

६) टाटा फडामेंटल रिसर्च इन्स्टिट्यूटमध्ये किती तरी वनस्पती, समुद्र द्रव्ये (मुरीन प्रॉडक्टस्) सिंथेटिक पदार्थांवर सशोधन सुरू आहे. प्रत्येक घटक कर्करोगावर काही उपाय देऊ शकतो का हे पडताळून पाहिले जाते.

७) सस्थेने गतवर्षी कुष्ठरोगावरची लस शोधून काढण्यात यश मिळविले आहे. या लसीच्या मोठ्या प्रमाणावर चाचण्या घेण्याच्या सदर्भात प्रयत्न सुरू आहेत.

संस्थेतून दरवर्षी दोन-तीन पी. एच. डी. एम. एस्सी होतात. चर्चा सत्र, परिसवाद, व्याख्याने, परिषदा हेही सातत्याने चालूच असते.

याशिवाय टाटा मेमोरियलशी संलग्न असलेली इंडियन कॅन्सर सोसायटी, कॅन्सरमुळे अपग बनलेल्याचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करते. ही संस्था परळला काम करते. अपगाना स्वयंपूर्ण करण्याचा तेथे प्रयत्न केला जातो. १९७२ मध्ये १५ लोक अपंग झाले त्यापैकी दोघाना व्यवसाय दिला. १९७३-१३ पैकी ४ जणानां व्यवसाय दिला १९७४ मध्ये २५ अपग त्यापैकी १३ जणाना व्यवसाय दिला. वर्ष, अपग झालेल्यांची सख्या व व्यवसाय दिलेल्या रुग्णांची संख्या पुढील प्रमाणे (१९७५-५२-२२) (१९७६-३९-२७) (१९७७-२७-३९) (१९७८-२०-३०) (१९७९-२६-१९).

सर्वसाधारणपणे बहुतेक रोगांवर जो औषधोपचार केला जातो तो म्हणजे पेशींमध्ये प्रतिकारशक्ती वाढविण्याच्या पद्धतीने तर काही ससर्गजन्य लोकांमध्ये, तसेच इतर अनेक रोगामध्ये प्रतिबधात्मक लसींचा वापर केला जातो. पण कॅन्सरच्या बाबतीत अद्याप तसे काही करता आलेले नाही. कॅन्सरवर मोठ्या प्रमाणात वेदना शामक वापरले जाते. प्रतिकार शक्ती निर्माण करण्याने रोग बरा होतो, वेदना शामकाने नाही. कर्करोगावरचा खरा उपाय तेव्हाच सापडेल की ज्यावेळी आपल्या पेशीच्या जीवनाची प्रक्रिया आणि त्याच्यातील परस्पर रासायनिक सबधांची अचूक माहिती मिळेल तेव्हा.

कॅन्सरवरील रामबाण औषधाचा हुकमी उपाययोजनेचा शोध लागेल तेव्हा लागो. पण आज तरी प्रत्येकाने आपली वर्षातून एकदा नियमितपणे तपासणी करून घेण्याशिवाय तरणोपाय नाही. कॅन्सरचे निदान लवकर झाले तर सत्तर टक्के रुग्ण वाचू शकतात. हा गेल्या पचवीस वर्षाच्या प्रयत्नानंतर कॅन्सरवर सशोधन करणाऱ्या संशोधकानी आणि कॅन्सरवर औषधोपचार करणाऱ्या तज्ज्ञ डॉक्टरांनी काढलेला निष्कर्ष आहे. कॅन्सरचे लवकर निदान न झाले तर सर्वच उपाय सपतात. वर्ष दोन वर्ष मृत्यू पुढे ढकलणे आणि मृत्यूपर्यंत वेदना कमी करणे एवढेच काय ते डॉक्टराच्या हाती उरते. प्रथमावस्थेतले साठ टक्के रुग्ण वाचतात. दुसऱ्या अवस्थेतले चाळीस टक्के रुग्ण वाचतात तर तिसऱ्या स्टेजमधले फक्त तीस टक्के रुग्ण वाचतात हे समजून घ्यायला हवे.

भारतात पधरा लाख रुग्ण वर्षाकाठी कॅन्सरने आजारी पडतात. त्यातल्या फक्त सत्तर हजार म्हणजे अवघे पाच टक्के लोकांवर औषधोपचार करण्याची सोय आहे. ही सोय मुंबई, दिल्ली, चदिगड, बंगलोर, श्रीनगर, पणजीसारख्या मोठ्या शहरातून उपलब्ध आहे शहरात जाण्याचा, राहण्याचा, औषधोपचार करून घेण्याचा खर्च सर्वसामान्य माणसाच्या अवाक्याबाहेरचा आहे. केवळ हातावर पोट असलेला गरीब माणूस कोठून पैसा आणणार? भारत सरकारने देवी, मलेरिया, कुष्ठरोग निर्मूलन स्कीम्स ग्रामीण भागात राबविल्या आहेत. पण कॅन्सरबाबत तसे आतापर्यंत काही केलेले नाही. आता कुठे प्लॅनिंग कमिशनने सहाव्या योजनेत कॅन्सर कट्रोल स्कीमचा विचार माडला आहे. सातव्या योजनेत बार्शी प्रयोग प्रकल्पाच्या कार्याचा आढावा घेऊन प्रत्यक्ष कार्यवाही आठव्या योजनेत म्हणजे १९९० नतर होणार आहे.

**भारतातील कॅन्सर कंट्रोल स्कीमच्या ग्रामीण भागातील पहिला प्रयोग प्रकल्प होण्याचा मान सोलापूर जिल्ह्यातील एक लाख वस्तीचे शहर असलेल्या बार्शीला मिळालेला आहे.**

बार्शी शहर मराठवाड्याचे प्रवेशद्वार आहे बार्शी महाराष्ट्रात अनेक कारणासाठी प्रसिद्ध आहे येथला व्यापार, सुलाखे हायस्कूल, शिवाजी शिक्षण प्रसारक मंडळाचे कर्मवीर मामासाहेब जगदाळे यांचे शैक्षणिक क्षेत्रातील कार्य, सिल्व्हर ज्युबली प्रशाला, अवघ्या लाख वस्तीचे शहर, पण गेल्या तीस-चाळीस वर्षांत शैक्षणिक-क्षेत्रात सतत आघाडीवर आहे. त्याचप्रमाणे तमाशाला ज्या काळात तमाशा म्हणत, त्याचे 'लोकनाट्य' झाले नव्हते, त्या काळापासून बार्शीचे नाव तमाशा क्षेत्रात प्रसिद्ध आहे आचार्य अत्र्यांपासून पु ल. देशपांडेपर्यंत अनेक साहित्यिकानी बार्शीच्या या क्षेत्राचा उल्लेख केला आहे. चेष्टेने म्हणा की कुचेष्टेने म्हणा. बार्शीचे नाव आणखीन एका कारणाने महाराष्ट्रात नव्हे तर अखिल भारतीय पातळीवर

चर्चिले जाते. ते म्हणजे 'बार्शी लाईट रेल्वे'. वास्तविक पाहता मिरज-लातूर मार्गावरील बार्शी हे एक स्टेशन, पण या गाडीचा उद्धार मात्र मिरज लाईट, पंढरपूर लाईट किंवा लातूर लाईट न होता 'बार्शी लाईट रेल्वे' नावानेच होतो पु. ल. देशपांडेंना लंडनमध्ये भटकतानादेखील 'बार्शी लाईट रेल्वे'चे विस्मरण झालेले नाही तसे ससदेतील खासदारांनादेखील मॉस्कोतील भुयारी रेल्वे पाहताना 'बार्शी लाईट रेल्वे'ची आठवण झाल्याशिवाय राहिली नाही. तर अशा बार्शी लाईट रेल्वेने बार्शीला भारतभर प्रसिद्धी मिळवलेली आहे.

मराठवाड्यातील उस्मानाबाद जिल्हा या शहराभोवती पसरलेला असल्याने या भागाचे सपूर्ण आर्थिक व्यवहार बार्शीशी निगडीत आहे, तशी वैद्यकीय सेवाही बार्शीशीच निगडीत आहे. टॉन्सिल ऑपरेशन पासून डिलिव्हरीपर्यंत सर्व काही बार्शीत त्यामुळे बार्शीच्या वैद्यकीय क्षेत्राला पूर्वीपासून मोठे स्थान प्राप्त झालेले आहे.

बार्शी शहरात मोठी गणली जाणारी तीन रुग्णालये आहेत. नगरपरिषदेचे जवाहरलाल हॉस्पिटल. दुसरे कर्मवीर जगदाळेमामा रुग्णालय आणि तिसरे सहकारी रुग्णालय हे हिरेमठ हॉस्पिटल या नावाने ओळखले जाते. दर्जा, सेवा आणि मोल या बाबतीत सर्वात उत्तम प्रतीचे, दर्जेदार हॉस्पिटल म्हणून हिरेमठ हॉस्पिटलची बार्शी परिसरात ख्याती आहे.

## लंडन, सिडने आणि बार्शी

बार्शी कर्करोग निवारण ग्रामीण प्रकल्पाचे प्रवर्तक-निर्माते आहेत डॉ. नेने प्रकल्पाची माहिती घेण्यापूर्वी डॉ. नेने या प्रकल्पाकडे कसे वळले हे जाणून घेणे योग्य ठरेल.

डॉ नेने मूळचे बार्शीचे. त्यांचे प्राथमिक शिक्षण एक अग्रगण्य शिक्षण संस्था म्हणून महाराष्ट्रात नाव मिळवलेल्या सुलाखे हाय स्कूलमध्ये झाले. एम् बी बी. एस्. व एम्. डी. ही मुंबई विद्यापीठाची पदवी घेतल्यानंतर त्यानी लंडन युनिव्हर्सिटीत एफ् आर् सी. पी. ही डिग्री घेतली. अत्यत कुशाग्र बुद्धीचे म्हणून नावलौकिक मिळविलेल्या डॉ. नेने यांना लंडनमध्ये एका मेडिकल कॉलेजने लेक्चरर म्हणून बोलावले होते. भारतात लेक्चरर किंवा प्रोफेसराला शाळा मास्तराची सुगुरलेली आवृत्ती यापलिकडे स्थान नाही, आणि किमतही नाही पण इंग्लंडमध्ये तसे नाही. आपल्याकडे कुस्ती खेळणारा पैलवान जसा अमूक तालमीतला पठ्ठा आहे, वमूक वस्तादाचा चेला आहे, याचा कुस्तीच्या वेळी उल्लेख करीत असतो, तसे दुसरे महायुद्ध गाजविलेला चर्चिलसारखा पतप्रधानदेखील स्वत:च्या कर्तृत्वाबद्दल बोलण्यापूर्वी आपण कोणत्या गुरूच्या पायाशी बसून धडे गिरवले हे अभिमानाने सांगत असतो त्याच्याशी आदराने वागतो. अशा विद्येचे माहेरघर असलेल्या, ज्ञान व विद्वत्ता या विषयी आदर असलेल्या आणि दोन अडीचशे वर्षांची शैक्षणिक परंपरा लाभलेल्या लंडन मेडिकल कॉलेजची प्रतिष्ठेची ऑफर नाकारून डॉ. नेने यांनी भारताकडे प्रयाण केले ते आपल्या भागातील गोरगरीब लोकांसाठी काही तरी करायचे हे मनाशी ठरवून.

भारतात आल्यानंतर त्याना दुसरी मोठी ऑफर आली तो खुद्द भारत सरकारकडूनच. ऑस्ट्रेलियात सिडने येथे भारत सरकारला एक मेडिकल कॉम्प्लेक्स उभा करायचा होता. त्याचे संचालक म्हणून डॉ. नेने याना बोलावण्यात आले होते; पण त्यानी स्पष्ट शब्दात नकार कळविला. इतकेच काय पण मुंबईच्या जसलोक हॉस्पिटलचीही ऑफर त्यानी नाकारली. डॉक्टराची पत्नी रोहा-कोकणातली. मुंबईला बालपण गेलेले साहजिकच पत्नीचा आग्रह होता की, डॉक्टरानी इंग्लंड नाही तर निदान मुंबईत राहण्याचा विचार करावा. पण डॉक्टरानी अमान्य केले. लठ्ठ पगार, सर्व अत्याधुनिक सोयीने युक्त निवासस्थान, प्रतिष्ठेची जागा लाथाडून डॉ. नेने बार्शीला आले त्याचे कारण म्हणजे परदेशात जाण्यापूर्वी त्यानी वडिलाचा आणि वडिलाचे स्नेही डॉ. आप्पासाहेब हिरेमठ याना बार्शीत येऊन प्रॅक्टीस करण्याचे दिलेले वचन.

आर्थिक अडचणीमुळे अनेक तरुणांना शिक्षणासाठी विशेषत: परदेशी जाऊन शिक्षण घेण्यासाठी कुठे तरी स्वत ला बाधून घ्यावे लागते परदेशात जाण्यापूर्वी काही तरी कमिटमेंट्स या तरुणाना कराव्या लागतात. त्यात धनको सांगेल त्या मुलीशी लग्न करण्याचे किंवा त्याच्या सस्थेत वा ते सागतील त्या ठिकाणी नोकरी करणे वगैरे अटी असतात. डॉक्टर नेने यानी आपल्या वडिलाना, आणि त्याचे स्नेही डॉ आप्पासाहेब हिरेमठ याना जो शब्द दिला होता तो कोणत्या अपेक्षेने किंवा पदरात परदेशी वारी पाडून घेण्याच्या हेतूने नव्हे, तर आपल्या वैद्यकीय ज्ञानाचा उपयोग आपल्या भागातील गोरगरीब लोकासाठी करायला हवा हे वडिलाचे विचार त्यांना योग्य वाटले म्हणून. वडिलाच्या उदात्त, राष्ट्रवादी विचारानी प्रभावित होऊन डॉक्टरांनी हा निर्णय घेतलेला होता. स्टॅम्प पेपरवर लिहिलेले करारदेखील जिथे पद्धतशीर उधळून लावले जातात तिथे तोंडी दिलेला शब्द कोण पाळतो ? असे सांगतात की राजा हरिश्चद्राने स्वप्नात दिलेल्या वचनाचो पूर्तता करण्यासाठी राज्यत्याग केला होता, आजचा काळ वेगळा आहे. जागेपणी दिलेले वचन स्वप्नातदेखील न पाळणाऱ्या आजच्या माणसाच्या जमान्यात वडिलाना दिलेला शब्द कोण पाळतो; पण डॉ. नेने यानी ते वचन पाळले आणि सर्व प्रलोभने दूर सारून ते बार्शीला परतले व सरळ हिरेमठ हॉस्पिटलमध्ये दाखल झाले.

डॉ. नेने हिरेमठ हॉस्पिटलमध्ये काम करायला लागल्यानतर त्याचा बार्शीचे माजी नगराध्यक्ष श्री. बाबुरावजी कथले यांच्याशी परिचय झाला या परिचयाचे कारण म्हणजे बाबुरावजीच्या पत्नी सौ. सुवर्णमगलाबाई कथले याना त्यावेळी आलेला पॅरलिसिसचा ॲटॅक. स्वत: बाबुरावजीही आजारीच होते. शिवाय बाबुरावजींच्या ७८ वर्षांच्या मातोश्री श्रीमती लक्ष्मीबाई कथले, याही अस्थमाने आजारीच होत्या. बाबुरावजीच्या जन्मापासून कथले कुटुबाचा दवाखाना कधी सुटला नाही सतत कोणी ना कोणी आजारी असायचेच. 'फॉरेन रिटर्नड' हे डॉक्टर नेने याच्या भोवतीचे वलय प्रभावी होते. साहजिकच कथले कुटुंब त्याच्याकडे वळले. आणि विशेष म्हणजे डॉ. नेने याच्या औषधोपचाराने तिघानाही आराम पडला. त्यामुळे त्यांचा डॉक्टरावर खूपच विश्वास बसला. आणि त्याचे रुपातर गाढ प्रेमात झाले. ही दोघाची स्नेहभेट एका भावी प्रकल्पाची नांदी ठरली. नतर कथले ट्रस्ट कसा स्थापन झाला याची हकिकत प्रारंभी दिलेली आहेच.

दरम्यान टाटा मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटलचे संचालक पद्मभूषण डॉ. प्रफुल्ल देसाई याची आणि डॉ. नेने यांची मुबईत एक दिवस भेट झाली. डॉ. देसाई हे नेने याचे गुरू. इंग्लंडहून बार्शीला परतल्यानतर डॉ. नेने यानी शिष्यत्वाच्या नात्याने कॅन्सरच्या अनेक केसेस टाटा मेमोरियलकडे पाठविल्या होत्या. त्या सर्व केसेस डॉ. देसाई यानी हाताळल्या होत्या. डॉ. नेने मुबईला जात त्यावेळी गुरूना– डॉ. देसाई याना आवर्जून भेटत. पाठविलेल्या केसेससबंधी तसेच अन्य अनेक विषयावर त्याच्यात चर्चा होई. एकदा गप्पाच्या ओघात डॉ. देसाई यानी आपली व्यथा डॉ. नेने यांच्याजवळ बोलून दाखविली. ते म्हणाले, डॉक्टर काम एवढे प्रचड आहे की रात्रदिवस आठ–आठ–दहा–दहा ऑपरेशन्स आमच्याकडे चालू असतात. तरी देखील हजारो रुग्ण ऑपरेशन लिस्टवर ताटकळत ठेवावे लागतात. काही वेळा रुग्ण प्रथम स्टेजमधून दुसऱ्या स्टेजमध्ये आणि दुसऱ्या स्टेजमधुन तिसऱ्या स्टेजमध्ये गेल्यानतर त्याचा नबर लागतो त्यात आमचे श्रम व वेळ वाया जातो. रुग्णांचा पैसा वाया जातो. हे कुठे तरी थाबायला हवे. कॅन्सरसेवा विकेंद्रीत व्हायला हवी. कॅन्सर रुग्ण मुख्यतः ग्रामीण भागातून येत असल्याने तेथून शहराला येणारा खर्च फार असतो. त्यासाठी कॅन्सर औषधोपचार ग्रामीण भागात आले तर फार बरे होईल. आमच्या वरचा ताण कमी होईल.

### प्रकल्प साकारू लागतो

कथले दांपत्याच्या इस्टेटीचा ट्रस्ट ११ नोव्हेंबर १९८० मध्ये स्थापन झाला होता. पुढे काय करायचे हा प्रश्न डॉ. नेने याच्यापुढे होताच. डॉ. देसाईच्या व्यथेने डॉक्टरानी स्वतःलाच प्रश्न विचारला, 'काय कॅन्सरग्रस्तांसाठी आपल्याला रुग्णालय काढता येणार नाही का ?' हाच प्रश्न त्यानी आपल्या सहकारी मित्रमंडळीपुढे माडला. त्यावर बरीच उलटसुलट चर्चा झाली आणि त्यानतर त्यांनी सप्टेंबर १९८१ ला डॉ. देसाईंना एक पत्र लिहिले. या पत्रापाठोपाठ त्यानी केंद्र सरकार, वेल्लोरचे मिशनरी हॉस्पिटल व मुबईचे टाटा मेमोरियल यानाही पत्रे टाकली.

सप्टेंबर ते डिसेंबर ८१ या चार महिन्याच्या काळात डॉ. नेने यांनी डॉ. देसाईंना अनेक पत्र पाठविली; पण एकाही पत्राला उत्तर नाही. तेव्हा एक दिवस ते स्वतः डॉ. देसाईंना भेटायला मुबईला गेले. पत्राबाबत त्यानी देसाईंना विचारले तेव्हा ते म्हणाले 'आम्हाला ग्रामीण भागात कॅन्सर सेंटर हवे आहे. प्रथम मला महाराष्ट्राच्या नकाशात बार्शी कुठे आहे ते दाखवा.' डॉ. नेने यानी बार्शी हे शहर असले तरी ग्रामीण भागात मोडते याची डॉ. देसाईंना खात्री करून दिली. तेव्हा डॉक्टर देसाईंनी ८ मार्च ८२ ला बार्शी गावात मोफत कॅन्सर निदान शिबिर आयोजित करण्यास सुचवून नऊ सहकाऱ्याबरोबर स्वत. हजर राहण्याचे आश्वासन दिले.

डॉ. नेने यानी बार्शी परिसरात ८ मार्च ८१ च्या शिबिराचा भरपूर प्रचार केला. त्याचा परिणामही चागला झाला. या शिबिरात १५०० लोकाची तपासणी झाली. त्यात २१ रुग्ण आढळले. शिबिर खूपच चागले झाले. या शिबिरामुळे बार्शी परिसरातील भागात वातावरण चागले ढवळून निघाले.

डॉ. देसाई यानी डॉ. नेने आणि त्यांच्या सहकाऱ्याशी चर्चा करताना शिबिरासाठी हजर असलेले लोक, त्याना बार्शीपर्यंत येण्यासाठी, राहण्यासाठी परतण्यासाठी लागलेला खर्च व दररोज त्याना मिळणारी मजुरी याचा हिशेब माडला. तपासणी मोफत असली तरी शहराच्या ठिकाणी जाऊन तपासणी करून घेणे गोरगरीब लोकाना परवडणारे नाही. प्रत्येक खेड्यात जाऊन तेथील एकूण एक माणसाची तपासणी केली तरच कॅन्सर नियंत्रित होऊ शकेल, अन्यथा नाही हे डॉ. देसाई यांनी डॉ. नेने आणि त्याच्या सहकाऱ्याच्या निदर्शनास आणून दिले.

डॉ. प्रफुल्ल देसाई यांनी कॅन्सरच्या क्षेत्रात बजावलेल्या कामगिरीबद्दल भारत सरकारने पद्मभूषण किताब त्यांना त्यावेळी नुकताच दिला होता. या निमित्ताने बार्शी शहराच्यावतीने त्याचा सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमात एकाने त्याना प्रश्न विचारला, 'डॉक्टर शिबिरातील किती जणाना कॅन्सर आहे ?'

त्यावर डॉ. देसाई म्हणाले,

'परमेश्वर कृपेने कॅन्सर कोणालाही असू नये पण मी यातला एक जरी पेशट वाचवू शकलो तरी स्वतःला धन्य समजेन.'

प्लॅनिंग कमिशनने भारतात कॅन्सर कट्रोल स्कीम राबविण्यासाठी सहाव्या योजनेत तरतूद केली होती आणि मुंबईच्या टाटा मेमोरियल हॉस्पिटलमार्फत ही स्कीम राबविली जाणार होती. त्यादृष्टीने डॉ. देसाई याची चाचपणी चालूच होती. डॉ नेने याच्यासारखा ध्येयवादी डॉक्टर, परिश्रम करण्यास सदैव तयार असलेल्या कार्यकर्त्यांचा मोठा सच, भरपूर जागा, कोरडी हवा असे डॉ. देसाईंना हवे ते ठिकाण मिळाले होते. डॉ. नेने यानी आपल्या सहकाऱ्यावरोबर विचार विनिमय करून कॅन्सर हॉस्पिटलची योयना तयार केली होती ती डॉ. देसाईपुढे ठेवली. डॉ. देसाईंना एकदर योजना आवडली. त्यांनी त्यास मान्यता देऊन, ग्रामीण भागात काम करण्यास सोयिस्कर ठरावे म्हणून ८ लाख रु. किमतीची मोबाईल व्हॅन देण्याचे आश्वासन देऊन, बार्शीकराचा निरोप घेतला.

कथले ट्रस्टनी कॅन्सर हॉस्पिटलला सात एकराची जागा दिली. टाटा मेमोरियल हॉस्पिटलने तांत्रिक मदत दिली केंद्र सरकारने ग्रामीण भागात रुग्णांना जाऊन तपासण्यासाठी मोबाईल व्हॅन दिली. ट्रस्टच्या कार्याला मर्यादा पडतात. या मर्यादा लक्षात घेऊन 'अश्विनी रूरल कॅन्सर रिसर्च अॅंड रिलीफ सोसायटी' स्थापन करण्यात आली. २ मे १९८१ रोजी ही सोसायटी अस्तित्वात आली.

सौ. सर्वमगलाबाई उमेश्वर कथले ट्रस्ट आणि 'अश्विनी रूरल कॅन्सर रिसर्च अॅंड रिलीफ सोसायटी' ही 'टाटा मेमोरियल रूरल कॅन्सर प्रोजेक्ट' व 'कै. नर्गीस दत्त मेमोरियल कॅन्सर हॉस्पिटल' असे दोन उपक्रम चालविते. सातव्या पंचवार्षिक योजनेत सपूर्ण देशाचा कॅन्सर सर्व्हे घेण्याचा केंद्र सरकारचा विचार आहे. त्यासाठी मॉडेल सेंटर म्हणून बार्शी कॅन्सर सेंटरचे निष्कर्ष अन्य भागासाठी प्रमाणभूत व आदर्श मानले जातील.

बार्शी शहराच्या उत्तरेला – हिरेमठ हॉस्पिटलपासून साधारणतः सहा–सात किलोमीटर अतरावर या हॉस्पिटलच्या उभारणीचे काम चालू आहे. एके काळचा रुक्ष, ओसाड प्रदेश आज एखाद्या बागेसारखा वृक्षराजीनी वेढलेला आहे लोकाच्या जाण्या येण्याने गजबजून गेलेला आहे. बार्शी शहराचे, सोलापूर जिल्ह्याचे, महाराष्ट्राचे

किंवा देशाचेच नव्हे तर परदेशाचे लक्ष या केंद्राने वेधले आहे. जागतिक आरोग्य संघटना बार्शी केंद्राच्या कार्याचे चौकशी करीत आहे. निरीक्षण करण्यासाठी तज्ज्ञांना पाठवीत आहे.

बार्शी कॅन्सर हॉस्पिटलचा प्रकल्प एकूण पाच कोटी रुपयांचा असून १९९२ पर्यंत तो तीन टप्प्यात पूर्ण केला जाणार आहे. प्रकल्पात १) डायग्नॉस्टिक २) ट्रिटमेंट ३) रिसर्च असे तीन विभाग उभारले जाणार आहेत.

१) डायग्नॉस्टिक विभागात डिटेक्शन आणि डायग्नॉसिस हे म्हणजे कर्करोग तपासणी व निदान असे दोन भाग असतील. यात, रेडीओलॉजी, पॅथॉलॉजी, सायटोलॉजी, बॅक्ट्रीयालॉजी, हॅमेटोलॉजी, बायोकेमेस्ट्री, हिस्टोपॅथोलॉजी, मोबाईल व्हॅन युईथ अल्ट्रा सोनोग्राफी गॅमा कॅमेरा याचा समावेश असेल.

२) ट्रिटमेंट विभागात सर्जिकल, मेडिकल रेडिओथेरपीचा समावेश असेल.

३) रिसर्च विभागात ॲलोपॅथी पद्धतीच्या क्लिनिकल ट्रायल्स, एक्सपेरिमेंटल सर्जरी व आयुर्वेद पद्धतीच्या औषधोपचाराचेही संशोधन करण्यात येणार आहे.

एकंदर हे २५२ खाटांचे हॉस्पिटल आहे. यात चाळीस खाटांचे चार जनरल वॉर्डस् असतील तर २० खाटांचा एक जनरल वॉर्ड असेल. यात एकूण १८० खाटांचा समावेश आहे. तर ७२ खाटा या स्पेशल रूम्समध्ये आहेत. यातल्या वीस टक्के खाटा या समाजातल्या दुर्बल घटकांसाठी पूर्णपणे मोफत असतील, तर चाळीस टक्के ओपिडीतील केसेसवर पूर्णपणे मोफत औषधोपचार केले जातील.

हॉस्पिटलच्या प्लॅनमध्ये सभागृह, वाचनालय, रिडींग रूम, रिसर्च ॲंड डेव्हलपमेंट लॅब आणि धर्मशाळेचा समावेश आहे. रुग्णांना हॉस्पिटलच्या खर्चाने जेवण देण्याचीही योजना आहे. त्यासाठी काही रक्कम फिक्स्ड डिपॉझिटमध्ये ठेवली जाणार आहे. पाच कोटी रुपयांपैकी रोगनिदानावर एक कोटी रुपये, उपचार विभागावर दोन कोटी रुपये व संशोधनावर दोन कोटी रुपये खर्च केले जाणार आहेत.

हे पाच कोटी रुपये एक तृतीयांश स्कीमप्रमाणे संकलित केले जाणार आहेत. यातले एक तृतीयांश म्हणजे १ कोटी ७० लाख रु. संस्थेने गोळा करायचे आहेत. १ कोटी ७० लाख राज्य सरकारने व १ कोटी ६० लाख रुपये केंद्र सरकार देणार आहे.

२ मे १९८१ ला कॅन्सर हॉस्पिटलची योजना कार्यान्वित झाली. पाच वर्षात ७५ लाख रुपयांच्या जवळपास गुंतवणूक झालेली आहे. सध्या हॉस्पिटलमध्ये २४ स्पेशल रूम्स आहेत व २० रुग्णांची सोय असलेला जनरल वॉर्ड आहे. क्ष किरण विभागाची तीन मजली इमारत उभी आहे. ८ फेब्रुवारी ८४ रोजी डॉ. बेट्टींच्या हस्ते या इमारतीचे नामकरण 'एस. यु. कथले ट्रस्ट – अश्विनी रूरल कॅन्सर रिसर्च रिलीफ सोसायटी बार्शी द्वारा संचलीत नर्गीस दत्त क्ष किरण विभाग' असे झाले आहे.

सध्या दोन सर्जन्स, पॅथॉलॉजी, सायटॉलॉजी, एक्सरे, रेडिओग्राफी टेक्निशियन्स, मायक्रोस्कोप स्टडी वगैरे वीस लोकांचा संच आहे. सुसज्ज ऑपरेशन थिएटर तसेच डॉक्टर्स व कर्मचाऱ्यांच्या निवासाची सोय तयार आहे. या सर्वांवर सुमारे २२ लाख रुपये खर्च झाला आहे. हॉस्पिटलच्या डायग्नॉस्टिक विभागाच्या उद्घाटनाला विख्यात उद्योगपती जे. आर. डी. टाटा, प्लॅनिंग कमिशनचे चेअरमन डॉ. सेठना व पद्मभूषण डॉ. प्रफुल्ल उपस्थित होते. लवकरच कोबाल्ट युनिटची पूर्तता होईल.

(उत्तरार्ध पुढील अंकी)

पुस्तके

## त्यांना 'जय' म्हणण्याचा अधिकार नाही – 'युगयात्रा'

'युगयात्रा' हे 'ज्वाला आणि फुले'मध्ये बाबा आमटेंचे चिंतन आणि रमेश गुप्ताचे शब्दांकन आहे त्याप्रमाणे वसंत लुले यांचे चिंतन आणि रमेश गुप्ता यांचे शब्दांकन आहे. याच प्रकाराला इथे नाव फक्त बदललय. आशय आणि शिल्प असं घाटदार नाव दिलय. हे विचार काव्य आहे, म्हणजेच विचारोन्मुख करणारी कविता आहे. मुखपृष्ठावरील साखळदंड, खुर्ची, काळे झेंडे, पाहूनच कळतं की ही अभावग्रस्तांची कळ आहे. त्याकळेपोटी येणारा आक्रोश आहे. Starvation च्या Prisoners ना पहिल्याच पानावर a better world is in birth अशी आशा दाखवलीय. पण ही युगयात्रा किती युगं चालणार आणि केव्हा नव्या युगाचा जन्म होणार ? हा प्रश्न पडतोच. भारतीय युद्धानंतर युगांत झाला. पण जात आणि वर्ग यांचं निर्मूलन करणारा युगांत प्रलयाबरोबर होणार का ?

गवतासारखा पसरणारा, न वाढणारा सुमार माणूस हा शिल्प आणि आशयकर्त्यांचं खरं लक्ष्य आहे. त्याचप्रमाणे प्रस्थापितांना भरपूर जोडेही आहेत. त्यामुळे या चिंतनाची डावी मार्क्सवादी प्रत लक्षात येते. पण आतलं चिंतन आणि शिल्प पाहिल्यावर कळतं की यात मार्क्सच्या वारसदारांकडून लाथाडला गेलेला आणि त्यांची बिंगं बाहेर काढणारा सोल्झेनित्सनही आहे. 'त्यांना जय म्हणण्याचा अधिकार नाही' या शिवाजी वरच्या कवितेत–

आणि तो फक्त हिंदू व हिंदूंचाच नव्हता
पण त्याचा हिंदुत्ववादी वारसा सांगणारे
बाळबोध महापुरुष
या गरीब बिचाऱ्या देशात
गेले अर्धशतक राबराबता
आणि मार्चटाईम करीत आहेत.
या एवढ्या अवधीतच
त्याने गाठला होता पूर्णतेचा प्रचंड पल्ला.
त्यांचा शिवाजी म्हणजे डॉन क्विक्झोट

पवनचक्कीवर चालून जाऊन
तिची गतिमान राक्षसी पाती
आपल्या दांडक्याने अडवण्याचा
बिनडोक प्रयत्न करणारा.

इतकं परखडपणे आशय शिल्प घडवणारे लुले गुप्ता हिमालयाची स्वप्ने पहाणाऱ्या धवलगिरीची म्हणजेच गोळवलकर गुरुजी-नाही स्तुतिभरल्या कवितेची गुरुदक्षिणा देतात. त्यामुळे प्रस्तावनाकारानी म्हटल्या-प्रमाणे वृत्तपत्रीय ताजेपणाकडे, स्थलकाल-सापेक्ष जीवनरूपाकडे नेणारे लेखन आणि स्थळकाल निरपेक्ष जीवनरूपाकडे नेणारे ललित लेखन याच्यातली जी सूक्ष्म पण गहन दरी आहे ती युगयात्रेसारखे लेखन भरून काढते, तिच्यावर सेतू उभारते. त्यामुळे सकृत्दर्शनी दिसणारी विसगती ही विसंगती नसून कुपणापलीकडची सुसगतीच आहे.

'बेडकाचे महानगर' या रूपक काव्या-तील प्रातिनिधकतेला तोड नाही. वर्तमान-कालातल्या समाजाच, माणूस या किडयाच किळसवाण सत्यदर्शन यात घडतं.'मार्गदर्शिका' लिहून महाल माडया उठवणारे चतुर बेडूक बहुसख्येने आहेत. ताजमहालचे सगमर्मर मिळाल्यास ते लपास करून गृहनिर्माण सोसायटयाची टेंडरे भरणारे प्रेमवीरच जनानखाने बाळगून आहेत' साप्रतच्या तरुणाईवरचे हे कोरडे किती चपखल आहेत.

'त्याच्या अखंड सुरावटीत आपलाही सूर बेमालूम मिसळून सतत सुमारपणाच्या समेशी रहा.

जे जे पडेल तेच येथे उभे राहू शकते.

यात गगनगामी नाव घेणाराचं आकाशच गहाळ होईल, चिखलाने मढवलेल्या बदिस्त सुखासीन कवीची अतरिक तळमळ वाच-कालाही तितकीच तळमळत ठेवते. '

प्रतिष्ठेपेक्षाही पूर्णतेकडे झेप असणाऱ्या शिवाजीच खरंखुरं मूल्यमापन पोटतिडिकेनं करताना कवी म्हणतात--

आणि ज्याच्या मनाना आभाळेच नाहीत
त्याच्यासाठी शिवाजी म्हणजे एक बाजारू चलन.
वा दिवाणखान्यातील एक आरसा.
अथवा सभा जिंकण्यासाठी एक हुकमी एक्का.
एक पोकळ डौल एक उपचार.
आणि ज्याचा शिवाजी असा कागदी दिखाऊ
ज्याला एखाद्या टेंगळाहून उच आकार नाही
त्याना त्यानी जय म्हणण्याचा अधिकार नाही.

क्रातीच्या नग्न निस्सीम गहन गूढ गाभ्याशी धडकणाऱ्या त्या गतीच्या गुलामाचे सायकेडेलिक व्हिजन पाहून भोवळ न येणाऱ्या स्वत· कवीनी, विवेक शाबूत असणाऱ्या विवेकानदानी आणि त्यातूनच उगवलेल्या आजच्या सतप्त तरुणांनी भिकेसाठी पसर-णाऱ्या हातापेक्षा जाळण्यासाठी धजणारे हात अधिक समर्थ नाहीत काय? या विचार-लेल्या प्रश्नाला काय उत्तर आहे आपल्या-पाशी ?

अरे, तरुणाना दलिताच्या विजयाचे
एक लढाऊ तत्त्वज्ञान देणाऱ्याना
मार्क्सचे आकर्षण वाटणार नाही, तर काय अभावाची उपासना शिकवणाऱ्या महात्म्याचे वाटेल ?'

असा सवाल करणारे आशयघन शब्दप्रभू कवी महात्म्याला मानत नाहीत. इतकेच नाही तर 'बेडकाच्या महानगरामध्ये' स्मिताचे दोन मद बुडबुडे ओठाशी उमटवीत महात्मा म्हणाला.' इथे महात्म्याचा सरळ सरळ अधिक्षेप आहे त्याचप्रमाणे शिवाजी किंवा धवलगिरी हिटलर होऊ शकले असते म्हणून हिटलरलाही कवीनी नापास केलाय त्यावरून आशय शिल्पकाराची भाषा कितीही तिखट असली तरी त्याना सुवर्णमध्याची ओढ आहे हे स्पष्ट आहे.

आत्म्याचे अन्न पिकवणारे, त्यागाचा परि-त्याग करणारे आणि कवीची भव्य युगारभ नाही पण युगसधी म्हणून गौरविलेले बाबा आमटे फार जवळचे वाटतात. आधारभूत वाटतात.

युगयात्रा, गुरुजी आवेडकर, जयप्रकाश, सोल्झेनित्सिन्, बाबा आमटे, प्रियदर्शनी या सर्वांचेच गुण गाते. पण भाटगिरी कुणाचीही करत नाही. म्हणूनच प्रस्तावनाकारानी म्हटल्याप्रमाणे तो सामान्य नागरिकाचा मुक्त उद्गार आहे अस म्हणायला हरकत नाही.

## मी डॉक्टर कसा झालो ?

डॉ. डी. जी. पटवर्धनाच 'मी डॉक्टर कसा झालो ?' हे आत्मचरित्र हातात घेतलं आणि अनेक वर्षे कापराच्या वडीसारखी उडून गेल्यासारखी वाटली. डॉक्टर पटवर्धन माझ्या वडिलाचे समकालीन, समवयस्क, समव्यवसायी त्यामुळे पुस्तक वाचण्याआधीच एकप्रकारचा आदरमिश्रित आनद मनात उचबळून आला.

'मी डॉक्टर कसा झालो' हे पुस्तकाच शीर्षक असलं तरी बालपणापासूनच्या जीव-नाचा सर्व तपशील, डॉक्टर झाल्यावर त्या व्यवसायातले आणि सासारिक अनुभव यात अतर्भुत असल्यामुळे याला आत्मचरित्र हे नाव द्यायलाच हरकत नाही.

आत्मचरित्र लिहायच कारण डॉक्टरांनी पुढच्यास ठेस मागचा शहाणा अस दिलय. म्हणजे त्यानी आयुष्यात ज्या काही चुका केल्या त्या पुढच्या पिढीने करू नयेत ही सदिच्छा त्यामागे आहे. पण पुस्तक पूर्ण वाचल्यावर कळते की दैवी आपत्ती डॉक्टरा-वर बऱ्याच आल्या. आईचा लहानपणी झालेला मृत्यू, वडिलाच दुर्लक्ष, मुलाच्या मनाचा काही एक विचार न करता एखाद्या वस्तूसारख त्याला इकडून तिकड हलवण. परीक्षेच्या वेळी सग्रहिणी, डेंग्यूसारखे आजार होण, वडिलाच्या मृत्यूमुळे सैरभैर होण या सर्व अस्मानी आपत्ती झाल्या. पण डॉक्ट-राच्या स्वत·च्या हातून कुठेही कसलीही गफलत झाल्याचे दिसत नाही. उलट डॉक्ट-राची शिस्तशीर वागणूक, व्यवस्थित नोंदी करून ठेवायची घेतलेली खबरदारी, कष्टाचा बागुलबुवा न करण हे गुणच त्यात दिसून येतात. त्यांनी स्वत.च्या हातानं कुठलीच ठेच लागून घेतली नाहीय. इतक्या अडचणी, कष्ट, काही वेळा अपमानही सोसावे लागले. काकाकडे ठेवल्यावर त्यानी सर्व नोकर काढल्यामुळे वीस वीस हडे पाणी भरावं लागल पहाटे उठून अस असूनही डॉक्टराना एकत्र कुटुबाविषयी जी आस्था आहे त्याच कौतुकमिश्रित नवल वाटत. सुनेवर मुली-प्रमाणे प्रेम करणारे सासूसासरे आणि त्याही-पेक्षा विधवा स्त्रियाना आत्मियतेची आणि मानाची मिळणारी वागणूक. या त्याच्या विचाराशी मला वाटत फार थोडे लोक सह मत होतील निदान मी तरी होणार नाही. कारण विधवा स्त्री ही कुणीही कशीही वाप-रावी अशी वस्तू असे, अडचणी काढणारं यत्र असे. एकदरच स्त्रीच कुठलही व्यक्तित्व अधिकार याशिवाय नुसत घरात राबणं. हे

स्त्रीचं फारस उत्साहवर्धक स्थान नव्हतं.

डॉक्टराचा कष्टाळूपणा, कर्तव्यनिष्ठा, जिद्द, सचोटी त्यामुळे आलेला निर्भीडपणा आणि आत्मविश्वास, आलेली सधी न चुकता पकडणं; पण सधीसाठी याचना न करण या सर्व गुणामुळे यशस्वी झालेलं तृप्त आयुष्य अस डॉक्टराच्या जीवनाच वर्णन करता येईल.

डॉक्टराना घडविण्यात सिहाचा वाटा रावसाहेब टिळक या त्याच्या मातामहाचा आहे. सावत्र आईला वडील गेल्यानतर केलेल्या दरमहा पन्नास रुपयाच्या मनीऑर्डरच्या पावत्या जपून ठेव, हे त्यानीच शिकवले आणि पुढे डॉक्टर एका तोहमतीतून सुटले स्वत चार वाजता उठून व्यायाम करण्याची त्याची सवयही डॉक्टरावर व्यायामाच महत्त्व नियमितपणा वगैरेचे सस्कार करून गेली

त्याचप्रमाणे येईल त्या परिस्थितीत डॉक्टराना साथ देणाऱ्या, द्रव्यापासून कष्टापर्यंत त्याच्या पत्नी उषाताई पैशाचे गैरव्यवहार करणारे, खोटे बोलणारे; पण डॉक्टराना पित्याची माया देणारे नानामामा आणि भोळीभाबडी मामी ही मडळी आपला ठसा उमटवतातच.

बडोद्याला कृष्णाबाई कोरेन डॉक्टराचा चागला पाहुणचार केला; पण एका दूरच्या नात्यातील गृहस्थानी अजिबात दखल घेतली नाही ही नोद गालबोट लावते. त्याचप्रमाणे मत्सरग्रस्ताची ठायीं ठायी घेतलेली दखलही बोचते तशीच काही वेळा अंधश्रद्धाह खटकते विशेषता एका प्रख्यात नेत्रशल्य चिकित्सकाची.

जो मुलगा मामलेदार कचेरीत कारकून व्हायचा. तो एकवेळ उपाशी राहून ट्रामचा एक आणा वाचवण्यासाठी रखडून विलायतेला जातो,पोटमाळ्यावर रहातो, कुठल्याही प्रलोभनाला, व्यसनाला बळी न पडता ध्येय साध्य करून निष्णात नेत्रशल्य चिकित्सक होतो. हे कौतुकास्पद तर आहेच पण पुढच्या पिढ्याना मार्गदर्शकही आहे.

रमाकात धनोरकरानी एक डोळा आणि त्याला लावलेल्या प्रश्नचिन्हाकित स्टेथॉस्कोप अस बटबटीत मुखपृष्ठ का काढावं ? जरा सूचक काढल असत तर बर झाल असत. ¤

## हास्यांगना

पंडित क्षीरसागर याचा हास्यागना हा विनोदी कथासग्रह हाती घेतला. विश्वमोहिनी शारदेन 'हेचि फळ काय मम तपाला ?' म्हणून विषण्ण व्हाव अस त्याचं मुखपृष्ठ पाहिल. भला मोठ्ठा गॉगल घातलेली दोन चिंध्या किंवा पट्ट्या म्हणूया त्यालेली उडत्या केसाची पाण्यागना. तिचा पूर्ण पोषाख केलेला तसाच मोठा गॉगल घातलेला कुत्रा. तिला पाहून की काय खुषीत उसळणारा समिदर, त्यातल्या इवल्याशा होडीला तरू न देणारा आणि टवाळा आवडे विनोद या रामदासाच्या उक्तीती उगीचच आठवण झाली.

यातील कथा वाचल्यावर शाब्दिक विनोदावरचा भर जाणवतो धोतरे सदरे विजारे असली आडनाव आणि अक्कलपूर बेअक्कलपूर असली गावाची नाव ठायी ठायी आहेत. त्याचप्रमाणे तपकीर नाकात घालून फवारे उडवणे ते दुसऱ्याने चुकवणे सौ. ने हात ओवाळणे, पिना पोटात गेल्याची शका येणे. बेळगावी मासिकं वाचणारे म्हातारे. मध्येच खेडेगावी सरपच, पैलवान त्याचे बकरावधबदी उपोषण. कॅबेरेची मिटक्या मारत केलेली वर्णन. रिटायरमेंट नतरची समाजसेवा,बसची राग, ट्रॅफिक कंट्रोल करण वगैरे आणि त्यात खाल्लेली आपटी. मालकिणीचा सप. ऑफिसमधील प्रमिलेला प्रियकरानी स्वत चा धदा बरहुकूम शब्द वापरून लिहिलेली प्रेमपत्र कालेलकराच्या पोस्टमनटाईप ओव्हरसियर बारनिशा कारकून वगैरे...नतर तिन या सर्वांना लग्नपत्रिका देण हा अनादिकाळापासून चालत आलेला विनोद इथेही हजर आहेच. भाऊसाहेब नामक मवाली माणसाच देवमाणसात रूपातर करून चरित्र लिहिण हा सर्व मसाला खच्चून भरलेला आहे

'पालट' या कथेत पत्नीच्या मुठीतल्या रामभाऊच झोपडपट्टीत काम केल्यामुळे 'इचीभन', 'कारभारनी' तवाखूवाल्या बलदड नवऱ्यात झालेल्या रूपातरात कुठल्या विसगतीतून आलेला विनोद साधलाय ते कळत नाही

विशिष्ट वर्गाच मनोरजन हे साध्य या कथासग्रहानं साधेल यात शका नाही.

'जप्ती', 'आश्रमातला एक दिवस' 'स्कायलॅबचा योग' या सारख्या काही वाचनीय कथाही यात आहेत, विश्वमोहिनीने शभर वेळा खोल खोल आशयघन जलात आकठ बुडवल्यावर एकशे एकावा फवारा काही वाईट नाही.

—शकुतला जोग

'युगयात्रा'
वसंत लुले, रमेश गुप्ता
प्रकाशक वसत लुले
वसुधा प्रकाशन, नागपूर ४४० ०१२
पृष्ठे : १०८, मूल्य . २४ रुपये
¤
मी डॉक्टर कसा झालो ?
लेखक . डॉ डी. जी. पटवर्धन
प्रकाशक : माधव रा कानिटकर
प्रपच प्रकाशन, ३८९ शनिवार, पुणे ३०
पृष्ठे : १३२, मूल्य . ३५ रुपये
¤
'हास्यागना'
लेखक : पडित क्षीरसागर
प्रकाशक : आनद अनत अतरकर
विश्वमोहिनी ६२/१२ कर्वे रोड, पुणे ४
पृष्ठे · १४५, मूल्य : ३० रुपये

## फिनिक्स लायब्ररी

### The Change Masters

Corporate Entrepreneurs at Work
By Rosabeth Moss Kanter
Unwin Paperbacks,
Pages 432, £ 4–95
(approx Rs 90/–)

सध्या 'मॅनेजमेंट' वरील पुस्तकाचे पेव फुटले आहे आमच्या ग्रथालयात या विषयावरील जे पहिलं पुस्तक गाजल ते शरु रागणेकर याचे 'In the Wonderland of Indian Managers' त्यावतर आमच्या ग्रथालयात मी पीटर ड्रकर, सी. नॉर्थकॉट पार्किनसन, रुस्तुमजी वगैरे अनेक लेखकाची पुस्तके घेतली.

या विषयावरील इतर पुस्तकाचा मागोवा

घेताना मला असे आढळून आले की 'याकोका', (आयकॉका, इयाकोका वगैरे). 'इन सर्च ऑफ एक्सलन्स' व 'ऑन अ क्लीअर डे यू कॅन सी जनरल मोटर्स' ही तीन पुस्तके गेल्या कित्येक महिन्यापासून गाजत आहेत. वरील क्रमाने.

स्टेट्सच एक बर आहे. वैयक्तिक उत्कृष्ट' प्रयत्नाला ( Individual Excellence ) तिथे किंमत आहे. आपल्याकडे एखादाच लखीनाचा 'पॅटर्न' होतो. Individual Excellence ला 'टाइम'सारखे मासिकसुद्धा अनेक वेळा प्रोत्साहन देते.


**New Titles:**

1) **Roses:**
   ( Colour Illustrations and Text ) By Jacqueline Seymour
2) **Designo International:**
   ( Furniture Designs )
3) **Strange History of Bonnie and Clyde:**
   (True Crime ) By Treherne.
4) **Under Cover:**
   35 years of CIA Deception By Darrell Garwood
5) **KGB Today:**
   The Hidden Hand By John Barron
6) **The Law is an Ass:**
   ( Legel anecdotes ) By Brandreth
7) **Heaven's Breath:**
   ( Natural History of the wind ) Lyall watson
8) **What They Do Not Teach You at:**
   Harvard Business School (Self-Improvemt )
   Phoenix has the right stuff !

**THE PHOENIX LIBRARY**
727 SADASHIV PETH
POONA-411030.


'स्लॉन मॅनेजमेंट रिव्ह्यू'ने 'चेंज मास्टर्स' हे पुस्तक 'In Search of Excellence' पेक्षाही श्रेष्ठ ठरवले आहे. तसे ते आहेही. परंतु या पुस्तकाच्या प्रकाशकाला (Unwin Paperbacks) मार्केटिंग बरोबर जमल नाही असे दिसते. मॅनेजमेंटच्या बहुतेक सर्व पुस्तकांचे उद्दिष्ट म्हणजे घवघवीत यश. ग्रोथ. expansion एक्सपान्शन. फास्ट टर्नओव्हर. अॅग्रेसिव्ह सेल्स टेक्निक वगैरे. त्यात improvement आणि self-improvement साठी बराच वाव असतो. म्हणून या पुस्तकाच्या प्रकाशकाला 'Physician heal thyself' सारखा चिमटा काढावासा वाटतो !

Old order changeth, yeilding place to the new अशी काही तरी एक म्हण आहे. त्यानुसार हे पुस्तक लिहिले आहे.' फास्ट- एक्सपांडिंग कंपनी, ग्रोथ ओरिएन्टेड कंपनी यानी अनेक लोक भारावले जातात. परंतु यापुढे ज्या कंपन्या client-oriented आहेत व ज्या कर्मचाऱ्यांच्या नवीन-नवीन कल्पनांची कदर करणाऱ्या आहेत, त्याच कंपन्या भरभराटीस येतील किंवा आदर्श म्हणून गणल्या जातील.

प्रत्येक देशाचा असा एक 'इथोस' (ethos) असतो. दृष्टिकोन, सवय, मान्यता व इतर distinguishing attitudes या जशा व्यक्ती-व्यक्तीमध्ये आढळतात तशा जमाती-जमातीत व देशातही विविध असतात. मग आपण असं म्हणतो, 'Indian ethos is not conducive to innovation.' 'The Japanese shop- floor ethos is highly team-work-and-client-oriented.'

जपानची होंडा मोटार कंपनी customer-satisfaction ला किती महत्त्व देते ते सर्वश्रुत आहेच. आणखी काही दिवसात ग्राहकांना काय काय जरूर लागेल त्याचा सतत मागोवा चांगल्या कंपन्यांना घ्यावा लागतो. ग्राहकाचे महत्त्व महात्मा गांधींनी केव्हाच ओळखले होते.

'A Customer is the most important person ever on our premises He is not dependant on us. We are dependant on him. He is not an interruption in our work, he is the purpose of it. He is not an outsider to our business- he is a part of it. We are not doing him a favour by serving him, he is doing us a fovrour by giving us an apportunity to do so.'

(- Courtesy Gogate Opticians)

या किंवा अशा शब्दात ते बोलले होते, पण गमत अशी की गांधीजींच्याच देशात काही धंदेवाल्यांना ग्राहकाला शेंडी लावण्यात हुशारपण वाटते. अमक्या अमक्या ग्राहकाला आपण कसं गंडवल हे ते फार चविष्टरीतीने सांगतात. ग्राहकाचा आपण अपमान कसा केला, 'हॅट, आपण तशी पैशाची परवा करत नाही,' हा एक फार मारक 'Indian ethos' आहे खर म्हणजे. मी 'Bharatiya ethos' म्हणायला पाहिजे. India-vs-Bharat हे स्पेक्ट्रमच्या दोन टोकावरच कायमसाठी राहणार की काय असे वाटते. खरी ट्रॅजेडी ही आहे की भारताची वस्ती जास्त आहे व इंडियाची कमी. इथे परत इब्सेन खरा ठरला. 'Minority is always right !' इंडियाच्या मनाची कवाड खुली आहे, तो बदल स्वीकारायला तयार आहे. टॅलेंटेड आहे. कष्ट करणारे आहेत या इंडियन्सनी टेक्नॉलॉजीची चाक भराभर फिरवून, मिडियाचा योग्य उपयोग करून भारतीयाचा ethos बदलला तरच आदर्श कंपन्या व आत्रप्रनर्स निर्माण होतील.

नोकरीच्या ठिकाणी बदल हाच सर्वांत ग्रास-रूट बदल ठरेल. आमच्या ग्रंथालयात एक श्री. आर. एस विवलकर म्हणून सभासद आहेत. त्याच वाचन पुष्कळच बऱ्यापैकी आहे. ते बहुश्रुत आहेत त्यांनी काही मोठमोठ्या खाजगी कंपन्यातही काम केले आहे. त्यांच्या समवेत मी 'माणूस'मध्ये एक लेखही लिहिलेला आहे मी सहज त्यांना विचारले की त्यांना या मोठमोठ्या कंपन्यात कसे काय वाटले ? ते म्हणाले 'You are reduced to a non-entity. Your success in the company is in direct proportion to the extent that you can please your higher ups'

मी त्यांना पुढे विचारले की कर्मचाऱ्यांनी जर नवे विचार सुचवले तर त्याची दखल

घेतली जाते का? ते म्हणाले, 'If the boss gets at least partial credit'

आमचा टर्न–ओव्हर इतक्या कोटीमध्ये आहे असं अनेक कपन्या मिरवतात; परतु आम्ही इतक्या लोकाना आत्माभिव्यक्तीची creative thinking ची innovation करण्याची सधी दिली अस ज्या कपन्या किंवा आंत्रप्रनर्स म्हणू शकतात तेच खरे चेंज–मास्टर्स! फॅमिली लाइफचा इम्प्रिट जसा माणसावर पडतो तसाच करीयरचाही कारण कर्मचारी आपल्या जीवनाचा नबर दोनचा हिस्सा कारखान्यात किंवा ऑफिसमध्ये घालवित असतो. कारखान्यातील किंवा ऑफिसमधील वातावरण banal, vulgar, mechanical, flippant आणि frivolous असेल तितक्याच प्रमाणात ते नतर सोसायटीमध्ये प्रतिबिंबित केल जातं.

प्रत्येक कपन्यानी, आंत्रप्रनर्, वर्कशॉप किंवा गॅरेजवाल्यानी, एजन्सी किंवा दुकानदारानी आपला व्यवसाय म्हणजे सेवा देण्याचं एक केंद्र आहे असे मानणे जरूर आहे. हाच ethos आपल्याला पूरक ठरेल.

या पुस्तकासाठी सशोधन करायला लेखिका ५ वर्षं खपली. काही कपन्या चेंज रेझिस्टट असतात तर काही innovation-conducive. काही कंपन्यामध्ये बदल व नवनव्या कल्पनाना मुद्दामहून उत्तेजन दिले जाते.

या पुस्तकातील जनरल मोटर्सवरील प्रकरण अत्यंत वाचनीय आहे. जनरल मोटर्सवर अनेक पुस्तके लिहिली गेली आहे. अल्फ्रेड स्लॉन हा G. M या १९३० सुमाराला प्रेसिडेंट होता. My years with General Motors हे त्याचे प्रख्यात पुस्तक अजूनही वाचले जाते.

—जे. एन. पोंडा

क्रिकेट । शारजा

# भारताच्या जागतिक वर्चस्वाला शह

ऑस्ट्रेलियातल्या ऑस्ट्रेलिया – भारत – न्यूझीलड या तीन देशातल्या मर्यादित षटकाच्या स्पर्धेत भारताला अतिम फेरीत जाऊनही पराभव पत्करावा लागला होता. यदा शारजाला झालेल्या ऑस्ट्रेलेशिया स्पर्धेतही याचीच पुनरावृत्ती झाली आहे. शारजाचा पराभव तिरगी स्पर्धेसारखा निर्णायक नसला तरी जागतिक अजिक्यवीर म्हणून मिरवणाऱ्या भारताच्या वर्चस्वाला चागलाच शह बसत असल्याची ही स्पष्ट लक्षण आहेत.

क्रिकेट खेळणाऱ्या, हाताच्या बोटावर मोजता येणाऱ्या मोजक्या देशात तसा दर्जाचा फारसा फरक नाही. अपवाद फक्त वेस्ट-इडिजचा. पण ते सोडून इतर सारे देश साधारण एकाच पंक्तीत बसवता येतात. भारतीय खेळाडूची गुणवत्ता वादातीत आहे. पण त्याचा एकत्रितरीत्या परिणाम कधी त्याना साधता आलेला नाही कसोटीत हे पुरेस सिद्ध झालच आहे. मर्यादित षटकांच्या स्पर्धेत मात्र जिद्द, कौशल्य आणि योजना याचा पुरेसा मिलाफ साधत भारतीयानी ८३ ते ८५ या दोन अडीच वर्षातल्या सगळ्या मर्यादित षटकाच्या स्पर्धा खिशात घातल्या विजयाची सवय आणि चटक लागलेल्या भारतीय खेळाडूना आणि प्रेक्षकांनाही या वर्षातले हे दोन मोठे पराभव पचवणं फार जड जाणार आहे

वास्तविक या क्रिकेट मोसमाची सुरुवात निवडसमितीनेच चागली केली होती सदानंद विश्वनाथ, मिलिंद गुजाळ ह्या दोघाचा समावेश सघात नसला तरी इतर सघ चागलाच समतोल होता. मर्यादित षटकांच्या सामन्यासाठी वेगळा आणि इंग्लड दौऱ्यासाठी वेगळा असे दोन सघ निवडण्याचं भानही निवडसमितीनं दाखवल होत मदनलाल, संदीप पाटीलच्या समावेशान भारतीय सघाला अधिक मजबुती आली होती; पण शेवटी पाकबरोबर रगतदार खेळ करूनही भारताच्या पदरी पडले ते उपविजेतेपदच.

ऑस्ट्रेलेशिया स्पर्धेत भारताला ड्रॉही अनुकूल असाच पडला होता. स्पर्धेतला पहिला सामना खेळायचा असला तरी भारताची गाठ न्यूझीलडबरोबर होती. न्यूझीलडच्या सघात रिचर्ड हॅडली, जेरेमी कोनी नव्हते. शिवाय त्याचा कप्तान जॉन राईटही दुखापतीमुळं खेळला नाही. पण तरीही न्यूझीलडन भारताच्या तोंडाला अक्षरशः फेस आणला.

हा पहिला सामना ज्या खेळपट्टीवर झाला तिच्यावर टिकून रहाण्यासाठी फलंदाजानी देवाचा धावा करावा अशीच तिची स्थिती होती. मर्यादित षटकाच्या सामन्यात प्रेक्षक सामान्यत. येतात ते फटक्याची आतषबाजी पहायला. पण ती अपेक्षा या खेळपट्टीन पूर्ण केली नाही भारतीय गोलदाजानी आणि क्षेत्ररक्षकानी आपली कामगिरी चोख बजावली. शास्त्री, आझाद आणि विशेषत: मनिंदर या तिघाही फिरकी गोलदाजानी चागली गोलदाजी केली. कपिलची क्षेत्ररचनाही योग्य होती; पण स्वतःची षटकं बाकी असताही शेवटच्या ३ पैकी २ षटक कीर्ती आझादला देण्याची त्याची चाल समजणं कठीण होत. कीर्तीनं पहिली ५–६ षटकं चांगली गोलदाजी टाकली होती हे खर, पण त्याचं कपिलइतकं शेवटच्या गोलदाजीवर नियत्रण आहे असं तो स्वतःसुद्धा म्हणणार नाही. शिवाय स्वत च्या षटकात फलदाज 'मारा किंवा मरा' या भावनेने खेळतात. त्याना कीर्ती आयताच तावडीत सापडला त्याच्या शेवटच्या दोन षटकात गेलेल्या २६ धावा आपल्याला महागात पडल्या नाहीत हे भारताचं सुदैवच

जिंकायला फक्त १३२ धावा हव्या असताना भारताची सुरुवात खराबच झाली. गावस्कर, अझर आणि श्रीकात चॅटफिल्डच्या गोलदाजीवर लगेचच बाद झाले तिकडे टेलिव्हिजनवर समीक्षक भारतीय सघाच्या फलदाजीच्या सखोलतेबद्दल गौरवोद्गार काढत होते आणि इकडे भारतीय फलदाज मात्र ती सखोलता दाखवण्याचे काहीही कष्ट न घेता दुसऱ्यावर त्याची जबाबदारी ढकलून तबूत परतत होते. या रांगेतला चौथा क्रमाक सदीप पाटीलचा होता. त्याआधी त्यान खास स्टाईलमध्ये गुडघ्यावर बसून अप्रतिम कव्हर ड्राईव्ह मारला होता. पण तो बिलकुल आत्मविश्वासानं खेळत नव्हता. त्यातच त्यान वेड्यासारखा चेंडू चॉप करा-

यचा प्रयत्न केला आणि तो स्वत:च्याच यष्टीवर ओढून घेतला. त्याबद्दल एका इंग्रजी नियतकालिकातली प्रतिक्रिया फार छान होती. त्या समीक्षकान लिहिल होतं, 'संदीप पाटील मैदानात कुठही चेंडू मारू शकतो ही त्याची ख्याती आम्हाला माहीत होती; पण सगळं मैदान सोडून तो स्वत:च्या यष्टधावरच चेंडू मारेल याची मात्र आम्हाला कल्पना नव्हती. !'

भारताचं दडपण आझाद आणि शास्त्रीनं काहीसं दूर केल. शास्त्री नेहमीसारखा जबाबदारीनं खेळला पण भारताला खरं जिंकून दिल ते चंद्रू पंडितच्या आक्रमक खेळीन. पहिलाच आतरराष्ट्रीय सामना खेळणारा पंडित आत्मविश्वासानं खेळला. केवळ त्याच्याचमुळ आपण त्या दिवशी जिंकू शकलो. मुळात असल्या खराब खेळपट्टीवर, जिथ फटके मारण अवघड होत, तिथं दिलीप वेंगसरकरला बाहेर ठेऊन सदीप पाटीलला पसत करणं हे डावपेच अनाकलनीयच होते. मर्यादित षटकांच्या सामन्यात दिलीपन भारताकडून सगळयात जास्त धावा केल्या आहेत. अनेक सामने आपल्या कौशल्याच्या जोरावर एकहाती जिंकून आणले आहेत. बचाव आणि आक्रमण याचा सुरेख मिलाफ असलेला आणि वेगवान व फिरकी गोलदाजी चागली खेळणारा तो सघातला एकमेव फलदाज. तरी त्याला राजसिंग, कपिल, शास्त्रीनं बाहेर ठेवलं आणि त्याबद्दल बोलताना 'तो आमच्या व्यूहरचनेत बसत नाही' अस उत्तर राजसिंगनी दिलं. इतका परफेक्ट खेळाडूही बसू न शकणारी अशी कोणती व्यूहरचना यांनी तयार केली होती त्याचे तेच जाणे. कारण भारतीयांची एकूण फलदाजी बघून त्यानी 'व्यूहरचना' या शब्दाचा विचारसुद्धा केला असेल अस वाटत नव्हतं.

दिलीपची वारवार आठवण श्रीलकेबरोबरच्या सामन्यातही आली. या सामन्यातही सदीपच खेळला आणि पुन्हा अयशस्वी ठरला. मुळात श्रीकात–गावस्करच्या सुदर सलामीनंतर आणि अझर–गावस्करच्या जबाबदार भागीदारीनतर इतरावर काहीही दडपण असण्याची आवश्यकता नव्हती. पण षटकामागं फक्त पावणेचार–चारची सरासरी हवी असताना भारताची जी घसरगुंडी उडाली ती सनसनाटीच होती. गावस्कर–अझर–संदीपनतर आझाद आणि कपिल उगीचच फटकेबाजी करण्याच्या नादात बाद झाले. तरीही भारत हा धक्का सहज पचवू शकेल असं समीक्षक म्हणत होते. नतर चद्रू पंडीतही परतला आणि इतका वेळ भारतीय फलदाजीचं कौतुक करणाऱ्या समीक्षकांची तोड बंद झाली. भारताची नाव पैलतीराला लागली ती केवळ शास्त्री–मदनन थड डोक ठेवल म्हणूनच.

### अविस्मरणीय

भारताचे दोन्ही विजय निसटते होते तर पाकचे दोन्ही विजय सफाईदार. एक ८ गडी राखून तर दुसरा १० गडी राखून. तरीही अंतिम फेरीत भारताचं पारडं जड वाटत होतं. एक म्हणजे भारताची अडचणी पार करण्याची शक्ती, वेंगसरकरच्या समावेशामुळे भारतीय फलदाजीला आलेली मजबुती. आणि दुसरं म्हणजे पाककडे चागले खेळाडू असले तरी दडपणाखाली खचून जाण्याची त्याची प्रवृत्ती आणि अनेक आतरराष्ट्रीय स्पर्धात उपात्य–अतिम फेरीत पोचूनही अंतिम यश मिळवण्यात त्याना आलेल अपयश.

पण या सामन्यात आपल्या लौकिकाला जागून भारतान केलेला खेळ आणि पूर्वीच्या चुका सुधारून विजय मिळवण्याची पाकन दाखवलेली जिद्द याची झुज इतकी बहारदार होती की भारत या सामन्यात हरला असला तरी प्रत्येक हरलेल्या सामन्याप्रमाणं हा सामना विसरावा अस मात्र कुणालाही वाटणार नाही

या सामन्यासाठीची खेळपट्टी चांगली होती आणि भारतानं सुरुवात ज्या दिमाखात केली तो दिमाख बघत रहाण्यासारखा होता. श्रीकात–सुनिलन १९१ षटकात ११७ धावाची झंझावाती सलामी दिली आणि सगळयाना खुश करून सोडल. त्यात भर पडली ती पाकच्या स्वैर गोलदाजीची विशेषत: श्रीकातला फटकेबाजीच्या मोहात पकडायचा त्याचा प्रयत्न चागलाच फसला. श्रीकातन तर कट, पूलचा सढळ वापर केलाच पण सुनीललाही मोकळेपणानं हूक मारताना बघून छान वाटत होत. नतर सुनील–दिलीपन परत ९९ धावाची फटकेबाज भागी केली. फॉर्मात नसलेल्या अझरऐवजी दिलीपला तिसऱ्या क्रमाकावर पाठवण्यात कपिलन नक्कीच शहाणपणा दाखवला आणि दिलीपनही त्याचा विश्वास सार्थ ठरवला. पहिल्या दोन सामन्यात आपल्याला वगळण किती मूर्खपणाच होतं हेच त्यान दाखवून दिलं. त्याच्यासारख्या फलदाजाला हे वारंवार सिद्ध कराव लागत हीच मोठी खेदाची गोष्ट आहे.

सगळ व्यवस्थित चालल असताना भारताची गाडी अडली ती शेवटच्या १० षटकात. एरवी ५ धावाचा वेग व्यवस्थित राखणाऱ्या भारताचा वेग ज्या षटकात धावा काढायच्या तिथच घसरला आणि पावणेतीनशेचा पल्ला गाठू पहाणाऱ्या भारताला अडीचशेचाही टप्पा ओलाडता आला नाही.

भारताच्या डावातली शेवटची १० षटक जशी महत्त्वाची ठरली तशीच पाकच्या डावातली शेवटची १० षटकही. या शेवटच्या १०–१० षटकानीच सामन्याच भवितव्य बदलल. पाकची गोलदाजी शेवटी चागली झाली. उलट भारताची गोलदाजी शेवटच्या षटकात आपला दर्जा विसरली. मदनलाल, चेतन शर्माला फोडून काढणाऱ्या जावेदसाठी एक प्रयोग म्हणून कपिलनं आझादला वापरल नाही हे खटकल.

भारताची गोलदाजी ४० व्या षटकापर्यंत चांगली होती आणि क्षेत्ररक्षण शेवटपर्यंत प्रचड दडपण असतानाही व्यवस्थित होत. सामन्यातल्या शेवटून दुसऱ्या चेंडूवर मात्र अझरसारख्या क्षेत्ररक्षकालाही तौसिफ अहमदला धावचीत करता आल नाही. हा एकमेव अपवाद. तो बराच महागात पडला हे मात्र तितकच खरं.

पाकच्या विजयाच सगळ श्रेय एकट्या जावेद मियादादकड जात. एकहाती विजय खेचून आणण्याची अशी रोमहर्षक कामगिरी गेल्या कित्येक दिवसात पहायला मिळाली नव्हती. जावेदला तशी साथ कुणाचीच मिळाली नाही; पण त्यान जो जिद्दीनं, त्वेषानं खेळ केला त्याला तोडच नव्हती. कपिलन त्याला बाद करण्यासाठी आक्रमक डावपेच वापरले नाहीत ही चूक जमेस धरली तरी त्यामुळं जावेदच्या खेळीचं श्रेय कमी होत नाहीच. श्रीकांत, गावस्कर आणि वेंगसरकर या तिघाच्या खेळाची एकत्रित छाप पुसुन टाकायच सामर्थ्य जावेदच्या या डावात होते.

जावेदच्या या खेळानं ऑस्ट्रेलेशिया करंडक पाकमध्ये नेला. पाकच आंतरराष्ट्रीय क्रिकेटमधलं हे पहिलंच जेतेपद. भारताचा खेळ ऑस्ट्रेलियापेक्षा इथं खूपच चांगला झाला. तरीही आपण जिंकू शकलो नाही. वेस्टइंडिजबरोबरच ऑस्ट्रेलिया, पाकसारखे तगडे प्रतिस्पर्धी निर्माण होताहेत आणि जागतिक अजिंक्यपद राखणं भारताला अवघड जाणार आहे याची ही पहिली झलक. ऑस्ट्रेलियात हरल्यावर टोनी ग्रेग कपिलला म्हणाला होता, ' जाऊ दे, शेवटी तुम्ही प्रत्येक अजिंक्यपद तर मिळवू शकणार नाही. ' हे खरं असलं तरी शेवटी विजय हा विजयच असतो आणि त्यामुळं या पराभवाची विशेषत: इतक्या निसटत्या पराभवाची रूखरूख सगळ्यांनाच लागून रहाणार आहे. या पराभवातूनच काही तरी चांगलं निघेल अशी आशा करूया. कारण विश्वचषक स्पर्धा आता फारशी दूर नाही.

—सीमा कुलकर्णी

---

# रंगभूमी

## ' सारं कसं शांत शांत ! '

### नव्या दमाची नाटकं का येत नाहीत ?

वि. भा. देशपांडे

---

एप्रिल महिना आरंभित झाला की, अनेक प्रकारच्या सांस्कृतिक कार्यक्रमांची गर्दी होत असते. तशी ती काही प्रमाणात सुरू झालेली आहे. पण यामध्ये नव्या नाटकांच्या प्रयोगाचे प्रमाण मात्र नगण्य अवस्थेत आहे. ज्या प्रमाणात नवी नाटके गेल्या काही महिन्यात पुण्यामध्ये यायला हवी होती तशा प्रमाणात आलेली दिसत नाहीत. त्यातल्या त्यात अलिकडे नवीन नाटक आले ते म्हणजे ' अग्निपंख '. (ते अद्याप पहायचे असल्याने तूर्त त्याबद्दल लिहिणे नाही.) पण एक–दोन नवीन नाटकांचा अपवाद वगळता आवश्यक गतीने ती येत नाहीत ही वस्तुस्थिती आहे.

पूर्वीच्या नाटकांचे पुनरागमन ही वाट चोखाळण्याचा काही मंडळी प्रयत्न करीत आहेत. उदाहरणार्थ ' मोरूची मावशी ', ' ब्रह्मचारी ', ' अपराध मीच केला ', ' मला उत्तर हवय ' इत्यादी. त्या आधी ' शांतेचं कार्टं ' या नाटकाच्या पुनरागमनामुळे आणि मिळालेल्या यशामुळे अनेकांनी तसा प्रयत्न करून पाहिला. 'मोरूची मावशी' अनेकांच्या पसंतीस उतरली, त्यामुळे पुन्हा उत्साह वाढला. आता ' लेकुरे उदंड झाली ' या नाटकाचे पुन्हा त्याच कलासंचात प्रयोग सुरू होत आहेत. त्याचे स्वागत कसे काय होते ते पाहायचे. पूर्वी झालेल्या नाटकांच्या प्रयोगांना सर्वांनाच उत्तम प्रतिसाद मिळतो आहे असे नव्हे. एकुणातच चालणारी–पैसा मिळवणारी अशा नाटकांची संख्या कमी झालेली दिसते. नव्या आणि जुन्या नाटकांच्या प्रयोगांचे प्रमाणही गेल्या महिनाभरात निदान पुण्यात तरी कमी आहे. ' हाऊसफुल्ल ' होण्याचे भाग्य तर फारच थोड्यांच्या ठिकाणी आहे. त्यामुळे सारीकडे कसे शांत शांत आहे. आवर्जून पहावे असे (एखादा अपवाद वगळता) चांगले नाटक नाही. येण्याची चिन्हेही दिसत नाहीत. असे का घडते आहे याचा प्रत्येकजण आपापल्या परीने अर्थ लावतो आहे, शोध घेतो आहे. पण नेमके कारण कोणालाही सांगता येत नाही. परीक्षा, महागाई, अति उष्मा अशी ढोबळ कारणे काही लोक सांगतात. पण ती कारणे नेहमीचीच आहेत. त्यात नाविन्य नाही हीच कारणे गृहीत धरून बोलायचे तर चित्रपट, संगीताचे कार्यक्रम इत्यादींना अमाप गर्दी आहे. चित्रपटाचे तिकीटदर वाढलेले असूनही चित्रपटगृहाबाहेरच्या रांगा बोलक्या आहेत. जसजशा परीक्षा संपतील तसतशा ह्या रांगा कितीतरी पटीने वाढत जातील.

आणखी एक नेहमीचे कारण सांगितले जाते ते म्हणजे दूरदर्शनवरील कार्यक्रमांचे. शनिवार–रविवार दूरदर्शनवर असणाऱ्या कार्यक्रमांची गर्दी पहाता बहुसंख्य प्रेक्षक त्यात इच्छेने किंवा अनिच्छेने गुंतून पडतो, हे जरी गृहीत धरले तरी उरलेल्या पाच दिवसांचे काय, असा प्रश्न शिल्लक रहातोच. त्यातही अनेक प्रायोजित कार्यक्रमांचे सत्त्वच निघून गेल्याने त्यात गुंतून पडायचेही कारण दिसत नाही. सहा एप्रिलच्या रविवारी दिवसा ' अग्निपंख ' चे दोन प्रयोग पुण्यात होते, ते दोन्हीही ' हाऊसफुल्ल ' गेले. याचा एक अर्थ असाही होतो की, जर चांगले नाटक, चांगले नट इत्यादी गोष्टी असल्या तर लोक मोठ्या प्रमाणात यायला तयार आहेत.

बाकीच्या कारणांच्या आड लपण्यात मतलब नाही. खरी गोष्ट अशी आहे की, मराठी माणसाला आकर्षित करील, चित्रपट दूरदर्शन या माध्यमांपासून खेचून आणेल असे जबरदस्त ताकदीचे नाटक नव्याने येत नाही. एखादे येऊन चालणारे नाही. अधिक संख्येने तशी नाटके यायला हवीत.

आजच्या रंगभूमीच्या संदर्भात डॉ. श्रीराम लागूंनी नागपूरच्या एका व्याख्यानमालेत जी खंत व्यक्त केली ती विचारात घेण्यासारखी आहे. त्यांनी असे म्हटले ' आज व्यावसायिक नाटकांकडे निर्माते केवळ ' खपाची वस्तू ' म्हणून पहातात आणि दुर्दैवाची बाब म्हणजे दिग्दर्शकापासून सारेच त्याला साथ देतात. व्यावसायिक रंगभूमीवर आज कोणतीही प्रतिष्ठा, नीतीमूल्ये पाळली जात नाहीत...साबण, टूथपेस्ट विकून जास्त पैसा मिळतो असे लक्षात आलं तर ही निर्माते मंडळी नाटके बंद करतील आणि साबण,

टूथपेस्ट विकायला लागतील.' नाटक व्यवसायाशी किंवा तिथल्या एकूण व्यवहाराशी ज्यांचा निकटचा संबंध आहे त्यांना डॉक्टर लागू काय बोलताहेत आणि कोणाविषयी बोलताहेत याचा अंदाज निश्चितच येऊ शकेल.


### उदासीन प्रेक्षक

कोणत्याही व्यवसायाच्या संदर्भात विस्तारानंतर जे घडते ते नाटकाच्या बाबतीत घडते आहे. आसपासचे तण वाढायला लागले की त्यातून अनेक अपप्रवृत्ती निर्माण होतात. व्यवसायाचा धंदा कधी होतो ते ध्यानातच येत नाही. मुळात या दोन शब्दांमागे काही वेगळ्या संकल्पना आहेत याचेच भान अनेकांना नसते. व्यवसाय हा नीतीमूल्यांवर आधारीत असतो. त्याला जी मूल्य बैठक असते ती त्याची प्रतिष्ठा वाढवीत असते. अगदी खोलवर, तपशिलात जाऊन मराठी व्यावसायिक नाटकांचा विचार केला तर असे ध्यानात येते की, मराठी नाटकाने व्यवसाय जाणतेपणाने कधीच केला नाही. रंगभूमीचे म्हणून काही एक अर्थशास्त्र असते, त्या अर्थशास्त्राचे तर्कशास्त्र असते हा विचार अपवादात्मक झाला. काही सन्मान्य निर्माते (तेही हाताच्या बोटावर मोजण्या इतपतच आहेत) सोडले तर बाकीची अनेक मंडळी नाटकाचा धंदाच करीत आलेली आहेत. काहींना वेगळ्या क्षेत्रात सरळ अगर चुकीच्या मार्गाने मिळणारा पैसा ते नाटकाच्या क्षेत्रात एखाद्या घोड्यांच्या शर्यतीसाठी लावावा तसा लावतात. पैशाच्या बळावर ते एखाद्या नाटककाराकडून नाटक मिळवतात, पैशाच्या लोभाने नट–दिग्दर्शक मिळणे काहीच अवघड नसते. नाटक चालले उत्तम, न चालले तरी उत्तम. अशा निर्मात्याला दोन्ही सारखेच असते. त्याला किमान पैसा घालवायचा असतो, कधी मिळवायचा असतो, अनुषंगिक गोष्टींची लज्जत चाखायची असते. सारेच वरवरचे, उपरे असते. अशा उपऱ्या निर्मात्याला नाटक–रंगभूमीचा पूर्वसंदर्भही नसतो आणि नाटकोत्तर होणाऱ्या परिणामाची चिंताही नसते. त्याचे सारे मोजमाप पैशावर अवलंबून असते. त्याला व्यवसायातल्या कलात्मकतेशी काहीच देणे घेणे नसते.

केवळ निर्माता असा आहे असे म्हणून साऱ्याच प्रश्नांची जबाबदारी संपत नाही. त्यात नट–दिग्दर्शक–तंत्रज्ञ आणि प्रेक्षक यांचाही वाटा तितकाच असतो, असावा लागतो. कलाकारांबाबतची परिस्थिती अशी आहे की, जे या कलेच्या संदर्भात पोटार्थी आहेत ते मिळेल तेवढा झाडाचा पाला ओरबाडत असतात, कशाचेच सोयरसुतक राखीत नाहीत. जे निमव्यावसायिक आहेत त्यांना अर्थप्राप्तीचा एक कणा भक्कम असल्याने फार गांभीर्याने विचार करण्याचे कारण पडत नाही. जे मूठभर लोक रंगभूमीच्या क्षेत्रातील मूल्यभावाची किंवा कलात्मकतेची चिंता वाहतात ते अल्पसंख्याक असल्याने आणि त्यांनी काही चांगली नाटके आणण्याचा प्रयत्न करूनही प्रेक्षकांनी योग्य तो प्रतिसाद न दिल्याने त्यांच्या करण्याचा–बोलण्याचा अर्थ मर्यादित राहतो.

रंगभूमीच्या क्षेत्रात प्रेक्षकाचे स्थान किती मोलाचे आहे ते नव्याने सांगण्याचे कारण नाही. पण अद्यापही आपल्याकडे चित्र असे आहे की, प्रेक्षक उदासीन आहे. तो चांगल्या नाटकांची मागणी उंच आवाजात करीत नाही. धंदा करणाऱ्या–गल्लाभरू नाटकांचा धिक्कारही तीव्रतेने करीत नाही.

एका बाजूने व्यावसायिक रंगभूमीवरचे जाणवणारे थंडपण, प्रायोगिक रंगभूमीवरचे साचलेपण, दलित, बाल किंवा अशा रंगभूमीशाखांमध्ये असलेली तशीच परिस्थिती मन उद्विग्न करणारी, निरुत्साही करणारी आहे अशा पार्श्वभूमीवर डॉ. लागूंसारख्या विचारवंत नटाने व्यक्त केलेली खंत (नवी नसली तरी) अंतर्मुख करायला लावणारी आहे. रंगभूमीवरची शांतता, थंडपण असह्य होणारे असते. का नवे काही घडणार आहे म्हणून त्याआधी येणारी मरगळ आहे? काळच याचे उत्तर देईल. तोवर वाट पाहायला हवी.



चित्रपट

# ' सवेरेवाली गाडी '

## संगीत आणि छायाचित्रण हेच खरं आकर्षण

आजच्या ॲक्शन चित्रपटांच्या किंवा कौटुंबिक चित्रपट असं लेबल लावून त्या खाली हवा तो गोंधळ दाखवणाऱ्या दक्षिणी चित्रपटांच्या जमान्यात प्रेमकथा दिसणं विरळाच. दिसली तर ती नवीन चेहऱ्यांना घेऊन काढलेली व त्याच ठराविक फॉर्म्युल्याची. पण जरा वेगळ्या धाटणीची प्रेमकथा पडद्यावर आणण्याचं धाडस दिग्दर्शक भारतीराजांनी केलं आहे. तोच ' सवेरेवाली गाडी ' हा चित्रपट.

' सवेरेवाली गाडी 'चं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे भावनाप्रधान भूमिकांसाठी फारसे प्रसिद्ध नसलेले सनी देवल आणि पूनम धिल्लाँ त्याचे नायकनायिका आहेत. हा चित्रपट 'बेताब 'नंतर लगेच सुरू झालेल्या सनीच्या काही चित्रपटांपैकी. पण तो बराच रखडला. सनीची ' ॲक्शन हिरो ' म्हणून जी प्रतिमा तयार होतीये त्याला अडचणीचं ठरेल म्हणूनच चित्रपटाचं प्रदर्शन लांबवलं गेलं असं म्हटलं जातं.

रामपूर या छोटयाशा गावात रवी (सनी देवल) रहात असतो. वडिल छेदीराम (डॉ. श्रीराम लागू) यांचा परंपरागत न्हावी व्यवसाय. तो करण्यात त्याचं मन रमत नसतं. ते रमत असतं कविता करण्यात. तासन्तास कविता करायच्या आणि त्या गात बसायच्या हा त्याचा छंद वडिलांना बिल्कुल पसंत नसतो. पण त्याची बहिण त्याला पाठीशी घालत असते.

अशा वेळेस गावात येते ज्योती. ( पूनम धिल्लाँ ) आपल्या बहिणीकडे ( बिंदू ) आणि मेहुण्याकडे ( प्रेम चोप्रा ) कायमची रहायला म्हणून ती आलेली असते. एक दिवस तिची रवीशी ओळख होते आणि त्याचे प्रेमात रूपांतर होते.

रवी आपला व्यवसाय सोडून दुसरं काही बनू पहातो आहे त्यामुळे गावातल्या बड्या घेंडाचा त्याच्यावर राग असतो. तशातच एकदा गावचा पंडित रवी आणि ज्योतीला एकत्र पहातो. त्या दोघाची चौकशी होते. रवीला दोषी ठरवण्यात येते. त्या गावच्या रिवाजाप्रमाणं त्याचे सगळे केस कापून त्याची धिंड काढली जाते. हे सहन न होऊन छेदीराम आत्महत्या करतो. या साऱ्या प्रकारान अपमानित झालेला रवी रातोरात गाव सोडतो.

रामपूरला भल्या पहाटे एक रेल्वे येत असते आणि तीच थोड्या वेळाने परत जात असते. या रेल्वेच्या मागच्या डब्याचा उपयोग करून रवी आणि ज्योती एकमेकाना निरोप पाठवू लागतात. रवी शहरात जातो आणि अतिशय फिल्मी पद्धतीन रमा ( नताशा सिन्हा ) या श्रीमत तरुणीचे गुडानी पळवलेले दागिने परत आणून देतो. परिणामी त्याला मिळते नोकरी आणि त्याच्या कवितांना प्रसिद्धी.

इकडे ज्योतीवर डोळा असणारा तिचा मेहुणा किशनलाल तिच्याशी दुसर लग्न करू पहातो. तेवढ्यात भयकर पाऊस पडून गावात महापूर येण्याची चिन्हं दिसू लागतात. यातून वाचण्यासाठी पडित एक जुनी प्रथा सांगतात, त्या प्रथेला ज्योतीला सामोर जाव लागतं. तिला घेऊन जाण्यासाठी नेमका त्या वेळेला आलेला रवी तिला वाचवतो आणि पूजा अर्धवट सोडल्याबद्दल गावकरी संतापून मागे लागलेले असतानाच ते दोघं शहराकडं जाणाऱ्या गाडीत चढण्यात यशस्वी होतात.

थोडी वेगळ्या धाटणीची ही कथा अधिक प्रभावी होऊ शकली असती ती तशी झालेली नाही याचं कारण तिला जोडलेले अनावश्यक पदर. मध्यंतरापर्यंत कथा साधारण या दोघांभोवतीच रेंगाळते. पण नंतर मात्र पचायत, गावचे प्रतिष्ठित लोक याना जरा जास्त महत्त्व येतं. रवी आणि ज्योतीवर सगळ्याचा राग का हेही नेमकेपणान स्पष्ट झालेलं नाही. रवीच शहरामधलं वास्तव्य हे तर एखाद्या ठिगळासारख वाटतं. रमाला रवीबद्दल वाटणारं आकर्षणही पुरेस स्पष्ट होत नाही. शेवटी एकदम ती त्याला विचारते आणि तो 'नाही' म्हणतो एवढाच भाग यतो.

दिग्दर्शक भारती राजाचं दिग्दर्शन पाहून थोडी जुन्या काळातल्या चित्रपटाची आठवण होते. विशेषत पूर्वार्ध तर तसाच सथ पद्धतीन घेतलेला. या भागात प्रेमकथा हळुवारपणे उलगडत जाते. त्या मानान नतरच्या भागात अधिक घटना घडतात.

दिग्दर्शकानं अशा कथासाठी फारसं नाव नसलेल्या सनी आणि पूनमला मुख्य भूमिकासाठी निवडल आहे. त्याच्या निरागस चेहऱ्यामुळे ते या भूमिकात छान शोभतात- 'अर्जुन' सारखीच थोडे 'शाय' स्वरूपाच पात्र इथं सनीन रगवलं आहे अर्थात परिस्थितीला तोड देण्याचा दोघाचा मार्ग वेगळा. या चित्रपटातही खालच्या आवाजात सवाद बोलायची पद्धत सनीनं कायम ठेवली आहे. पूनम साधी दिसते आणि म्हणूनच चागली वाटते इतर भूमिकात नताशा, बिंदू, प्रेम चोप्रा, ओम शिवपुरी वगैरे आहेत. रवी–ज्योतीला मदत करणारा जवान म्हणून धर्मेंद्रच खास दर्शन आहे.

'सवेरीवाली गाडी'चं खरं आकर्षण आहे त्याच छायाचित्रण आणि संगीत. रामपूर हे गाव, रवी कविता करतो ती उंच जागा, सकाळी जाणारी रेल्वे हे सगळ कॅमेऱ्यानं छान टिपल आहे, जिवत केल आहे. फक्त काही वेळा नको इतके क्लोजअप्स घेतलेले दिसतात.

छायाचित्रणामुळं प्रेक्षणीय बनवलेल्या चित्रपटाला आर. डी बर्मनन दिलेल सगीत खूपच श्रवणीय आणि मधुर आहे. अशा पद्धतीच्या कमी वाद्याचा गोंधळ असलेल्या गाण्यांना वाव देणारा चित्रपट बऱ्याच दिवसानी आलाय. आणि आरडीनं खरोखरच त्याच चीज केलय. किशोर, सुरेश वाडकर, लता आणि आशा यांनी गायलेली 'येजमी, आसमा थम जाते है', 'छम् छम्', 'देखो ये कौन आया', 'दिन प्यारके आयेंगे सजनीयाँ' ही सगळीच गाणी लक्षात रहाण्यासारखीच सुदर सगीत, सुदर छायाचित्रण आणि वेगळी कथा यामुळ 'सवेरेवाली गाडी' एकदा पहाण्यासारखा निश्चितच आहे.

— सीमा कुलकर्णी

विज्ञान

# पुन्हा एकदा बर्म्यूडा ट्रँगल

इलेक्ट्रॉनिक्सचे हारतुरे घेऊन आपण २१ व्या शतकाच्या स्वागतासाठी सज्ज होण्याची तयारी चालवली असली तरी देखील अखिल मानव जमातीचे स्वागत येऊ घातलेले शतक अनेक भयकर समस्यानीच करणार आहे यात शका नाही. त्यापैकी ऊर्जा समस्या ही तर एक महान आपत्ती ठरणार आहे. अपारपारिक ऊर्जा साधनाचा अधिक प्रमाणात वापर करण्याचे तत्र विकसित करण्यावाचून त्यावर दुसरा पर्याय नसला तरीसुद्धा या बाबतीत दिलासा देणारे सशोधनाचे निष्कर्ष पुढे येत आहेत आर्क्टिक महासागर व अटार्क्टिकाच्या भोवतालच्या गोठलेल्या सागरी भागाखाली ऊर्जेचे प्रचड साठे गॅसहैड्रेटस्च्या स्वरूपात असल्याचे आढळून आले आहे हे साठे वापरण्याचे तत्र जेव्हा विकसित होईल तेव्हा त्यातून उपलब्ध होणाऱ्या ऊर्जास्तोत्रामुळे जगाची हजारो वर्षांची गरज भागेल. बर्म्यूडा ट्रँगल विभागामध्ये आश्चर्यकारकरित्या अदृश्य होणाऱ्या विमानाच्या आणि जहाजाच्या मागे अशाच प्रकारची गॅसहैड्रेट्समधून मुक्त होणारी ऊर्जा कारणीभूत आहे, याबद्दल आता शास्त्रज्ञांच्यामध्ये एकमत होत आहे

खोल सागराच्या तळाशी प्रचड दाब व अतिशीत तपमान यामुळे पाणी आणि वायू याच्या परमाणूचे गॅस हैड्रेट्समध्ये रूपांतर होते. या गॅसहैड्रेट्सचे स्वरूप बर्फासारखे असते. तथापि सर्वसामान्य बर्फ आणि या हैड्रेट्समध्ये फरक असतो. मिथेन वायूचे रेणू हैड्रेड्सच्या स्वरूपात बदिस्त केलेले असतात. प्रत्येक बर्फासारख्या भासणाऱ्या सूक्ष्म कणामध्ये मिथेनचे रेणू असतात. लाखो वर्षे सागराच्या तळाशी सचित होणाऱ्या गाळामुळे मिथेनची निर्मिती होत असते. उच्चदाब आणि कमी तपमानामुळे सागराच्या तळाशी मिथेनच्या स्वरूपातील ही ऊर्जा हैड्रेटस्च्या पिंजऱ्यात कोंडलेली असते. उच्च तपमानामुळे हैड्रेटस्चे सूक्ष्मकण वितळवून त्यामध्ये

बदिस्त असलेला ऊर्जेचा प्रचंड साठा मुक्त करता येतो.

डॉन डेव्हिडसनच्या निष्कर्षानुसार आज भूगर्भात उपलब्ध असलेल्या नैसर्गिक वायूच्या अनेक पटीनी जास्त वायू सागराच्या तळाशी गॅसहैड्रोटस्च्या स्वरूपात आहे. हा ऊर्जेचा अतिप्रचड स्त्रोत वापरावा कसा यासाठी शास्त्रज्ञ सशोधनात गुतले आहेत. सागरतळाशी असलेल्या ऊर्जेच्या खजिन्याचे भाडार खुले करण्यासाठी परवलीचा शब्द सापडायचा अवकाश, की मग खूल जा सिम सिम म्हटल्याबरोबर अलिबाबाला गुहेचे गुप्तदार खुले व्हावे तसा चमत्कार होणार आहे. आज शास्त्रज्ञाना भेडसावणारे प्रश्न म्हणजे नेमक्या कोणत्या तपमानाला व दाबाला हे हैड्रेटस् स्थिर होतात ? दाब व तपमान याच्या वेगवेगळ्या स्थितीचा त्यांच्यावर कोणता परिणाम होतो ? हैड्रेटस् वितळण्यासाठी किती तपमान आवश्यक आहे ? आणि सागराच्या तळाशी हे आवश्यक तपमान कसे निर्माण करायचे ?

बर्फ वितळण्यासाठी जेवढी ऊर्जा आवश्यक असते त्यापेक्षा थोडी जास्तच ऊर्जा गॅस हैड्रेटस् वितळवण्यासाठी लागते. पहिल्या टप्प्यामध्ये मुक्त होणाऱ्या मिथेनमधील सात टक्के मिथेन पुन्हा नवी ऊर्जा मुक्त करण्यासाठी वापरता येणे शक्य आहे. एकूण महासागरांच्या तळाच्या ८५ टक्के तळभागावर हैड्रेटस्चे साठे आहेत. त्याचा विस्तार हजारो चौ. कि. मी व खोली शेकडो मीटर आहे. कॅलिफोर्नियाच्या किनाऱ्यालगतच्या सागरतळावर त्यांचे प्रमाण जास्त आहे. याच भागात सर्वप्रथम सागरतळाशी बदिस्त असलेली ऊर्जा मुक्त केली जाईल असा कयास आहे. हैड्रेटस् वितळवण्यासाठी सागर पृष्ठावरील २० अश से. ग्रे. तपमानाचे पाणी अतिशय वेगाने सागरतळाशी असलेल्या हैड्रेटसवर सोडल्यास मिथेन वायू मुक्त करता येईल व त्याची इच्छित ठिकाणी वाहतुक करता येईल. कोणत्या ठिकाणी आर्थिक दृष्ट्या फायदेशीर ठरतील असे हैड्रेटस्चे साठे आहेत याबद्दल शास्त्रज्ञांनी कयास केले आहेत. उत्तर कॅनडामध्ये ब्युफोर्ट समुद्रात सलग असे हैड्रेटस्च्या थराचे साठे आहेत. सागरतळाशी असलेल्या थरांच्या तुलनेने त्याचे हिमाच्छादित प्रदेशातील बर्फाखालील साठे कमी जाडीचे, तुरळक व विस्कळीत आहेत.

सागरी विभागात तेलखोदाई करणाऱ्या जहाजाना अनेक वेळा गॅसहैड्रेट्समुळे त्रास सहन करावा लागतो. खोदलेल्या बोगद्यामध्ये किंवा नैसर्गिक वायूच्या नळामध्येसुद्धा हैड्रेट्स निर्माण होतात. वस्तुतः त्यामुळेच या घनस्थितीतील वायूचे साठे शोधण्यास शास्त्रज्ञ प्रवृत्त झाले. रशियन शास्त्रज्ञ तर त्यांच्या नैसर्गिक वायू क्षेत्रातील गॅसहैड्रोट्सचा प्रभावी उपयोग करून घेण्याच्या प्रयत्नात आहेत. आर्क्टिक विभागातील प्रतिकूल पर्यावरणामुळे ऊर्जेचा या नव्या स्वरूपाचा विकास करण्याच्या प्रक्रियेमध्ये अनत अडचणी आहेत. जरी गॅसहैड्रेट्समधून ऊर्जा मिळविण्याचे तंत्र उपलब्ध झाले, तरी नैसर्गिक वायू मिळविण्यातील सुलभता आणि किफायतशीरपणा यांच्या तुलनेने सध्या तरी हैड्रेट्सपासूनची उर्जा महागडी व न परवडणारीच असेल. नजिकच्या भविष्यकाळात सुरक्षित व फायदेशीर पद्धतीने ऊर्जेचे हे भाडार हस्तगत करण्याचे मार्ग सापडतील अशी आशा करायला हरकत नाही.

अॅटलांटिक महासागराच्या पश्चिम भागातील बर्म्यूडा बेटाभोवतालच्या सागरी भागात जहाजे व विमाने आश्चर्यकारकरीत्या अदृश्य होत असल्याच्या काही घटनाचा बराच बोलबाला झाल्यामुळे या प्रदेशाकडे साऱ्या जगाचे लक्ष वेधले. बर्म्यूडा, बहामा व पोर्टोरिको या दरम्यानचा हा प्रदेश बर्म्यूडा ट्रँगल म्हणून ओळखला जातो. जहाजे आणि विमाने अदृश्य होण्याच्या घटनाचा उलगडा करण्याच्या निमित्ताने बरेच लिखाण झाले आहे. त्यातील फारच थोडे वास्तवतेला धरून व जास्त ते काल्पनिक कथाच्या स्वरूपातले आहे. आता होस्टनमधील मॅकल्व्हर कन्सल्टट्स इटरनॅशनलमधील रिचर्ड मॅकल्व्हर याने बर्म्यूडा ट्रँगलमधील जहाजे आणि विमाने आकस्मिकरीत्या अदृश्य होण्याशी गॅसहैड्रेट्सचा सबध असल्याचे मत माडले आहे. सागरतळाशी असलेल्या गॅसहैड्रेट्सच्या थराखाली नैसर्गिक वायू कोंडला जातो. त्याचे गॅसहैड्रेट्समध्ये कित्येक वेळा रूपातर होत नाही. कारण अशा ठिकाणी तपमान आवश्यकतेपेक्षा जास्त असते. भूकंप किंवा इतर प्रकारच्या भूकवचाच्या हालचालीमुळे एकप्रकारचा असमतोल निर्माण होतो व त्यावेळी गॅसहैड्रेट्सखाली कोडलेला नैसर्गिक वायू मुक्त होऊन सागरपृष्ठाकडे वेगाने क्षेपावतो. त्याच कारणामुळे काही गॅसहैड्रेट्सवरील दाब क्षणकाल का होईना कमी होतो व गॅसहैड्रेट्सचे रूपातर मिथेन वायूमध्ये होते. अशा प्रकारे निर्माण झालेली प्रचंड ऊर्जा सागरपृष्ठाकडे क्षेपावते. ज्वालाग्राही वायूच्या प्रचड आकाराच्या बुडबुड्यामुळे सागरपृष्ठावरील जहाजेच नव्हे तर कमी उचीवरून उड्डाण करणारी विमानेसुद्धा धोक्यात येऊ शकतात. बर्म्यूडा ट्रँगल विभागातून उड्डाण करणाऱ्या वैमानिकांनी सागरपृष्ठावर आकस्मिकरीत्या प्रचड आकाराचे बुडबुडे फुटताना पाहिले आहेत. त्यामुळे जरी मॅकल्व्हरच्या मतास पुष्टी मिळत असली तरी त्याची ही कारणमीमासा पूर्णपणे सिद्ध झालेली नाही. डेव्हिडसन् मात्र बर्म्यूडा ट्रँगल विभागात अनेक जहाजे व विमाने बेपत्ता होण्यामागे गॅसहैड्रेट्समधून आकस्मिकरीत्या मोठ्या प्रमाणावर मुक्त होणारी ऊर्जा हेच महत्त्वाचे कारण आहे या मताचा पाठपुरावा करतो.

—डॉ. सुभाषचंद्र सारंग

## ☐ अणुयुगातील वाटचाल

गेल्या वर्षी (१९८५) भारताने अणुक्षेत्रात दोन महत्त्वाच्या गोष्टी साध्य केल्या. मुबईच्या भाभा अणुसशोधन केंद्रात 'ध्रुव' ही अणुभट्टी सुरू झाली. ८ ऑगस्ट रोजी जगातील संशोधन कार्यासाठी वापरल्या जाणाऱ्या अगदी मोठ्या अणुभट्ट्यात 'ध्रुव'ची (१०० मे. वॅ) गणना करावी लागेल. या भट्टीत आयोडीन–१३१, क्रोमियम–५१ मॉलिब्डेनम–९९... या प्रकारची समस्थानिके तयार करता येतील. या पदार्थांचा शेतकी, वैद्यकीय व औद्योगिक अशा तीन्ही क्षेत्रात उपयोग केला जातो. सपूर्णपणे भारतीय शास्त्रज्ञानी भारतातच उभारलेल्या या भट्टीचे आणखी एक ठळक वैशिष्ट्य म्हणजे यातून मिळणारे प्लुटोनियम तशीच

गरज वाटल्यास अणुबॉम्ब तयार करण्यासाठीही वापरता येईल !

१८ ऑक्टोबर १९८५ ला कार्यान्वित झालेली 'फास्टर ब्रीडर टेस्ट रिॲक्टर' (FBTR) ही भट्टी दुसऱ्या पिढीची भट्टी आहे. तिसऱ्या जगात अशी भट्टी उभारणारे भारत हे पहिलेच राष्ट्र आहे. अणुऊर्जा निर्मिती क्षेत्रातील हे पुढचे पाऊल आहे. नेहमीच्या अणुभट्टीतून मिळणारे प्लुटोनियम 'फास्ट ब्रीडर' भट्टीत वापरले जाते. पहिल्या प्रकारच्या अणुभट्टीत वापरण्यात येणाऱ्या युरेनियमचा साठा आणखी सुमारे ५० वर्षेच पुरेल, असा अदाज आहे. त्यामुळे ते काटकसरीने वापरणे फार आवश्यक आहे. नेहमीच्या अणुभट्टीपेक्षा 'फास्ट ब्रीडर' भट्टीत युरेनियमपासून ६० ते ७० पट अधिक ऊर्जा मिळवता येते. कल्पक्कम येथील 'फास्ट ब्रीडरचा' आराखडा फ्रेंच असला तरी तीही सर्वस्वी भारतानेच उभारली आहे ही 'फास्ट ब्रीडर' फक्त ४० मे. वॅ. ची असली तरी नतरच्या भट्टचा ५०० मे. वॅ. च्या असतील.

—विशाखा भा. बापट

---

## □ औषधाच्या बाटलीत गजर !

'तसा आजार गभीर आहे. पण काही काळजी करायला नको. मी काही औषध लिहून दिलीत आणि ती कशी घ्यायची त्या सूचनाही दिल्यात.' असा दिलासा देत डॉक्टर आपल्या हातात औषधाची एक भली मोठी यादी देतात. त्यातली काही औषधे—गोळ्या, कॅप्सूल—दर तीन/चार तासानी दिवसातून चार—पाच वेळा घ्यायची असतात. मग होत काय की काही वेळा औषध घ्यायचंच राहून जात किंवा ते वेळेआधी तरी घेतल जात नाही तर उशीरा, आणि हो, जास्त वेळा घेतल जायचीही शक्यता असते. मग 'हे काय, मला आठवण करायची नाहीस/नाहीत का ? तुझं—तुमच (मेल) लक्षच नसतं कुठे' आणि आजार मुलाचा असला तर नवरा बायकोवर व बायको नवऱ्यावर कावते.

पण आता औषधे वेळेवर घेण्यावरून—देण्यावरून घरात महाभारत घडायला नको. अमेरिकेच्या सायनामिड कपनीने या विसरण्यावर एक मोठा मजेदार उपाय शोधून काढला आहे डिजिटल घड्याळयाचा आता सुकाळ झाला असून त्यात तसे नाविन्य राहिलेले नाही. या घड्याळयात कॅलेंडर, गजर, स्टॉप वॉच, कॅलक्युलेटर फार काय टेलिव्हिजनसुद्धा असतो. घड्याळयात गजरासाठी जे सर्किट वापरतात ते अतिशय सूक्ष्म असून स्वस्तही असते. हे सूक्ष्म सर्किट औषधाच्या बाटल्यांच्या झाकणात (बुचात) सहज बसवता येते. झाकण बाटलीवर फिरवून बसवले की दाब पडून सर्किटमधली बटने सुरू होतात. त्यामुळे वेळ मोजणाऱ्या 'चिप' मधले मडळ पूर्ण होऊन सेकंद मोजायला सुरुवात होते. टोपणावर बसवलेल्या एल्. सी. डी. ( Liquid Crystal Display ) वर वेळ तरी दाखवली जाते नाही तर निव्वळ आकडे (Countdown), आधी ठरवलेली वेळ ( किंवा आकडे ) भरली की एल्. सी. डी. शून्य आकडा दर्शवतो व गजर होतो. औषधे घेण्यासाठी बाटली उघडली की, विद्युत मंडळ तुटते व काउंटर शून्यावर येतो. बाटलीवर झाकण पुन्हा बसवले की, काउंटर परत सुरू. आहे ना नामी उपाय !

—सु. स. शिरोडकर

---

# सांस्कृतिक नागपूर

पृष्ठ २ वरून

प्रभाकर मी माझ्या लहानपणापासून पहातो आहे. 'अरे भीमसेन जोशी याची नवीन रेकॉर्ड तू ऐकली आहेस ? वा ! बुवानी काय मजा केली आहे !' 'प्रभाकर पेंढारकर याचे आत्मचरित्र तू वाचलेस ?' 'अरे ग. दि. मा. ज्याना डिक्टेशन देत असन ना त्यांच्या गप्पा तू ऐकल्या आहेस ?' 'चितमपल्लीबरोबर नवेगावच्या जगलात फिरण्याचा आनंद काही औरच बुवा !' 'पंढरकरबुवानी काय मैफल रंगवली.' प्रभाकर नेहमीच कोणत्यातरी धुंदीत आणि मस्तीत असतो. त्याला नेहमी कोणत्या ना कोणत्या वेडाने नेहमीच पछाडलेले. आपल्याला जी गोष्ट आवडली ती इतरानीही ऐकली पाहिजे हा त्याचा आग्रह. ह्या प्रेमाच्या पोटी त्याने 'रसिक' नावाची एक सस्था जन्माला घातली आणि त्याच्यावर प्रेम असणाऱ्या लोकांनी ती उचलून धरली. आज नागपुरात 'रसिक' ही सस्था तिच्या आगळया वेगळया कार्यक्रमाकरिताच प्रसिद्ध आहे. पु. भा. भावे त्याचे दैवत. त्यांच्याबरोबर त्याच्या किती बैठका झाल्या असतील याची मोजदाद नाही. भाव्याबद्दल प्रभाकर भाववश होऊन बोलायला लागला की कितीवेळ ऐकावे तरी पुरेसे वाटत नाही. प्रभाकराने जीवनाचा विचार रू. आ. पै. मध्ये कधीच केला नाही. नागपूरला समुद्र नाही, म्हणून येथल्या शाळामधील मुलाना समुद्र कसा दिसणार, म्हणून त्याने आपल्या शाळेतल्या मुलांना कोकणच्या किनाऱ्यावर नेऊन समुद्रातून फिरवून आणले, आपल्या वर्गातल्या मुलाना त्याने खास विमानप्रवास घडवून आणला. ट्रेकिंगवर अनेकवार मुलाना नेले. अमरकंटकला नर्मदा दाखविली. पक्ष्याचे निरीक्षण कसे करावयाचे त्याचे खास शिक्षण दिले. परतु हे खास आपण ज्या गोष्टीनी भारून गेलो त्या गोष्टी मुलाना माहीत व्हाव्यात म्हणून. या सर्व प्रयोगांमध्ये त्याच्या खिशातून किती पैसे गेले असतील याचा त्याच्याजवळ हिशेब नाही त्याला अभिमान आणि आनद एकाच गोष्टीचा—ज्यावेळी व. पु. काळे महाराष्ट्राला माहीत नव्हते त्यावेळी त्याचा पहिला कार्यक्रम आपण आपल्या गावात केला व तिथूनच व. पु.च्या जाहीर कार्यक्रमाना प्रारभ झाला. गावात जे कलावंत, साहित्यिक आणि सगीतकार नागपुरात आले नसतील ते नागपुरात प्रथमतः आणण्याचे श्रेय प्रभाकरचेच. नागपूर हे रसिकाचे गाव आहे आणि ती परपरा आपण चालविली पाहिजे हे प्रभाकरचे खास मत. ह्यामुळे साहित्य, सगीत नाटक ह्या सर्वच क्षेत्रात प्रभाकरचा सर्वत्र वावर असे. निरनिराळ्या क्षेत्रातील अप्रसिद्ध माणिक मोती निवडून त्याना नागपूरकरासमोर सादर करणे हा त्याचा खास छद. अगदी नकलाकार गोडघापासून तो थेट हार्मोनियम वादक जळगावकर पर्यंत अनेक कलावत त्याने नागपूरला आणले. त्याने व्याख्यानमालाचेही अनेक प्रयोग नागपुरात केले. पुण्यात वसत व्याख्यानमाला चालते, मुबईत अमरहिंद व्याख्यानमाला चालते तर नागपुरात का नाही ? हा त्याचा रोकडा प्रश्न. तुम्ही रसिकमध्ये दोनशे एकावन्न रुपये डिपॉझिट ठेवा, त्याच्या व्याजातून आपण एखादी व्याख्यानमाला चालवू असे

तो प्रत्येकाला कळकळीने सांगत असतो. अजून ती कल्पना काही प्रत्यक्षात उतरली नाही. मंडळी हो हो म्हणतात. परंतु प्रत्यक्षात तेव्हढी रक्कम जमली नाही. प्रभाकर सारखा हळहळतो आणि विचारतो, 'नागपूरकरांना ह्या योजनेचे महत्त्व का वाटू नये ?'

प्रभाकर आता मात्र मधूनमधून निराश व्हायला लागला आहे. सांस्कृतिक दृष्ट्या जीवनात संपन्नता आल्याशिवाय जीवनाला काय अर्थ आहे असे तो नेहमीच विचारतो. आम्ही नागपूरस्थ सर्वजण नेहमीच त्याला म्हणतो, 'तू नागपूरकरिता जे केले आहेस त्याची किमत फार मोठी आहे. आमच्या जीवनाला त्यामुळेच मोठा अर्थ प्राप्त झाला आहे. नागपूरला तू काही प्रमाणात सांस्कृतिक व्यक्तिमत्त्व प्राप्त करून दिले आहेस. ही कामगिरी रु. आ. पै. ह्यांच्यात तोलली थोडीच जाणार आहे ?

प्रभाकरला पुन्हा टवटवी येते आणि तो किशोरी आमोणकरांच्या नवीन रेकॉर्डसवर बोलू लागतो ! तितक्याच उत्साहाने !

प्रभाकर नागपूरच्या सांस्कृतिक जीवनाचे अविभाज्य अंग आहे.

### ☐ टॉयनबीचा शोध

नागपूरात धरमपेठ महाविद्यालयात प्राध्यापकांचा एक अभ्यास गट आहे. दिनांक १५ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजता ह्या गटाने एक आगळा वेगळा कार्यक्रम ठेवला होता. वर्षभर ह्या गटाने 'टॉयनबी' ह्या इतिहासकाराच्या इतिहास संकल्पनाचा अभ्यास केला. दर आठवड्यात हा अभ्यास गट एकत्रित येऊन टॉयनबीच्या ग्रंथांचे सामूहिक वाचन करीत असे. ह्या अभ्यासाचा शेवट म्हणून दिनांक १५ रोजी टॉयनबीवर एक परिसंवाद ठेवण्यात आला. ह्या परिसंवादात अनेक नामवंत अभ्यासकांनी भाग घेतला. एखादा विषय अभ्यासाला घेऊन त्याचा वर्षभर पाठपुरावा करावयाचे उपक्रम आजकाल फारच कमी आढळतात. म्हणून ह्या परिसंवादाचा आणि अभ्यासगटाचा खास उल्लेख करीत आहे. हा अभ्यासगट चालविण्याचे सारे श्रेय डॉ. पिंपळापुरे, डॉ. भागडीकर, प्रा. सुरेश देशपांडे, डॉ. सौ. लीला देशपांडे, डॉ. सौ. उषा गडकरी, प्रा. बोरावार इत्यादी प्राध्यापकांना आहे. त्यांचे अभिनंदन !

— शरश्चंद्र


## राजहंसचे विज्ञान प्रकाशन

टारझनच्या हातात एक पुस्तक पडलं....
पांढऱ्यावर काळे विचित्र आकार पाहून तो
बुचकळ्यात पडला.
येत्या काही वर्षांत आपण सगळेच टारझन ठरू
की काय ?

अनोळखी वस्तू, अनोळखी भाषा आणि गूढ
वाटणाऱ्या शक्ती असलेलं एक जग आपल्या
जगात घुसत चाललेलं आहे.
हे आहे कॉम्प्युटरचे जग.
एक लक्षात घ्या. या कॉम्प्युटरमध्ये काहीही
जादू नाही.
ते केवळ एक यंत्र आहे.
कर्ताकरविता माणूसच आहे.

या यंत्रात माहिती कशी घातली जाते इथपासून
ते हवी असलेली माहिती बाहेर पडेपर्यंत
प्रत्येक घटनेची माहिती सांगणारे आणि या
सगळ्याचा नेहमीच्या अनुभवांच्या आधारे
खुलासा करणारे पुस्तक

# या कॉम्प्यूटरमध्ये दडलंय काय ?

**लेखक : राजीव साने**

किंमत : रुपये तीस

राजहंस प्रकाशन पुणे

१०२५ सदाशिव पेठ
नागनाथ पाराजवळ
पुणे ४११०३०

दूरध्वनी : ४४३४५९

C/o श्री. वा. र. गोडे
४१ भवानीशंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर
दादर (प.) मुंबई ४०० ०२८

दूरध्वनी : ४२२५४५५

**MANOOS WEEKLY** ( Licensed to post without prepayment of postage No–11 ) Regd. No. PNCW–**28**

**महाराष्ट्र साहित्य परिषदेने**
**पारितोषिक देऊन गौरविलेले**
**राजहंस प्रकाशन**

# भ्रम आणि निरास

**लेखक : डॉ. नरेंद्र दाभोळकर**

**पृष्ठे : १४० / किंमत : ३० रुपये**

अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतल्या एका कार्यकर्त्याने बुवाबाजी, झपाटणे, भानामती, वशीकरण, पुनर्जन्म, ग्रहांचे खेळ यासारख्या आपल्या समाजात ठाण मांडून बसलेल्या गोष्टींचे केलेले शास्त्रशुद्ध विवेचन आणि अंधश्रद्धा निर्मूलन चळवळीतले प्रत्यक्ष अनुभव.

◆

**राजहंस प्रकाशन**
१०२५ सदाशिव, नागनाथ पाराजवळ
पुणे ४११ ०३०. । फोन : ४४ ३४ ५९

◆

वा. र. गोडे, ४१ भवानी शंकर रोड
जोशी वाडी, चितळे पथ कॉर्नर, दादर
मुंबई ४०० ०२८ । फोन : ४२२ ५४५५